THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

BROWEN BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192679
UNIVERSAL LIBRARY

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M93/J83ch Accession No. M 4407

Author जोशी चिंतामण विनायक

Title चार दिवस सुखाचे

1878 S4

This book should be returned on or before the date last marked below.

# चार दिवस सुनेचे

: लेखक :

चिंतामण विनायक जोशी

मूल्य दोन रुपये

पॅरॅमाउंट प्रकाशन : १३
प्रकाशक : श्री. ना. तु. ठाकूर बी.ए.
मॅ. एजंट पॅरॅमाउंट पब्लिसिटी सि. प्रायव्हेट लि.
४८१ शनिवार, पुणें २

या आवृत्तीचे अधिकार प्रकाशकांचे स्वाधीन असून पुढील आवृत्ति, वेंचे घेणें इत्यादि सर्वाधिकार सौ. नीला बोडस, माटुंगा यांच्या स्वाधीन आहेत.

मुद्रक श्री. शं. रा. दाते,
यशवंत छापखाना
२००/३ सदाशिव, पुणें २

# प्रस्तावना

सन १९५५ च्या दिवाळीच्या आधीं एक महिनाभर श्री. ना. तु. ठाकूर यांनीं दीपमाला वार्षिकाकरितां लहानशा कादंबरीची मागणी केली. पंधरा दिवसांच्या आंत हस्तलिखित तयार होणें अवश्य होतें व डोक्यांत तर कथानकाचें भांडवल साफ रिकामें झालेलें होतें. एखाद्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद ठोकून द्यावा या विचारानें चार दिवस पुस्तकें चाळण्यांत घालविले. मनाजोगें एकहि पुस्तक न मिळाल्यानें स्वतंत्र रचनेचा धोपटमार्ग स्वीकारण्याचें ठरविलें. माझ्या अगोदरच्या पुस्तकांतून 'प्रामाणिकपणाविषयीं आजीबाई,' 'नावाविषयीं आजीबाई' इत्यादि पांच सहा गोष्टी खाणावळवाल्या आजीबाईसंबंधीं आलेल्या आहेत. त्या व्यक्तीच्या आयुष्याचें चित्रच रंगवावें असा निश्चय करून बारा दिवसांत 'रहाटगाडगं' ही कादंबरी लिहिली. ती एका दृष्टीनें अपूर्ण असल्याचें तिच्या शेवटीं सूचित केलें होतें. १९५६ च्या 'दीपमालेंत' राहिलेला भाग पूर्ण केला आहे. रहाटगाडग्यांत जुन्या काळच्या सासवा, सुनांचा कसा छळ करीत असत याचें वर्णन केलेलें आहे; व या भागांत असल्या खाष्ट सासवांना त्यांच्या म्हातारपणीं सुना कशा रीतीनें वागवून त्याचें उसनें फेडीत तें वर्णिलें आहे. म्हणून रा. ठाकूर यांनीं या भागास 'चार दिवस सुनेचे' असें नांव दिलें आहे.

सन १९१० च्या सुमारास पुण्यांत एक प्रतिष्ठित खाणावळवाली खाणावळ चालवीत होती. ताई ह्या नांवानें सगळेजण तिला ओळखीत. मी त्या काळीं कॉलेजविद्यार्थी होतों व मधून मधून प्रसंगानें तिच्याकडे जेवणास जात असें. बहुविध माहिती आणि जिज्ञासा यांनीं प्रेरित होऊन ती आपल्या मेंबरांशीं सर्व प्रचलित विषयांवर चर्चा करीत असे. आमची भीमाआजी हें त्या ताईचें चालतेंबोलतें छायाचित्र आहे. ताईच्या स्मृतीस वंदन करणें हें माझें कर्तव्य आहे.

रा. ठाकूर यांनीं टोंचणी लाविल्यानें हें पुस्तक लिहिलें व दिवाळी अंकाची घाई असल्यानें हस्तलिखितांत आणि मुद्रितांत दुरुस्ती करण्यास पुरेसा वेळ मिळाला नाहीं. यामुळें क्वचित् दोष राहिले असतील त्याबद्दल वाचकवर्गाची क्षमा मागतों.

दिवाळी शके १८७८
३३ नातुबाग, पुणें.

चिं. वि. जोशी

# अनुक्रमणिका


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| प्राक्-कथन | ५ |
| १. भाऊचे उद्योग | ९ |
| २. भगवंत इंग्रजी शाळेंत जातो | १८ |
| ३. भगवंत मेळ्यांत जातो | २७ |
| ४. सासूबाईंचा आमच्या घरावर मोर्चा | ३८ |
| ५. स्वदेशी चळवळींत भगवंत आणि भाऊ | ५२ |
| ६. भगवंताचें लग्न आणि त्यानंतर | ६४ |
| ७. आईसाहेब | ७६ |
| ८. भगवंतरावाची मामलेदारी नि भाऊची कर्जबाजारी | ८८ |
| ९. अवमानित भगिनीमंडळ | १०४ |
| १०. पुनः एकदा नाटकांचा विषय | ११४ |
| ११. वर गेलेली कमान पुनः कोसळली ! | १२४ |
| १२. ये रे माझ्या मागल्या ! | १३६ |
| १३. व्यक्ती तितक्या प्रकृती | १५० |


अर्पण

आमच्या कुटुंबावर सक्रिय ममता करणारे
माझे आतेबंधु

**ती. मोरूनाना**

( डॉ. मोरेश्वर गोपीनाथ ओक )

**यांस सादर**

— लेखक

# चार दिवस सुनेचे

## प्राक्कथन

रहाटगाडगं ह्या आत्मकथेचा पुढला भाग ह्या पुस्तकांत मी देणार असल्यानें अगोदरच्या कथेची उजळणी ह्या प्राक्कथनांत देत आहें. गुजरातेंत नर्मदा कांठीं कर्नाळी नांवाचें क्षेत्राचें गांव आहे. तेथल्या अरुणेश्वर महादेवाचे पुजारी बाबाभट ऐनापुरे आणि त्यांच्या पत्नी रमाबाई यांना रणछोड अथवा भाऊ आणि भीमा अथवा ताई अशीं दोन मुलें होतीं. हीं मुलें इतर मुलांच्या बरोबर खेळत असतां एक दक्षिणी पुरुष आणि एक सोळा वर्षांचा मुलगा असे बडोद्याहून तेथें आले होते. त्यांनीं मुलांना पाहिले; आणि त्यांच्या कडून माहिती काढून घेतली.

त्या मोठ्या पुरुषाचें नांव नानासाहेब कापशीकर असें असून मुलग्याचें बंडोपंत होतें. आपण पुण्यास बॅरिस्टर असून हा आपला मुलगा लग्नाचा आहे; तुमची मुलगी चलाख दिसल्यामुळें तिची मागणी करीत आहों असें नानासाहेबांनीं सांगितलें. बाबाभटांनीं बंडोपंतांशीं आपल्या मुलीचें लग्न लावून टाकलें, परंतु लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं सर्व बेंड फुटलें. नानासाहेब हा नाटक मंडळीचा मालक आणि बंड्या त्या मंडळींतला मुख्य स्त्री-पार्टी आहे असें सत्य ऐनापुरे मंडळीला कळून हलकल्लोळ माजला. तेव्हां नानासाहेबांनीं खरी हकीगत सांगितली. बंडोपंत हा पुण्याच्या तात्यासाहेब शाळीग्राम नांवाच्या सद्गृहस्थाचा मुलगा आहे आणि तें कुटुंब सभ्य आणि मातबर आहे; वाटलें तर तात्यासाहेबांना बाबाभटांनीं पत्र लिहून खात्री करून घ्यावी. त्याप्रमाणें बाबाभटांनीं तात्यासाहेब शाळिग्रामांना पत्र लिहून कर्नाळीस फसगतीनें झालेल्या लग्नाची हकीगत कळविली. तात्यासाहेब सज्जन असल्यामुळें मुलाची लबाडी त्यांनीं आपल्या पदरांत घेतली आणि सुनेला आपल्याकडे ठेवण्याचें कबूल केलें.




'रहाटगाडगं' कादंबरीची कथानायिका भीमा हिचें आयुष्य नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण' असेंच गेलें. रंगभूमीवर स्त्रियांची भूमिका करणाऱ्या नटाशीं लग्न झाल्यावर चार दिवस सुखाचे गेले नसतील तोंच तिच्यावर वैधव्याची कुऱ्हाड पडली.

बाबाभटांनीं भीमाला पुण्यास सासरीं पोंचवून ते परत कर्नाळीला गेले. भीमाची सासू फार खाष्ट होती आणि तशाच स्वभावाची माघारी आलेली नणंद बनूवन्सं, बंडोपंतांचा मोठा भाऊ वासू आणि वासूची बायको राधा अशीं माणसें घरांत होती. राधाचा अनन्वित छळ होत असे आणि भीमाचा तसाच झाला असता परंतु ती फार धीट, हुशार आणि बळकट असल्यानें तिनें स्वतःचाच नव्हे तर राधाचा देखील छळांतून बचाव केला. पंचाक्षऱ्याकडून राधाचा छळ करण्यांत आला आणि त्यानंतर तिचें प्रेत विहिरींतून काढण्यांत आलें. ह्या बनावाच्या वेळीं भीमाला कोंडून ठेविलें होतें. राधाचा खून तिची सासू आणि नणंद यांनीं केला असा पोलिसांनीं संशय घेतला. तेव्हांपासून सासू आणि नणंद भीमाला भिऊन वागूं लागल्या.

बंडोपंत आपल्या नाटक मंडळीसह पुण्याला आल्यानंतर भीमाला पतीचा सहवास लाभला. तिनें पतीचें मन वळवून त्याला नाटक मंडळीतून निघावयास लाविलें. त्यानें गायनाचा वर्ग काढला आणि तो यशस्वी झाला. पत्नीवर त्याचें प्रेम असल्यामुळें अल्पकाळ सौभाग्याचा अनुभव भीमाला मिळाला आणि त्यांना पुत्रलाभ झाला. मुलाचें नांव भगवंत असें ठेवलें. एवढ्यांत तात्यासाहेबांची दूर क्वेट्ट्याला बदली झाली. पुण्यांत प्लेगचा कहर उडाला आणि त्यांत बंडोपंतांचा बळी पडला. मुलगा गेल्याचें ऐकून तात्यासाहेब परत पुण्यास आले आणि पुत्रशोकाच्या झटक्यानें अर्धांगवायू जडून त्यांना कायमचें अंथरूण धरावें लागलें. भीमाच्या वैधव्यानंतर तिचा अधिकच छळ करणें तिच्या सासूस व नणंदेस शक्य झालें. ह्या छळाचा पहिला तडाका तिच्या विपुल केशसंभारावर बसला आणि तिला संन्यासिनी करून टाकलें. अर्थात् तिचें घराबाहेर जाणें, घरांतहि दुसऱ्याला तोंड दाखवणें, जेवणखाण हें बंद होऊन गेलें. विधूर झालेल्या वासूनें दुष्ट हेतु मनांत धरून तिची आगळीक केली. शेवटीं तिनें सासऱ्याला आपलें गाऱ्हाणें सांगितलें आणि त्यानें खुणेनेंच तिला माहेरीं जाण्याची सूचना केली.

बंडोपंतानें भीमाच्या फायद्यासाठीं विमा उतरला होता. त्याच्या पैशाच्या जोरावर ती कांहीं काळ एकटीच माहेरीं जाऊन राहिली. भगवंताला आईची माया लागूं नये अशी खबरदारी भीमाच्या सासूनें घेतली होती. म्हणून तो आई बरोबर गेला नव्हता. थोड्या दिवसांनीं भाऊ पुण्यास होता, त्यानें भीमाला कळविलें कीं, तात्यासाहेब निधन पावले. ताई जर माहेरी राहिलीं तर शाळीग्रामांच्या इस्टेटीपैकीं कांहींच तिच्या किंवा मुलाच्या वांटयास येणार नाहीं, म्हणून तिनें पुण्यास वांटा मागण्यास यावें. त्याप्रमाणें भीमा परत आली. अग्निहोत्री नांवाच्या ऋणानुबंधी गृहस्थाच्या साहाय्यानें भीमाच्या ताब्यांत तिचा मुलगा आला. तिची सासू व नणंद यांच्याबद्दल अगोदरपासून दुष्कीर्ति असल्यानें अज्ञान भगवंत ह्याची पालनकर्ती ह्या नात्यानें भीमाच्या ताब्यांत शाळिग्रामांची अर्धी दौलत आली. अर्ध्या वाड्यांत भीमा, भगवंत आणि भाऊ अशीं तिघें राहूं लागलीं.

वासूनें दुसरें लग्न केलें. वाड्याच्या दुसऱ्या अर्ध्या भागांत वासू, त्याची आई, बहीण, व बायको आधींपासून रहात होतींच. भाऊ तिच्या पैशाअडक्याची व्यवस्था बघत असे. त्यानें होमिओपाथीची परीक्षा दिली होती आणि डॉक्टर रणछोड रॉय असें नांव धारण करून त्याच वाड्यांत दवाखाना थाटला होता. भगवंताला आतां आईचा ळळा लागत चालला होता. भीमाला आतां एकच ध्येय राहिलें होतें आणि तें म्हणजे भगवंताला चांगलें वळण लावून शाळेंत आणि नंतर कॉलेजांत घालावयाचें, त्याला चांगली मुलगी पाहून द्यावयाची आणि निदान त्याच्या आजोबांच्या नोकरीसारखी नोकरी लागलेली पहायची. आतां पुढील वृत्तान्त कथानायिकेच्याच तोंडानें सांगितलेला ऐका.


—लेखक

# १ भाऊचे उद्योग

भाऊला मीं आपल्या जवळ ठेवून घेतलं होतं. एक तर त्याला भिक्षुकीचा वडिलार्जित धंदा आवडत नव्हता नि मला हाताशीं कोणीतरी पुरुषमनुष्य आमच्या घराची, शेताची नि बँकेतल्या रकमेची व्यवस्था ठेवायला पाहिजे होतं. भगवंताला आजोबांचं अर्धं घर मिळालं, त्यांत आम्ही राहून बरीचशी जागा शिल्लक होती. बाहेर दरवाजाच्या दोन बाजूंना दोन दुकानं काढलीं, त्यांपैकीं एक घेतलं एका शिप्यानं अन् दुसऱ्यांत डॉ. रणछोड रॉयनीं म्हणजे भाऊनं होमिओपाथिक दवाखाना काढला.

टेबल, खुर्ची, रोग्यांसाठीं किंवा त्यांचीं औषधं नेणारांसाठीं मोठं थोरलं पाठ असलेलं बाक, औषधं देण्यासाठीं एक पोटखोली असा थाट त्यानं मांडला. एक छानदार टांगायचा घासलेटचा दिवा टेबलावर लोंबत असे. पोषाखहि तो मोठ्या ऐटीचा करी. इंग्रजी पद्धतीप्रमाणें डोक्यावरचे सर्व केंस त्यानं वाढविले होते आणि विजारबूट घालूं लागला होता. शेंदोनशें रुपयांची औषधं त्यानं कलकत्त्याहून आणलीं होतीं. आणि तीं पोटखोलींतल्या कपाटांत व्यवस्थित लावून दिलीं होतीं. इतका सगळा थाटमाट करूनहि त्याच्या वाट्याला कोणी रोगी येईनात. बिचारा नटून थटून तयार व्हायच्या आधीं दुकानच्या फळ्या लावून दवाखाना झाडून काढीत असे; नंतर पोषाख चढवून खुर्चीवर जाऊन बसे. एक दिवस अशी गंमत झाली कीं तो दुकान झाडीत असतां एका गृहस्थानं येऊन डॉक्टर कुठें आहेत असें विचारलें. तेव्हां त्यानं सांगितलें, 'बसा वाईच्. मी त्यान्‌ला धाडून देतो.' गृहस्थ वाट बघत बसला. भाऊ घरांत आला, बूटपाटलोण चढविली अन् दवाखान्यांत मोठ्या आशेनं गेला,

पण तो गृहस्थ औषधाकरितां आला नव्हता. 'तुम्ही दवाखाना बंद करणार असाल तर मला हें दुकान भाड्यानं द्या' असं सांगायला आला होता. सकाळीं ७ ते १२ अन् संध्याकाळीं ४ ते ८ असे ९ तास तो खुर्चीवर बसून घालवी. चुकूनसुद्धां कोणी त्याच्याकडे औषध मागायला येत नसे. जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक माणसाकडे आशाळभूतपणें पाहून कंटाळल्यावर एकादं पुस्तक हातांत घेऊन त्याचीं पानें चाळीत चाळीत चोरट्या नजरेनं तो लोकांकडे पाही. दोन्ही पाय खालीं सोडून कंटाळल्यावर डावा पाय उजव्या मांडीवर ठेवून बसे. त्या स्थितींत



औषधापुरतंहि गिऱ्हाईक नसलेला भाऊचा दवाखाना

एक तास गेल्यावर उजवा पाय डाव्या मांडीवर ठेवी. त्याचाहि कंटाळा आल्यावर पोटखोलींत जाऊन औषधाच्या बाटल्या खालीं वर करी. अशा तऱ्हेनें त्याचा वेळ अगदीं कंटाळवाणा जाई. मी त्याला म्हणाले, 'अरे भाऊ, हें तुझं होमिओपाथिकचं

शास्त्र अगदीं नवं आहे. तुझ्या औषधांना ना रूप, ना रंग. तीं कोण घेणार? त्यापेक्षां दवाखान्याची जागा भाड्यानं दिली तर पांच–सात रुपये भाडं तरी येईल.'

असं मी म्हटल्यावर त्याला वाईट वाटलें. एकदां तो म्हणाला, 'एकंदरीनं ताई, मी तुझं नुकसान करतों आहे म्हणायचं. पण मला खात्री आहे कीं, माझा धंदा चांगला चालेल नि तुझं सगळं भाडं फेडून टाकीन.'

मी म्हणालें, ' एकाद्या नवीन गोष्टीचा प्रघात पाडायचा असेल तर तिच्याबद्दल लोकांना माहिती सांगायला पाहिजे. तूं कांहीं जाहिरात देशील, नाहीं तर कुठें लेचकर देशील तर लोकांना होमिओपाथीची माहिती होईल, अन् ते तुझीं औषधं घ्यायला लागतील.'

वर्षभर एकहि रोगी किंवा एकहि पैसा मिळवल्याशिवाय त्यानं दवाखाना चालूं ठेवला. मग त्याच्या डोक्यांत पैसे मिळवायची नवीन युक्ति आली. इटाली देशांत व्हेसू कीं असाच कायसा ज्वालामुखी पर्वत आहे. त्याचा मधून मधून स्फोट होत असतो, हें मी कशाला तुम्हांला सांगायला पाहिजे ? तसाच स्फोट होऊन त्याच्यांतून लाव्हा रसाचे लोटच्या लोट बाहेर पडले. त्यांत गांवच्या गांवं बुडून गेली, पण चमत्कार असा कीं त्या रसाचा स्पर्श झालेल्या जागेवरचे माणसांचे नि गुरांचे रोग साफ बरे झाले. ह्या स्फोटानंतर थोड्याच दिवसांनीं भाऊनं पुढील जाहिराती वांटल्या :–

## लाव्हा रसाचे डबे

**' व्हेसू पर्वतामधून वाहिलेल्या लाव्हा रसाचे डबे डॉ. रणछोड रॉय ह्यांनीं स्पेशल आगबोटीनं मागविले आहेत. ते आल्यानंतर लहान लहान डब्यांतून लाव्हा विक्रीस ठेवण्यांत येईल. हा लाव्हा रस त्वचेच्या सर्व रोगांवर जालीम उपाय आहे.'**

ह्यानंतर डॉ. रॉयनीं एक हजार डब्या विकत घेतल्या.

कशांत तरी कांहीं तरी द्रव्य मिसळून त्यानं एक मलम तयार केलं अन् त्याला ' **ज्वालामुखी रस** ' असं नांव दिलं. त्याच्याहि पुष्कळ जाहिराती दिल्या. ह्या खर्चासाठीं त्यानं माझ्याजवळून २०० रुपये उसने घेतले होते ते सगळे मला परत मिळाले. 'ज्वालामुखी रसा'चा खप इतका विलक्षण झाला कीं होमिओ-पाथीक दवाखान्याची पाटी निघून जाऊन त्या ठिकाणीं ' ज्वालामुखी रसा'ची झळकूं लागली. एवढं मात्र खरी कीं, त्या वेळीं भगवंताला खरूज झाली होती, तिच्यावर ज्वाला-मुखीचा उपयोग करण्याची बुद्धि मला झाली नाहीं. ह्या नवीन उद्योगांत भाऊला पुष्कळ पैसे मिळाले अन् त्याचा उदासपणा नष्ट झाला. ह्या अचानक फायद्यामुळें त्याचा ज्योतिषावर विश्वास बसला नि त्यानं एका नामांकित ज्योतिषीबुवांकडे जाऊन ज्योतिषाचा अभ्यास करायला प्रारंभ केला. आतां रात्रंदिवस कुंडल्या बघण्याचा नि गणित करून भविष्य बघण्याचा नाद त्याला लागला.

ज्वालामुखी मलमावर त्याला चांगले पैसे मिळूं लागले तेव्हां मुलींच्या आईबापांची त्याच्याकडे नजर फिरकूं लागली; पण आतां भाऊला ज्योतिषाचं वेड लागलं होतं. त्याच्या पत्रिकेंतल्या जायास्थानांत असं निघत होतं कीं बायकोकडून आपल्याला पुष्कळ पैसा मिळणार. पण त्याचा स्वतःचा मृत्यु-योग होता बत्तिसाव्या वर्षीं, तेव्हां तो योग टळला तर ३३ व्या• वर्षी लग्न करायचं असं त्यानं ठरवलं होतं. बाबांचं पत्र त्याला कधीं काळीं येत असें कीं, भाऊ, आतां तुझ्या वयाला एकवीस बेवीस वरसं झालीं आहेत एव्हांना आम्हांला दोन नातवंडं व्हायला पाहिजे होतीं पण तुझ्या तर लग्नाला ठिकाण नाहीं. ताईला मुलगी दाखवून तिची पसंती झाली कीं बाकीचं आम्ही ठरवतों. आम्ही काय आतां पिकलीं पानं झालों आहों, आमच्या देखत सून आण म्हणजे आम्हीं सुखानं डोळे मिटूं.

तीन वर्षांत आईबाबांचीं नि माझीं भेट झालीं नव्हतीं.

आतां माझं फुटकंतुटकं संसाराचं तारूं सुरळीतपणानं वाटचाल करूं लागलं होतं. भगवंत आतां मला चिकटला होता पण त्याच्याबरोबरच आपल्या आजीला नि आत्याला विसरला नव्हता. आतां सासूबाईंना आणि बनूवन्संना भावोजींच्या घरांत काडीची किंमत राहिली नव्हती. एकदा वन्सं आपल्या नव्या भावजयीला म्हणाल्या, ' कमळावहिनी, स्नान करून एक तास झाला तरी कपाळाला टिकली लावली नाहीस, बरं आहे का हें ?'

लगेच कमळाबाई उसळून म्हणाल्या, 'तुम्हांला हो माझ्या कुंकवाशीं उठाठेव करायचं काय कारण आहे ? एका भावजयीच्या कुंकवाशीं उठाठेव करून तें जन्माचं घालवून टाकलंत तें पुरें नाहीं वाटतं झालं ? '

आपल्या सुनांनाच काय पण नवऱ्यालाहि सळो कीं पळो करून सोडणाऱ्या सासूबाई आतां माई अन् कमळाबाईंचीं घालूनपाडून बोलणीं नि वागणूक यांच्या योगानं गोगलगाय होऊन गेल्या होत्या. वन्संची स्थिति त्यांच्याहून लाचारीची झाली होती. त्या कधीं तक्रार करूं लागल्या तर वासुभावोजी सुद्धां म्हणत, 'करावं तसं भरावं'. मी मात्र त्या दोघींना टाकून बोलत नसे नि भाग्या त्यांच्याशीं मायेनंच वागे; वासूभावोजींना अजून मूलबाळ झालेलं नव्हतं म्हणून तेहि भाग्याचे लाड करीत. अन् म्हणूनच मी त्यांच्या स्वाधीन भाग्याला करून कर्नाळीला गेलें.

त्याचं कारण असं झालं कीं एक दिवस अचानकपणें कर्नाळीच्या दौलतरामाकडून तार आली. 'तुमचे आईबाप कॉलऱ्यानें चिंताजनक स्थितींत आहेत. लवकर या.' माझ्या पोटांत धस्स झालं. आई नि बाबा वयाच्या मानानं चांगले निरोगी होते. म्हातारपणानं त्यांचं बरंवाईट होईल अशा स्थितींत ते नव्हते. पण अपमृत्यूपुढें कोणाचा इलाज आहे; आणि कॉलरा किंवा प्लेग ह्यांनीं माणूस आजारी पडलं कीं

त्याची आशा धरण्यांत कांहींच अर्थ नसे. डॉक्टर लोक असल्या रोग्यांना औषधपाणी करायला भीत असत तर भितरे आप्ते इष्ट त्यांच्यापासून पळ काढीत. मी भाग्याला सासूबाईच्या स्वाधीन केलं. मी गांवाला जाणार आहें अशी कुणकुण त्याला लागलीच होती, म्हणून 'मी येतों कर्नाळीला' असा बाळहट्ट धरून तो बसला. शेवटीं आम्हांला युक्ति योजावी लागली. भावोजी त्याला घेऊन लांकडी पुतळयांचा खेळ पहायला गेले आणि ते गेले असतां रात्रीच्या आगगाडीनं भाऊ नि मी पुण्याहून निघालों, ते दुसऱ्या दिवशीं दिवेलागणीच्या वेळीं कर्नाळीस पोंचलों. गांवाच्या हद्दींत शिरतांच अनसूयाकाकी वाटेंत उभी असलेली दिसली. आम्हांला पहातांच तिनं माझ्या दंडाना धरलं अन् सांगितलं, 'भीमाबेन, तू ह्या वक्ताला येशील असं वाटूनच मीं इथें उभी राहिलें होतें. बेन, भगवंताच्या इच्छेपुढें माणसाचं कांहीं चालत नाहीं. तुझी आई दुपारींच देवलोक पावली. बाबाभट अजून आहेत अन् चांगला इलाज झाला तर त्यांच्या जीवाला धोका नाहीं. भाऊभाई, आपला शोक दाबून टाका आणि पिताजींना वाचवावयाचा प्रयास करा.'

तिच्यामागून आम्ही आमच्या घरीं गेलों. बाबांची सारवार करायला बरींच माणसं जमलेलीं होती. पंड्यामास्तर, दौलतराम, आमची चांदोदची ठकूमावशी नि तिचे यजमान पिलुकाका अशी मंडळी खपत होती. आम्हांला पहातांच बाबा म्हणाले, 'आलांत, या. तुमच्या आईची नि तुमची भेट व्हायचा योग नव्हता. ती माझ्याआधीं मेली, तिचं सोनं झालं. आतां आम्हीहि तुमचा निरोप घेणार–'

भाऊ नि मी ओक्साबोक्शी रडलों. बाबा मात्र शांतपणें आम्हांला समाधानाच्या गोष्टी अडखळत आणि हळूहळू सांगत होते. त्यांच्या रोगाचा जोर ओसरत चाललेला होता. कॉलऱ्याचं वर्णन करणं मोठं किळसवाणं काम आहे; म्हणून तें मी करीत नाहीं. पण ह्या घाणेरड्या दुखण्यांत सुद्धां गुजराती

दक्षिणी भेद न करतां सगळ्यांनीं अतिशय मेहनत घेतली अन् बाबा दोन दिवसांनीं खडखडीत बरे झाले. शरीरानं ते बरे झाले असले तरी मनानं उत्साह वाटण्याजोगं काय राहिलं होतं? पन्नास वर्षं बरोबर छायेप्रमाणें राहून सेवा करणारी आमची आई नाहींशी झाली होती. आम्हीही हें घर आईवाचन सुनं असं कधीच पाहिलं नव्हतं. सगळी ओळखीची स्त्रीपुरुषमंडळी दारावर येत होती; अन् सगळ्यांचं म्हणणं असं पडलं कीं, एक तर भाऊनं कर्नाळीस राहून लग्न करून घेऊन अरुणेश्वराचं देऊळ चालवावं, नाहीं तर बाबांना बरोबर घेऊन आम्ही दोघांनीं पुण्यास जावं, पण दुखी कष्टी म्हातान्याला ह्यापुढें एकटा राहू देऊं नये.

कांहीं झालं तरी आपण पुजारी किंवा भिक्षुक होणार नाहीं. आणि ह्या कुग्रामांत रहाणार नाहीं असा आपला निश्चय भाऊनं जाहीर केला. आईचं तेरावं होईपर्यंत तिथंच रहाणं आम्हांला भाग होतं. तेवढ्या दिवसांत अरुणेश्वराची व्यवस्था आम्ही लावून टाकली. माझा एक मावसभाऊ म्हणजे चांदोदच्या ठकूमावशीचा लालजी नांवाचा मुलगा तुम्ही म्हणता ना तसा गुड फॉर नथींग होता, त्याच्याकडे पूजेचं काम सोंपवून दिलं. मला हा शब्द कसा माहीत झाला असं आश्चर्य तुम्हाला वाटत असेल पण आमच्या लहानपणीं पोराबाळांच्या अन पोरीसोरींच्या तोंडीं ही कविता पाठ झालेली होती.

मिस्टर केरूनाना, तुम्हीं जो धाडिलांत सव्हँट।
गुड फॉर नथींग आहे अदराची लागली असे वॉंट ॥

ह्या कवितेवरून हा शब्द मला माहित झाला आहे. घरांत लालजीला रहायला जागा दिली नि वर्षासनाचे ऐशीं रुपये बाबांच्याकडे त्यानं पाठवावें पण देवापुढें येणारे तांदूळपैसे त्यानं वापरावे असा करार केला. सामानसुमान तें काय असायचं आमचं? दोन वळकट्या न् तीन ट्रंकांत मावलं तें घेऊन आम्ही बाबांच्यासह पुण्याला यायला निघालों. सगळं

गांव आलं होतं आम्हाला पोचवायला चांदोद टेशनवर. बाबांला हार नि नारळ तरी किती मिळाले, जसा कांहीं एखादा मामलेदारच चालला आहे बदलून दिपोटी कलेक्टराच्या जागेवर! दुसऱ्या दिवशीं आम्ही पुण्यास पोचलों. माझ्या घरांत एका म्हाताऱ्या माणसाची भर पडली.

भाऊच्या 'ज्वालामुखी मलमा' चा खप पाहून पुष्कळ लोकांनीं त्याच्या नकला सुरूं केल्या. एका डॉक्टरांनं– तो खरं पाहिलं तर एका नामांकित डॉक्टराचा कंपौन्डर होता पण त्यानं स्वतःचा वेगळा दवाखाना काढला होता– लाव्हा बाम काढलं. लाव्हा लावा न् त्वचेचे रोग बरे करून घ्या! अशी त्यानं जाहिरात केली. एका वैद्यराजांनीं व्हेसुवियस बाम्ब काढलं तर एका राजवैद्यांनीं एटना हाईटमेणची जाहिरात फडकावून दिली. आमच्याजवळ जाहिरातींत घालवायाला फारसे पैसे नसल्यामुळें ज्वालामुखी मागे पडत चालला न पुनः आमच्या भाऊरायांनीं दवाखाना सुरूं केला. आतां त्याचा होमिओपाथीचा नाद नाहींसा झाला होता आणि त्याच्या जागीं बारा क्षार आले होते. होमिओपाथी जशी जर्मनींतल्या हनुमान डॉक्टरांनीं काढली होती तशीं हीं बारा औषधं त्याच देशांतल्या सुदलर नांवाच्या डॉक्टरानंच शोधून काढलीं होतीं. ह्यांनाहि चव नसते अन् सगळ्यांचा रंग पांढरा सफेत असतो. मनुष्याला जे रोग होतात ते त्याच्या शरीरांतल्या बारा क्षारांपैकीं एखादा कमी पडल्यानं उत्पन्न होतात; तेवढा त्याला पुरविला म्हणजे रोग निवारणाचं काम झालं. अर्थात् भाऊनं मला हें सगळं सांगितलं. ह्या औषधांना इंग्रजींत 'टिश्शु रेमिडी' म्हणतात, पण मी त्यांना 'इश्शं रेमिडी' म्हणें. कारण रोग हजार नि औषधं फक्त बारा हें माझ्या मनाला अजून दिखील पटत नाहीं. टिश्शु रेमिडीवाले डॉक्टर एवढ्या अभिमानानें आपल्या औषधांचा बडेजाव करतात अन् लोकांना तीं घ्यायचा आग्रह करतात. पण स्वतःवर बेतली कीं इंग्रजी पद्धतीच्या डॉक्टरकडेच धांव मारतात. आमच्याच घरचं उदाहरण देतें. भाग्याला ताप

आला. पहिल्यांदा वाटलं थंडीवाऱ्याचा असेल म्हणून फेरम् फॉस् दिलं तरी ताप हटेना. भाऊ म्हणाला, 'ह्याच्या पोटावर चिखलाची पट्टी ठेवून पाहूं या; कदाचित अपचनाचा असेल'. पट्टी ठेवली अन काली मूर सुरूं केलं. ताप वाढलाच. रात्रभरांत त्याच्या डोळ्याला डोळा नाहीं. मी बसलें होतें काळजी करीत. उजाडल्यावर भाऊ म्हणाला, 'हा ताप टिश्शु रेमिडीच्या शक्तिबाहेरचा आहे. मी आपला डॉक्टर मुंगळ्याना बोलावून आणतों.' अशी आहे या बारा क्षारांची गम्मत.

भाऊनं आतां एक नवीनच शक्कल काढली. त्यानं ज्योतिषाचा थोडासा अभ्यास केला होता.. ज्योतिषांत राशी असतात बारा आणि क्षारहि बाराच असतात. तेव्हां राशींचा नि क्षारांचा कांहीं तरी संबंध असला पाहिजे असं त्यानं ठरवलं. जो रोगी येईल त्याची रास विचारायची आणि त्याप्रमाणं औषधाची योजना करायची असं शास्त्र त्यानं काढलं. एखाद्या रोग्याला त्याची रास माहीत नसली तर पंचांग पाहून भाऊ आधीं रास हुडकून काढी अन मग त्याला औषध देई. ह्या नवीन विद्येला त्यानं ज्योतिर्वैद्यक असं नांव दिलं आणि पाटी पुन्हा रंगविली. **'ज्योतिर्वैद्यकालय' 'ज्योतिर्वैद्य डॉ. रणछोड रॉय.'**

लोक समजूं लागले हा एक विक्षिप्त किंवा लफंगा मनुष्य आहे. त्याच्याकडे त्याचे मित्रहि औषधाला येत नसत; पण त्याचा मित्रपरिवार मात्र वाढत चाललेला होता. दवाखान्यांत दहा दहा विशी-पंचविशींतील माणसं येऊन गोष्टी करीत बसत आणि तोहि बऱ्याच वेळां जेवायला किंवा झोंपायला उशीर करून येऊं लागला. मग त्यानं कसला नवा उद्योग आरंभला होता देव जाणे?

✦ ✦ ✦

# २ : : : भगवंत इंग्रजी शाळेंत जातो.

भगवंताला म्युसिसिपाळिटीच्या कसबा पेठेंतल्या मराठी शाळेंत घातलेलं होतं. त्याचा अभ्यास चांगला होता नि चौथीच्या वार्षिक परीक्षेंत तो पहिला आला. त्याला कालरशिपच्या परिक्षेला बसवलं होतं नि तिथें तीन रुपये कालरशिप त्याला मिळाली होती. आतां इंग्रची शाळेंत घालणं भाग पडलं. शहरांत चार इंग्रजी शाळा होत्या. सगळ्यांत श्रीमंती थाटांचं सरकारी हायस्कूल विश्रामबाग वाड्यांत होतं. त्यांत फी जास्त पडत होती म्हणून श्रीमंतांचीच मुलं त्यांत जात होतीं. सगळे मोठे हपिसर, रावसाहेब, रावबहादूर अशा लोकांची मुलं युरोपियन हेडमास्तर असलेल्या त्या शाळेंत जात. दुसरं न्यू इंग्लीश स्कूल. ही शाळा शनवारांत गद्रे वाड्यांत होती. शाळेच्यासमोर एक मोठं थोरलं वडाचं झाड होतं नि त्याच्या खांद्यावर शेकडों वडवाघळं सारखी कलकलाट करीत असत. ती लटकणारीं काळीं वडवाघळं पाहून खरोखरीच वडाला वांगी आल्यासारखं दिसे. त्या शाळेंत पुर्नविवाह केलेले, तर कोणी आपल्या मुलाची मुंज न करणारे, कोणी आपल्या बहिणींचा किंवा भावांचा पुर्नविवाह लावून देणारे, कित्येक प्रार्थनासमाजिष्ट नि सगळेच सुधारकी मताचे मास्तर होते. गांवांतले पक्के नि अर्धवट सुधारक आपल्या मुलांना ह्या शाळेंत पाठवायचे. तिसरी शाळा नूतन मराठी. ह्या शाळेंत जुन्या मताचे, केंस न राखतां घेरेशेंड्या ठेवणारे, गंध लावणारे असे जुन्या मताचे लोक असल्यामुळें साधारण धार्मिक लोक नूतन मराठींत आपलीं मुलं घालीत. चौथी शाळा भावे स्कूल. हा एक अठरा पगड जातीचा खुला बाजार होता म्हणायचा. ज्या मुलांना खूपसं खेळायला पाहिजे असेल किंवा थोडे मार्क मिळवून वरच्या यत्तेंत जायचं असेल त्यांना भावेस्कूल फार सोयीचं होतं !

आतां बाबा आमच्याकडे कायम रहायला आले नि आपल्या नातवाच्या शिखण्याकडे, खेळाकडे, खाण्यापिण्याकडे लक्ष द्यायला लागले होतें. कोणत्या शाळेंत मुलाला घालावं या संबंधीं त्यांचा नि रेणुकाबाईचे यजमान अग्निहोत्री याच्यांत वाद झाला. अग्निहोत्री सुधारकी मताचे असल्यानं त्यांचा न्यू इंग्लिश स्कूलकडे ओढा होता. ते म्हणाले, ‘ हें पहा बाबा, पूना हायस्कूल हें बोलून चालून श्रीमंतांचं, तें आपल्या उपयोगाचं नाहीं; भावे स्कूल अठरापगड जातींचं, त्यांत बोलणं शुद्ध नाहीं, पोरांचीं वयं मोठीं, वाईट संगत लागण्याचा संभव फार. रहातां राह्यलं न्यू इंग्लिश स्कूल अन् नूतन मराठी.’

‘मग आपल्याला कोणतं बरं वाटतं त्यापैकीं ? ’ बाबांनीं विचारलं.

‘मला वाटतं न्यू इंग्लिश स्कूल बरं आहे. फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसरसुद्धां तिथं क्लास घ्यायला येतात, त्यामुळें मुलांच्या ज्ञानांत चांगली भर पडते,’ अग्निहोत्री म्हणाले.

‘अहो इंग्रजी पहिलीला काय करायचे आहेत प्रोफेश्वर ? अन् अहो ते चांगले चांगले प्रोफेश्वर फर्ग्युसन सोडून गेले कीं! ते नामदार टिळक पूर्वीच राजीनामा देऊन कॉलेज सोडून गेले; इंग्रजी चांगलं शिकवणारे गोखले आतां रिटायर होणार आहेत म्हणे. बाकीं मला विशेष माहिती नाहीं म्हणा, मी नुकताच पुण्यांत आलों, त्यांतून सामान्य भिक्षुक ! मला कोण सांगणार इथली विगतवार हकीगत ?’ – बाबा.

‘मी सांगतों ना ? प्रोफेसर भानु आहेत इतिहासांतले प्रवीण, दुसरे हरिभाऊ लिमये, पानसे, धोंडो केशव कर्वे–’

‘कर्वे कोण ते हिंगण्याची विधवांची शाळा काढणारे ना ? नांव नका काढूं, त्यांचं माझ्या समोर ! विष्णवे नमः, विष्णवे नमः ! ’ बाबा त्वेषानें म्हणाले. ‘सोवळ्या झालेल्या बायकांनीं केस वाढवावयाचे आणि लिहा वाचायला शिकायचं हें केवळं महापातक आणि तें करविणारांच्या शाळेंत नातवाला घालायचं?

लहान मुलाला शिकवायला प्रोफेसर नेमणं म्हणज सरसुभ्याला महालकऱ्याचं काम देणं आहे; मास्तर चार अन् चार आठ असं शिकवतो तर प्रोफेसर काय चार अन् चार नऊ असं सांगणार आहे ? गळू कापायला एलेमेन्डेस डॉक्टर कशाला हवा, घर्मा न्हावी नाहीं कां तें काम करणार ? न्यू. इं. स्कूलच्या मुलांना दरसाल संस्कृत कॉलरशिपा मिळतात, पण आमच्या नातवाची ती महत्त्वाकांक्षा नाहीं. कुठून तरी मॅट्रिक होऊन छानदारशी नोकरी मिळाली कीं पुरें झालं.' बाबांच्या ह्या हट्टापुढें अग्निहोत्र्यांचा नायलाज झाला आणि भगवंताचं नांव नूतन मराठींत इंग्रजी पहिलींत घातलं.

एके दिवशीं भाग्या शाळेंतून धांवत धांवत घरीं आला अन् इतक्या घाईत कीं, उंबऱ्यावर अडखळून तो पडतो कीं काय असं मला वाटायला लागलं. 'आई, आई, लवकर बाहेर ये. बाहेर बघ काय जंमत आली आहे ती.' धांपा टाकीत माझे हात पकडून तो म्हणाला. मी त्याच्याबरोबर बाहेर गेलें आणि पाहिलं तर पांच सहा खेडवळ बायका अन् पुरुष खांद्यावरून आडवे बांबू टाकून उभे राहिले होते. त्या बांबूवर दोन मोर अन् चार लांडोरी बसवून ठेविलेल्या होत्या. त्यांचे डोळे बांधलेले होते. बांबूवरून लटकणाऱ्या पिंजऱ्यांत किरकिर करणारे पोपट कोंबून ठेविलेले होते. कर्नाळीला मोर, लांडोरी उपद्रव होईल इतक्या विपुल होत्या, पण त्या पहाण्याचं भाग्य भाग्याला लाभलेलं नव्हतं. तो म्हणाला, 'आई आपल्याला मोर घे ना?'

मोर घ्यायचा तर तो ठेवायचा कुठें? त्याला खायला काय घालायचं अन् तो चावला तर काय करायचं? असे प्रश्न करून त्याला गप बसवलं. विकणारे लोकहि समंजस होते. त्यांनीं सांगितलं, ज्यांची बाग असेल त्यांनींच मोर घ्यावा. तूं आपला एक छानदारसा पंचरंगी पोपट घे.

भाग्याचा हट्ट पुरविण्याकरतां पोपट घ्यायचं ठरवलं. पहिल्यांदा विकणाऱ्यानें पांच रुपये किंमत सांगितली पण

घासाघीस करून बारा आण्याला तो घेतला. लहान बच्चा होता तो. अन त्याला ठेवायला पिंजरा पाहिजे होता. आमच्या मामंजींच्या वेळीं रिकामा पिंजरा पडलेला मला माहीत होता. म्हणून तो मागण्यासाठीं भावोजींच्या घरांत मी गेलें. सासूबाई तांदूळ निवडीत बसल्या होत्या, समोरच वन्स डोळे लाल करून उखळीवर बसलेल्या होत्या. दोघींचं कांहीं तरी गंभीर विषयावर खलबत झालेलं दिसत होतं. मी सासूबाईंना म्हणाले, ‘ आपल्या घरीं पोपटाचा रिकामा पिंजरा होता ना ?’

‘आपल्या घरीं होता. पण आतां तें घर आपलं राहिलं नाहीं. तूं वेगळी झालीस नि ह्या घरांत मी मालकीण होतें तीं आतां स्वैपाकाची बाई झाले आहे. पोपट घेतला आहेस वाटतं.

‘होय, दारावरच घेतला, भाग्यानं हट्ट धरला होता म्हणून विकत घेतला.’

‘भाग्या तरी पोपटच आहे. त्याच्या सोबतीला दुसरा पोपट असलेला कांहीं वाईट नाहीं. पिंजरा आहे अडगळीच्या खोलींत. पण त्याच्यावर माझी सत्ता उरली नाहीं. बाईसाहेबांना विचार अन् घेऊन जा’— सासूबाई.

कमलाबाईंकडून पिंजरा मागून घेऊन मी परत आलें नि त्यांत पोपट ठेवून दिला. पंचवीस वर्षे तो जिवंत होता. सकाळच्या वेळीं ‘भाग्या, ऊठ; भाग्या, शाळेंत जा; भाग्या नीट अभ्यास कर’ अशी बाबांनीं शिकवलेलीं वाक्यं तो घडघड बोलत असे. मांजराच्या किंवा कावळ्याच्या ओरडण्याची, बाबांच्या खोकल्याची, टांग्याच्या घरघरीची अशा अनेक नकला तो करी. कुटुंबांतल्या एखाद्या लहान मुलासारखा तो आम्हांला आवडे.

भाग्याचा शाळेचा पोशाख कसा होता तें मी आतां सांगतें. डोक्यावर त्याच्या तळहाताएवढा घेरा अन् त्यांत वीतभर लांबीची शेंडी ठेवून बाकीच्या डोक्याची करवंटी होत होती. डोक्यावर फुलांची वेलबुट्टी काढलेली मखमालीची वाटोळी

टोपी असे. अंगांत सदरा अन् त्याच्यावर कोट; कोटाच्याच कापडाची घोटयापर्यंत विजार; नि पायांत कांहीं नसे. पाटी-पुस्तकाचं दप्तर पाठीवर लटकावून दिलेलं असे. शाळेंत जातांना न चुकतां कपाळाला तो गंध लावी आणि टोपीच्या आंत एरंडाचं पान ठेवी. गंध लावण्याबद्दल त्याला मार्क मिळत नि एरंडाचं पान घातल्यामुळें मार कमी बसत असे. शाळेंत जातांना जेवढे म्हणून शेंदूर फासलेले म्हसोबा, मारुती, सटवाया, शितळा देव्या असत त्या सर्वांना तो नमस्कार केल्याशिवाय पुढें जात नसे.

शाळेंत तो अभ्यास चांगला करीत होता; त्याचा नंबर पहिला किंवा दुसरा असे; इतकं असूनहि त्याच्या हातावर छडीचे वळ उठले नाहींत असा दिवस क्वचितच जात असे. माझ्याजवळ तो वारंवार तक्रार करी पण मी बायकोमाणूस, लिहितांवाचतां न येणारी न् त्यांतून ही अशी, शाळेंत जाऊन मास्तरजवळ भांडण काय करणार? भाऊला सांगावं तर तो म्हणे, 'अग ताई, छडी लागे छम् छम् विद्या येई घमघम् असा जुना न्याय आहे.' त्याला घरीं अभ्यास पुष्कळ करावा लागे. पांच पांच अवघड गणितं, मोडी कित्त्याचं एक पान, इंग्रजी कापीचं एक पान, दहा ओळी शुद्धलेखन, इंग्रजी शब्द, मराठी कवितें-तील शब्द, एक पान इतिहास, एक पान भूगोल, एक कविता इतकं सगळं पाठ करायचं नाहीं तर लिहायचं. ह्याला सगळी सकाळ अन् संध्याकाळ खर्च होई. खेळायला त्याला वेळ मिळ-तच नसे.

आईच्या मरणाच्या दुःखांतून बाबांनीं आतां डोकं वर काढलं होतं. आमच्याकडे त्यांना काम फारसं नसे. वाचायला त्यांना चष्मा पुरत नसल्यामुळें सूक्ष्मदर्शक भिंगाचा उपयोग करावा लागे. दर मंगळवारीं केसरी नि शुक्रवारीं काळ अशीं वर्तमानपत्रं भाऊ घेत होता. त्याचीं मतें केसरी-काळाशीं जमत असल्यामुळें तो तीं पत्रं नेमानं घेत होता. सोमवारीं सुधारक आणि शनिवारीं करमणूक अशीं पत्रं अग्निहोत्र्यांकडून आणून

ते वाचीत असत आणि मलाहि वाचून दाखवीत. पण वाचून तरी कितीसा वेळ घालवणार ? संध्याकाळीं ते कथापुराणाला, व्याख्यानाला किंवा देवदर्शनाला जात रात्रीं लवकर झोंप लागत नसे आणि पहाटे जाग लवकर येत असे. तेव्हां बाकीचीं माणसं सुखानं घोरत पडलेलीं पाहून त्यांना वैषम्य वाटायला लागलं कीं काय कोण जाणे; पण एक दिवस ते म्हणाले, 'भाग्या, तुला बेटचा संस्कार कसला अजून लागला नाही. ह्या ना त्या कारणानं तुझी मुंज अजून झाली नाहीं, ती यंदा करून टाकतों. पण तिथपर्यंत तुला चांगलं वळण लागायला पाहिजे.'

मी म्हणालें, 'भाग्याला कोणतं वाईट वळण लागलं आहे ? शाळेंत वेळेवर जातो, अभ्यास चांगला करतो, दुसऱ्या मुलांचं पुस्तक वगैरे चोरीत नाहीं, अधाशीपणा करीत नाहीं–'

बाबा म्हणाले, 'ताई, तुला कांहीं समजत नाहीं. मुलांच्या देखत त्यांना चांगलं म्हणूं नये, तशानं तीं बिघडतात. तळहातावर छडीचा अन् कानावर कठोर शब्दांचा असे दुहेरी मार खाल्यानंच मुलं सुधारतात. उद्यांपासून पहाटे त्याला उठवून प्रथम थोडीं स्तोत्रं शिकवून अभ्यासाला बसवण्याचा मीं विचार केला आहे. सकाळच्या वेळीं पांच पतिव्रता किंवा सात चिरंजीव यांचीं नांवं घ्यायचीं, तें राह्यलं बाजूला अन् आजकालचीं मुलं खुशाल ए, बी, सी, डी; कॅट म्हणजे बिलाडी मीठ म्हणजे मांस, हेन् म्हणजे कोंबडी अन् कायसंसं म्हणजे कोंबडीचे अंडें असले बीभत्स शब्द घोकीत बसतात. एकदां तर ...लाच्या तोंडून "मला गोमांस आवडतें" असं वाक्य ...ं होतं ! धन्य आहे ह्या इंग्लीश शिक्षणाची ! त्यापेक्षां ..., देवे, शिवकवच, रामरक्षा असं पाठ केलं तर काय ...?"

...जवळच उभा होता. तो म्हणाला, 'उपाशी मरेल. ... केले म्हणजे काय अंडीं किंवा गोमांस तोंडांत घेऊन

पडतं होय ? इंग्रजी शिकल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं बाबा.' दोन दिवस बाबांनीं भगवंताला गाढ झोपेंतून उठवून स्तोत्रं म्हणायला लावलं. अर्धवट झोंप झाल्यानं म्हणतां म्हणतां त्याला डुलकी यायची आणि बाबांनीं त्याच्या गालावर थापट मारून त्याला जागं करायचं असा क्रम दोन दिवस झाला. झोंप पुरती न झाल्यामुळें त्याला शाळेंत डुलकी आली आणि मास्तरनीं छडया दिल्या. एखाद्या गुलामासारखे बिचाऱ्याचे घरीं नि शाळेंत हाल झाले आणि त्याला दोन तीन दिवसांनीं सडकून ताप भरला. तापांत तो बडबडायला लागला, 'नको, आजोबा, आतां नाहीं मी झोंपीं जाणार–नको, मास्तर मी वर्गांत झोंप घेणार नाहीं.' मी घाबरलें. आमचे फ्यामिली डॉक्टर मुंगळे ह्यांना बोलावून आणलं. त्यांनीहि ती बडबड ऐकली. मी म्हणालें, 'पोराला भुतानं झपाटलं कीं काय कोण जाणे ?' तशी डॉक्टर म्हणाले, 'हें बाहेरचं भूत नाहीं. घरातलंच आहे. आजोबा, नका मारूं असं हा म्हणतो आहे. हे आजोबा कोण ?'

मी सगळी हकीगत सांगितल्यावर डॉक्टरनीं बाबांना समोर बोलावून सांगितलं, 'हें बघा आजोबा, मुलाला शाळेंतल्या अभ्यासाचा भरपूर ताण पडतो आहे. त्यांत तुमची घटपटादि खटपट मुळींच नको. मुलांना भरपूर झोंप घेऊं द्यावी. झोंपमोड करून त्यांच्या डोक्यांत ज्ञान कोंबण्याचा प्रयास केला तर त्यांचीं डोकीं बथ्थड होतात. तुम्हांला उद्योग नसला तर पहांटे पर्वतीला जात जा. पण नातवाच्या मागें शिकारी कुत्र्यासारखे लागूं नका.'

बाबांना डॉक्टरांचें सांगणं फारसं आवडलं नाहीं. ते म्
डॉक्टरसाहेब, मुलांना अशीं स्तोत्रं, मंत्र शिकवलीं न
ब्राह्मण्य ते कसं शिल्लक राहील ? शाळेंत सगळं बाडग
डुक्कर, मांस, गोमांस, प्रेम करणें असल्या प्रकारचं ;
कांहीं वेदपुराणांची माहिती व्हायला नको का ?

डॉक्टर म्हणाले, 'आजोबा, इंग्रजींत म्हण आहे दोन्ही टोकांकडून मेणबत्ती जाळूं नका; अर्ध्या वेळांत ती संपेल. आपल्या मुलांना शाळेंत इंग्लिश शिकवावयाचं न् घरीं हें लौकर उठा, थंडीवाऱ्यांत गार पाण्यानं अंघोळ करून संध्या करा, स्तोत्रं म्हणा, नमस्कार घाला असल्या उठाठेवी करायच्या ह्या कारणांनीं नवीन पिढी अल्पायुषी झाली आहे. प्रिन्सिपाल आपटे, आगरकर, न्यायमूर्ति तेलंग, चिपळूणकर यांच्यासारखीं रत्नं ह्या यातायातींनीं लौकर हरपलीं. तुमच्या नातवाला शाळेंतला अभ्यास करूं द्या, तुमच्या भिक्षुकी विद्येचं ओझं त्याच्यावर घालूं नका.'

बाबांना तीं अल्पायुषी माणसं कोण होतीं हें माहीत नव्हतं पण नातवाला धर्मशिक्षण देण्याच्या यातायातीला सगळ्यांचा विरोध आहे हें त्यांना समजलं अन् भगवंत बरा झाल्यावर त्यांनीं त्याला आपली विद्या शिकवण्याचा अट्टाहास केला नाहीं एवढं खरं.

तरी शाळेशिवाय दुसऱ्या भानगडींत वेळ घालवायचा नाहीं हा नियम भाग्यानं स्वतःच्या खुषीनंच मोडला. एक दिवस तो मला म्हणाला, 'आई, मला मेळ्यांत बोलावताहेत. मी मेळ्यांत जाऊं का?'

'मेळ्यांत जाऊन काय करायचंय्? आपण आपले लांबून मेळे पहावे, पदं ऐकावीं नि घरीं यावं–' मी म्हणालें.

'मुलं म्हणतात असं बायकांसारखं बाकावर बसून बघायचंय् काय? हातांत टिपऱ्या घेऊन मर्दासारखा मेळ्यांत ये.' मलासुद्धां वाटे आपल्या मुलानं नुस्ता बघ्या राहूं नये, कांहीं-तरी करीत असावं. भाऊला विचारून काय तें सांगेन असं मीं त्याला सांगितलं आणि संध्याकाळीं भाऊला विचारलं, 'हा तुझा भाचा मेळ्यांत जाऊं का असं विचारतो आहे.'

'काय हरकत आहे ?' भाऊ म्हणाला, 'अग ताई, मी इथल्या एका प्रमुख मेळ्याच्या अधिकारी वर्गांत आहें.'

'काय त्याचं नांव ?'

'सन्मित्रसमाज. खास लोकमान्य टिळकांचा आवडता मेळा आहे तो. त्यांतलीं सगळीं मुलं अभ्यासांतहि हुशार आहेत असं पाहूनच आम्ही घेत असतों. भाग्याला आमच्या मेळ्यांत खुशाल येऊं दे. त्याच्या अंगांत धर्मप्रेम, स्वदेशाभिमान आणि सभाधीटपणा असे गुण संचारल्याशिवाय रहाणार नाहींत.'

✦ ✦ ✦

## ३ : : : भगवंत मेळ्यांत जातो

भगवंताला मेळ्याकरतां वेगळा पोषाख त्याच्या मामानं तयार केला. उत्तर हिंदुस्थानांतले पुरभय्ये घालीत असत तशी पातळ पांढरी तिकोनी टोपी, पिवळट रंगाचा सदरा, अरुंद पन्ह्याचं धोतर अन् जानव्याप्रमाणें डाव्या खांद्यावरून जाणारा तांबड्या कापडाचा पट्टा असा तो एकरूपी पेहराव होता. त्या पट्ट्यावर 'सन्मित्रसमाज' अशीं ढोबळ अक्षरं काढलेलीं होतीं. गणेशचतुर्थीच्या आधीं महिनाभर मेळ्याच्या पदांची तालीम चाले. भाऊ अन् भाग्या दोघेहि लवकर जेवून रात्रीं आठाला मेळ्याची तालीम करायला जात ते रात्रीं १२ वाजतां परत येत. दिवभसर भगवंत तीं पदं गुणगुणत असे. तें ऐकून बाबांचा राग वाढत चालला. ते म्हणत, 'मी ह्याला पहांटे उठवून ब्रह्मकर्म शिकवायला लागलों तेव्हां जागरणं अन् मेंदूला ताण वगैरे सबबी काढून तुम्ही तें सगळं बंद करायला लावलंत अन् आतां रात्रीं १२ पर्यंत जागरणं अन् दिवसभर वेडी-वांकडीं पदं गुणगुणणं ह्यांनीं मात्र त्या मेंदूला ताण पडत नाहीं वाटतं!'

मी त्यांना म्हणालें, 'दुसऱ्यांनीं लादलेलं शिकणं नि आपण हौसेनं शिकणं यांत अंतर आहे. आपल्या आवडीनं माणूस जागरण करतं तेव्हां त्याला जागरणाचा त्रास वाटत नाहीं, पण दुसऱ्यानं झोपेंतून उठवलं म्हणजे मात्र जागरणाचा त्रास होतो.'

शेवटीं एकदांची गणेशचतुर्थी आली. ठिकठिकाणीं सार्वजनिक गणपती बसले. शोभेच्या दृष्टीनं शालुकराच्या बोळांतला भाऊ रंगाऱ्याचा गणपति फार चांगला होता. त्याच्यापुढें बागबगीच्याचा देखावा केला होता अन् त्यांत देवांची अन् राक्षसांचीं सुरेख चित्रं होतीं. मंडईतला प्रचंड गणपति अन् त्याचे पाय

चोळणारी सारजा होती, तशीच आज पन्नास वर्सं आहे अन्



कोतवाल चावडींतला एकटाच आसनमांडी घालून बसलेला मोठा थोरला गणपतीहि होता तसा अजून आहे. टिळकांच्या वाड्यांतला गणपति जरी फारसा मोठा नव्हता तरी रात्री त्याच्याजवळ टिळकपरांजप्यांसारखे मोठे लोक बसत असत. म्हणून त्याचं महत्त्व विशेष होतं. सध्याकाळच्या वेळीं निरनिराळ्या लोकाची लेचकरं गणपतीपुढें होत अन् रात्रीं मेळ्याची पदं म्हटलीं जात. एकामागून एक असे मेळे गणपतीपुढें येत अन् आपापली हजेरी देऊन नारळ घेऊन पुढें जात. माझा भाऊ अन् मुलगा मेळ्यांत असल्यानं मला मेळ्यांविषयीं फार कळकळ वाटे. सगळ्या मेळ्यांत टापटीप, चांगला पोषाख, चांगले आवाज अन् चुरचुरीत पदं ह्या गोष्टींत सन्मित्रसमाज कोणाला हार जात नसे. सगळ्या नवीन गोष्टीं-

वर कडकडीत टीका करावी ती ह्या मेळ्यानं. जुन्या चांगल्या चाली जाऊन सुधारकांनीं समाजांत कसं थैमान चालवलं होतं ते ह्या पदांत किती खुमासदार रीतीनं वर्णन केलं आहे !

**चालरीत सारी गेली,**
**नित्य नवीं सोंगें आलीं।**
**आला रामाचा कंटाळा**
**पाहवेना कृष्ण डोळा।**
**रविवारीं होती गोळा**
**प्रार्थना समाजीं ॥**

लोकांना हॉटेलांत जाऊन खाण्याची चटक नुकतीच लागली होती. तिच्याबद्दल ह्या मेळ्याची कविता ऐका.

**"ओ ओ" वासुंदीला करती,**
**सोडावॉटरला मिटक्या देती ॥**
**किती होत चहा कॉफीचीं दुकानें पहा गल्लोगल्लीं,**
**गर्दीला परमावधि**
**म्हणे मालक भजी सरली।**
**मिळेना घरच्या पोरां भात**
**तेथें दिडकीचा सिंगल घेत॥**

त्या काळांत टिळक अन् गोखले यांच्यामधून विस्तव जात नव्हता. गोखल्यांच्याविषयीं मेळ्यांतल्या पदांत जळजळीत शब्द वापरीत असत अन् ऐकणारे लोक टाळ्यांचा कडकडाट करीत असत. त्यांतलं एक पद मला आठवतं आहे तें म्हणून दाखवतें :—

**राजमान्य सर्व्हंटराज हा**
**नामदार गोपाळ (म्हणजे गोखले !)**
**भाषणशैली विशाळ गाढी**
**वाणी मधुर रसाळ।**
**जनानखान्यांतील हा खोजा**

**म्हणूनि राहे मवाळ ।**
**कुठें हिरा हा (म्हणजे टिळक बरं का?)**
**कुठें हीर हा (म्हणजे गोखले!)**
**कुठें रवि ? कोळसा कुठें ?**
**शुद्धशील हा राजहंस,**
**बघ हा मोरींतील गाळ ।।**

अशा कविता मोठ्या गंमतीच्या होत्या अन् त्या म्हणणारांना लोकमान्यांच्या हातून स्वदेशी टोप्या, नारळ आणि बत्तासे मिळत असत.

मेळ्यांचा धांगडधिंगा संपला. भाऊकडे येणाऱ्या लोकांची गर्दी ओसरली. भाऊचं लक्ष पुनः त्याच्या टिश्शू रेमिडीकडे लागलं, पण लोकांचं लक्ष त्याच्याकडे लागेना. बिचारा दिवसभर विजारबूट, नेक्टा घालून गिऱ्हाइकांची वाट बघत दवाखान्यांत बसे. एखाद वेळीं कुणीतरी त्याला विचारी, 'डॉक्टर, ते अमकेतमके कुठें रहातात हो?' त्याला नीट ऐकूं आलं नाहीं तर आशा वाटे कीं आपल्याबद्दलच चौकशी करताहेत अन् म्हणून तो आशाळभूतपणानं 'काय' म्हणून विचारी. मग तें माणूस सांगे, 'मी विचारलं सरंजाम्यांचा वाडा इथें आसपास आहे का?'

मग तो रागावून म्हणे, 'हा दवाखाना आहे, इन्फर्मेशन ब्यूरो नाहीं तुम्हाला माहिती द्यायला!'

एक दिवस अग्निहोत्री त्याला म्हणाले, 'भाऊ, इथें जो तू नुस्ता बसून माशा मारतोस त्यापेक्षां तुझ्या ह्या टिश्शू रेमिडीज्वर पुस्तक लिही कीं लहानसं?'

अगदींच स्वस्थ बसून रहाण्यापेक्षां लिहिलेलं बरं म्हणून त्यानं समोर चार इंग्रजी बुकं ठेवून त्यांच्यांतली माहिती घेऊन मराठींत माहितीचं बुक तयार केलं. 'बारा क्षार' असं नांव अगदीं गांवठी दिसेल म्हणून त्यानं पुस्तकाला 'जीवन चिकित्सा' असं लठ्ठ नांव दिलं.

मग त्यानं सुताराकडून शंभर पेट्या करविल्या. प्रत्येक पेटींत एक बारा भोकं पाडलेला तक्ता बसवला. त्यांतल्या प्रत्येक भोकांत क्षाराच्या औषधाची एकेक बाटली बसवली अन् जीवनचिकित्सेचं बुक नि बारा औषधांची पेटी अशा ह्या जोडीला 'फिरता वैद्य' असं नांव दिलं. वर्तमानपत्रांत फिरत्या वैद्याच्या जाहिराती दिल्या. एका नाटकी मुलाला पागोटं घातलेल्या वैद्याचं सोंग देऊन मेळ्यांतल्या पदांसारखं पद त्याच्याकडून पाठ करवून त्याला रस्तोरस्तीं प्रचार करायला पाठवलं. त्याच्याबरोबर पेट्या घेऊन हिंडणारा हमालहि होताच. एक दिवस हा नाटकी पोरगा आपलं गाणं बरोबर म्हणायचं विसरला

पहा हो सुन्दर बारा क्षार
करिती रोगांना हे ठार

असं म्हणायच्या ऐवजीं 'करिती रोग्यांना हे ठार' असं भलतंच म्हणत सुटला.



'पहा हो सुन्दर बारा क्षार, करिती रोग्यांना हे ठार'

सगळ्या गांवांत फिरत्या वैद्याची चेष्टा झाली. मग भाऊनं नवी कविता रचली नि तो पोरगा ती म्हणत फिरूं लागला.

खर्चुनि रुपये पांच
घेई तू रुचिर क्षार हे बारा,
सेवुनिया नियमानें
करतिल तव रोग सर्व पोबारा।

कांहीं केल्या रणछोड रॉयच्या पेटचा खर्चाच्या मानानं फायदा देत नव्हत्या. त्याच्या धर्तीवर दुसऱ्या पुष्कळांनीं पेटया काढल्या. एकानं आयुर्वेदिक तर दुसऱ्यानं इंग्रजी औषधांची; एकानं अत्तरांची; एकानं कुंकू, गंध, भस्म अशा धार्मिक वस्तूंच्या अशा पेटचाच पेटचा निघाल्या. पण ही कल्पना पहिल्यांदा काढणारा भाऊ मात्र कोरा राहिला.

एक दिवस भाग्या शाळेंतून लवकर परत आला. त्याच्या डोक्यावर टोपी नव्हती. अंगावर कोटविजार पण नव्हती. खाकेंतलं दप्तर माझ्यासमोर आदळून मला तो म्हणाला, 'आई, वंदे मातरम् !' विलायती कापडाच्या कपडचांची आम्ही होळी करून टाकली.'

मी म्हणालें, 'तुला कोणाची तरी द्रिष्ट लागलेली दिसती आहे, बाळ. वांदरम् वांदरम् काय अन् होळी काय, तुझ्या बोलण्याला ठिकाणच उरलं नाहीं.'

तो म्हणाला, 'अग आई, देशाला आग लागली आहे, पारतंत्र्याच्या नरकांत तो खितपत पडला आहे.'

'अरे, पण तुझी टोपी अन् कोटविजार काय झाली ? एकाद्या भिकाऱ्याच्या पोरासारखा सदरा अन् लंगोटी लावून बोडखाच शाळेंतून घरीं आलास हें मला पसंत नाहीं.'

भाऊचा मेळ्यांतला मित्र राजा तिथें आला. मी त्याला विचारलें, 'अरे, हा भाग्या असं काय करतो आहे ? आग कुठें लागली अन् देश नरकांत पडला आहे असे चमत्कारिक हा कां बोलत आहे ?'

राजा म्हणाला, 'काकू, तुम्हांला माहीत नाहीं कां, देशांत केवढी मोठी चळवळ सुरू झाली आहे ती? इंग्रज सरकारनीं बंगालचे दोन तुकडे केल्यामुळें सगळी जनता खवळून गेली आहे. लोकमान्य टिळक, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी अशा पुढाऱ्यांनीं विलायती मालावर बहिष्कार टाकायचं ठरवलं आहे. आज सगळ्या मुलांनीं विलायती कपड्यांची होळी करून टाकली. तुमच्या भगवंताचे अगदीं जरूरी पुरते कपडे अंगावर ठेऊन बाकी सर्व पेटवून दिले. आतां त्याला स्वदेशी कापडाचे, कपडे शिवा.'

भाग्याचं अभ्यासावरचं लक्ष उडालं. त्या स्वदेशी चळवळींत तो अगदीं मिसळून गेला. विलायती कापडाच्या होळ्या करायच्या, टिळक, खापर्डे अशा पुढाऱ्यांचीं लेचकरं ऐकायला जायचं, मवाळांच्या भाषणांत जाऊन गडबड उडवून द्यायची, असे त्याचे उद्योग चालू झाले. त्याच्या बरोबरच दारूबंदीची चळवळ चालू होऊन तो दारूच्या गुत्त्यावर जाऊन दारू पिणाऱ्या लोकांना मारहाण करूं लागला. ह्या चळवळीला पिकेटींग असं कायसं नांव होतं. मला तर वाटूं लागलं पोरगा बिघडला, पण भाऊला तसं वाटत नव्हतं. तो म्हणे, 'ताई मुलगा बिघडला नाहीं. शाळेंतला अभ्यास करून मॅट्रिक किंवा बी. ए. व्हायचं अन् सरकारच्या कारकूनरूपी गुलामांत भर टाकायची हेंच तुझें ध्येय असेल तर तो बिघडला असं म्हणतां येईल. पण ह्याहिपेक्षां मोठालीं ध्येयं जगांत आहेत. भगवंत देशाचा उद्धार करण्याकरतां जन्मलेला आहे; परक्या सरकारची गुलामगिरी पत्करण्याकरतां नाहीं.'

'मला नाहीं जायचं ह्या निमसरकारी शाळेंत सरकारचा गुलाम व्हायला. उद्यांपासून मी राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या विद्यालयांत जाणार!' एक दिवस तो टोपी आपटीत आपटीत म्हणाला, 'आमची शाळा दरवर्षी गव्हर्नरला बोलावते अन् शाळेचे चालक इंग्रज अधिकाऱ्यांच्या हातून बक्षीसं वाटवतात.

मला नाहीं आवडत ही गुलामगिरी. उद्यांपासून आम्हीं भोपटकरांनीं काढलेल्या महाराष्ट्र विद्यालयांत जाणार आहों.' मला ह्यांतलं कांहींच कळेना. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे त्यांत वेगळं काय असतं तेंच मला कळत नव्हतं. पण इतकं मात्र खरं कीं मामलेदारीची वाट राष्ट्रीय शिक्षणांतून जाणारी नव्हती.

अग्निहोत्र्यांना बोलावून आणून त्यांच्याकडून भाऊला पुष्कळ सांगितलं, 'भाऊ, तू राष्ट्रीय म्हणविणाऱ्या जहाल पुढाऱ्यांच्या आहारीं गेला आहेस पण हें तुझ्या हिताचं नाहीं. ज्यांच्या पदरीं चार पैसे आहेत, ज्यांना कुटुंबपोषणाची फारशी जबाबदारी नाहीं त्यांनीं ह्या चळवळीत पडावं. आपल्यासारख्या गरिबांनीं ह्या भानगडींत पडू नये.'

भाऊ काय त्यांच ऐकतो ? त्याच्या अंगांत स्वदेशी, बहिष्कार, वंगभंग संचारलीं होतीं. ह्या चळवळीपासून मुलांना आईबाप नि दुसरी वडीलधारी माणसं मूर्ख वाटायला लागून लेचकरं झोडणारे पुढारी शहाणे वाटूं लागले. तो म्हणाला, 'वा: मामा ! देशसेवा ही काय सुखवस्तु लोकांची मिरास आहे कीं काय ? गरिबांनाय् देशसेवा करायचा हक्क आहे.'

'हें बघ बाळ, तुझ्याशीं वादविवाद करायची माझी इच्छा नाहीं पण मी तुला एवढंच सांगतों तू नूतन मराठी सोडून एकाद्या राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळेंत जाऊ नको. सरकारची असल्या राष्ट्रीय म्हणवणाऱ्या ( अग्निहोत्री नेहमीं राष्ट्रीय शब्दापुढें 'म्हणवणाऱ्या' असं म्हटल्याखेरीज रहात नसत.) शाळांच्यावर वक्र दृष्टि रहाणारच. पुढेंमागें सरकार असल्या शाळा बंद केल्याशिवाय रहाणार नाहीं' – अग्निहोत्री.

'तसं झालं तर आम्ही नूतन मराठींत परत येऊं !

'परत कोण घेतय् ? राष्ट्रीय शाळेंतल्या मुलांना कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी शाळेंत प्रवेश देऊं नका असा वटहुकूम निघणार आहे समजलास ? डायरेक्टरचे पर्शियन

असिष्टण प्रार्थनासमाजांत येतात त्यांनीं स्वतः मला सांगितलं.' अग्निहोत्री.

'त्यांचा मला काय धाक घालतां? ही सगळी तुमची मवाळांचीच कामगिरी असली पाहिजे'– भाग्याच्या ह्या उद्धट उत्तरानं मला फार राग आला.

'भाग्या, असा लहान तोंडीं मोठा घास घेणं बरं नाहीं. ते तुला चांगलं हिताचं सांगायला आले आहेत अन तू त्यांला मवाळ नि टवाळ म्हणतो आहेस हें बरं नाहीं. अरे तुझ्यावर माझे डोळे लागले आहेत, तू केव्हां परीक्षा पास होतो आहेस नि तुला रोजगार केव्हां लागतो आहे याची मी वाट पहातें आहें'– मी कळवळयानं बोलले.

त्याला त्याचं कांहीं वाटलं नाहीं. चतकोर भाकरीसाठीं मी सरकारची गुलामगिरी करणार नाहीं, नूतन मराठींतले मास्तर हें आमचें गुरूच नव्हत, अशी बरीचशी पोपटपंची त्यानें केली, तेव्हां अग्निहोत्री म्हणाले, 'भगवंत, टिळकांनीं तुम्हां मुलांना राष्ट्रीय शिक्षण घ्या असं सांगितल आहे पण हे पुढारी स्वतःच्या पदराला खार लागू न देतां परोपदेशे पांडित्य करीत असतात. त्यांनीं आपले मुलगे न्यू इंग्लिश स्कूलमधून काढून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्थेंत घातले आहेत का?'

त्याच्याजवळ उत्तर तयार होतं. 'तो तर त्यांचा थोरपणा आहे. लोकांच्या मुलांचं कल्याण व्हावं असं त्यांना वाटतं पण न्यू इंग्लिश स्कूलबद्दल त्यांच्या मनांत द्वेष नाहीं हें जगाला ते दाखवून देत आहेत.'

अग्निहोत्री त्याच्या उद्धट उत्तरापुढें गप्प बसले. मी तर बोलून चालून बिनशिकलेली त्याच्या पुढं काय चालणार माझं? होऊं द्या जें व्हायचं असेल तें असं मनांत आणलं. भाग्यानं नूतन मराठी सोडली नि राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळेंत तो जाऊं लागला. वन्दे मातरम्, मनाचे श्लोक, शिवाजीचे पोवाडे यांचा घोष घरांत चालू लागला. गीतेचे श्लोक पाठ म्हणणं, केसरी

काळांतले लेख वाचणं यांचा सपाटा दुसऱ्या पोरांना बरोबर घेऊन होऊं लागला. मधून मधून हीं पोरं विलायती कापडाची होळी करून टाकीत. एक दिवस मी सहज आपल्या सवाष्ण-पणांतल्या लुगड्याखणांचं गाठोडं धुंडाळूं लागलें तर अर्धी-अधिक लुगडीं नि भगवंताच्या वडिलांच्या कपड्यांतले बहुतेक सगळे रेशमी नि लोकरी कपडे नाहींसे झालेले दिसले !

मी संशय तरी दुसऱ्या कोणावर घेणार ? घरांतल्या माणसां-वर संशय घेतला असता तर केवढा हाहा:कार झाला असता. अलीकडे भाऊच्याविषयीं माझं मन बिघडत चाललं होतं. त्याची वैद्यकी म्हणा कीं डॉक्टरकी म्हणा तिचा धंदा नीटसा चालत नसून त्याचा खर्च मात्र बराच वाढला होता. रोजच्या रोज त्याच्याकडे मित्रांचं टोळकं जमा होत होतं नि जहाल-मवाळ, कॉंग्रेस, स्वदेशी, बहिष्कार, पिस्तूल, बाम्ब असे शब्द नि पुष्कळशा लोकांची नांवं त्यांच्या गप्पागोष्टींत निघत. हे लोक जमल्यावर त्यांचं यथेच्छ खाणंपिणं व्हायचं; चहावर मजुरांचं रक्त शिंपडलं असल्यामुळें त्याच्या ऐवजीं मसाल्याचं दूध घेत असत, एवढ्या सगळ्याला भाऊ पैसा कुठून आणीत असेल ? अर्थात् माझ्या पैशाची वेवस्था त्याच्याकडे होती त्यांतूनच हा खर्च भागत असला पाहिजे. कदाचित् त्यानं तर आमचे कपडे पळवून नेऊन विकले नसतील ?

पण प्रत्यक्ष भावावर असा आळ घालणं त्रासदायक झालं असतं. घरांत वावरणारं दुसरं माणूस म्हणजे विठी मोलकरीण. कपड्याच्या चोरीबद्दल मी तिच्याजवळ गोष्ट काढली मात्र तों तिनं असा आक्रस्ताळीपणा केला कीं ज्याचं नांव तें !

ती मोठमोठ्यानं ओरडत म्हणाली. 'अव वैनी, तुमच्या सासऱ्याच्या वक्तापासून ह्या घरांत मी काम करतें आहे पर सुतळीचा तोडा उचलून नेला नाहीं. बंडोदादा ह्या ह्या हाता-वर खेळवून लहानाचा मोठा केला ती काय त्याच्या बायकोचं कपडं चोरायला ? अगदीं तुमच्या भागोबाच्या पायाशपथ मी

सांगतें. एक सूत दिखित तुम्ही दिल्या बिगर तुमच्या घरांतून मी नेलं नाहीं तसं मला काढून टाकायचं असलं तर उद्यांपासून नोकरीवर येऊं नको असं सांगा पर खोटा आळ आणून मला उडवून देऊं नका.' असं म्हणून ती आपल्याच तोंडांत मारून घेऊं लागली.

मी गोंधळांत पडलें. माझ्या नव्या जाऊबाईनीं तिला कामावरून दूर केलं होतं. कारण त्यांना विठीबद्दल ममता वाटत नव्हती. स्वतःच्या घरीं राहून त्या घराबद्दल आपुलकी वाटण्याचा त्यांनीं यत्नच केला नव्हता.उलट आपल्या आईलाहि त्यांनीं कायम घरांत आणलं होतं नि तिच्या तंत्रानं त्या वागत होत्या. माझं तसं नव्हतं. मी जरी बाबांना नि भाऊला आमच्या घरीं आणलं होतं तरी शाळिग्रामांचं घर ऐनापुऱ्यांच्या आहारीं जाऊं दिलं नव्हतं. विठीला तिच्या इतक्या वर्षांच्या प्रेमळ चाकरीनंतर अंतर देणं माझ्या हातून कधींही घडलं नसतं. मी तिची समजूत घालूं लागलें कीं, तुझ्यावर चोरीचा आळ घालीत नाहीं पण कपडे कुणीं नेले तें तुला माहीत असतील.

'ई बया, मला माहित असतं तर कोणाला हात लावू दिला नसता' असं ती म्हणते एवढ्यांत भगवंत बाहेरून आला नि कसली एवढी गडबड चालली आहे असं त्यानं विचारलं. माझ्या जुन्या कपड्यांच्या गाठोड्यांतले रेशमी नि लोकरी कपडे नाहींसे झाल्याचं त्याला मी सांगितलं तेव्हां तो हासून म्हणाला, 'अग्नये स्वाहा.'

'म्हणजे रे काय ?' मी विचारलं.

'म्हणजे दुसरं तिसरं कांहीं नाहीं. ते सगळे कपडे विलायती होते, म्हणून शनवारवाड्यापुढं परवां जी विलायती कपड्यांची होळी झाली तिच्यांत मीं त्यांची आहुति देऊन टाकली,' काडीचं भय न बाळगतां भाग्यानं सांगून टाकलं. 'कर्म माझं!' एवढेच शब्द कपाळाला हात लावून मी म्हटलें.

◆ ◆ ◆

# ४ : : सासूबाईचा आमच्या घरावर मोर्चा

वासूभावोजी आमच्या अर्ध्या वाड्यांत रहात होते; त्यांच्या घरी त्याची बायको कमळाबाई, कमळाबाईची विधवा आई माई, माझ्या सासूबाई आणि बनूवन्स इतकी मंडळी रहात होती. सासूबाई नि बनूवन्संनी भावोजींच्या पहिल्या बायकोला छळून मारून टाकलं नि माझाय् छळ करायचा यत्न केला पण तो माझ्या पक्केपणामुळें फुकट गेला ही गोष्ट जगभर झाली होती. म्हणून कमळाबाईच्या आईनं पहिल्यांदाच भावोजींकडून कबूल करून घेतलं कीं, मी आपल्या सासूला आमच्या घरीं राहून घेईन अन् त्यांची हुकमत माझ्या आईला न् बहिणीला मानावी लागेल. त्यांतून माई कांहीं रिकाम्या हातानीं आल्या नाहींत. रविवारांतल्या एका घराचं भाडं, पांच हजाराच्या परमेश्वरी नोटा नि पांच हजाराचं सोनं मोती त्यांनीं बरोबर आणलं होतं नि तें सगळं त्यांच्या मागें कमलाबाईचं होणार होतं.

माईनी भावोजीच्या घरांत पाऊल टाकल्यावर थोडे दिवस सासूबाईशीं नि बनूवन्संशीं गट्टी ठेवली होती; पण थोड्या काळानं त्याच स्वरूप प्रकट व्हायला लागलं.

पश्चिम नि दक्षिण दिशाला खिडक्या असणारी अन् पूर्व नि उत्तरेला बंद असणारी एक खोली घरांत माडीवर होती. उकाड्याच्या दिवसांत या खिडक्यांतून वारा येतो नि थंडीच्या दिवसांत उन्ह येतं म्हणून सासूबाईला नि वन्सना ती फार आवडे. मामंजी मेल्यापासून त्या दोघीनीं तेंच आपलं हेड क्वार्टर केलं होतं. माईला उकडायला लागलं नाहींतर उन्हांत पडावसं वाटलं तर त्याहि त्या खोलींत पाय पसरायला लागल्या. थोड्याच दिवसांनीं भटाला दिली ओसरी नि भट हातपाय

पसरी अशांतली गत झाली. एक दिवस सासूबाई न् वन्सं कसब्याच्या गणपतीला रोजच्याप्रमाणें जाऊन आल्या नि पाहतात तर त्यांचं सामान खोलीच्या बाहेर माडींत टाकून ठेवलेलं अन् खोलीला कुलूप ठोकलेलं! दोघी तरातरा खालीं उतरल्या; माई नि भावोजी झोपाळ्यावर अन् कमळाबाई पोत्यावर बसल्या होत्या. आदल्या रात्रीं तीं तिघं शाहूनगरवासी कंपनीच्या 'कांचनगडच्या मोहनेला' गेलीं होती, त्या नाटकांत कुणी चांगलं काम केलं वगैरे गप्पा चालल्या होत्या त्यांच्या.

'हें रे काय वासू, माझ्या खोलीला कुलूप कुणीं ठोकलं ?' सासूबाई झोपाळ्यासमोर उभ्या राहून दोन्ही हात कमरेवर ठेवून गरजल्या.

'बस् प्रोज काम करावं गणपतरावनीं न् स्त्रीपार्टी बाळू जोगनींच. आमचा बंडू नाटकांत रहाता तर त्यानंय् रंगभूमि गाजवली असती–' सासूबाईंच्या गरजण्याकडे लक्ष न देतां भावोजी बोलत राहिले.

'खरंच बाई, मीं एकदाच त्यांचं काम पाहचलं सत्यविजयमधें, पण तेव्हां मी फार लहान होतें न् तेहि माझे भावोजी झालेले नव्हते. काम बरीक चांगलं केलं त्यांनी असं सगळी जणं–' कमळाबाई बसल्याबसल्याच म्हणाल्या.

त्या मंडळींनीं आपलं लक्ष दुसरीकडे आहे असं दाखवण्याचं मुद्दामच सोंग चालवलं आहे हें सासूबाईनीं सहज ओळखलं. त्या पुनः म्हणाल्या, 'कमळा, वासू ! अरे आमच्या खोलीला कुलूप कुणीं लावलं नि सामान सगळं बाहेर काढून टाकलं आहे ?'

'कमळा, कांहीं रीत आहे का नाहीं तुला? आई इथें उभी आहे नि तू खुश्शाल बसून राहचली आहेस!' वन्सं रागानं म्हणाल्या.

'अहो या ना, तुम्ही पण बसा इथें चोफाळ्यावर. कोणी उभीं, कोणी बसलेलीं अशीं कशाला पाहिजेत?' माई म्हणाल्या.

‘ मीं विचारलेल्या प्रेश्नाचं उत्तर द्या, मला दुसऱ्या भानगडी नको आहेत ’——सासूबाई.

‘ कोणता बाई प्रेष्ण ?’ माई न् कमळाबाईनीं एकदम विचारलं ! त्यांत ‘ कोणता बुवा प्रश्न ?’ ह्या भावोजींच्या आवाजाची भर पडली.

‘ दोनदा पुसलं तरी ऐकूं नाहीं का आलं ? सासूबाईनीं विचारलं.

‘ मुद्दाम कान झाकून घेणाराला ऐकू कसं येईल ? ’ वन्स म्हणाल्या.

‘ मा—झ्या—खो—ली—ला—’ सासूबाई एकेक अक्षर मोजून बोलूं लागल्या तितक्यांत कमळाबाई वेडयाचं सोंग घेऊन म्हणाल्या, ‘ तुमच्या खोलीला ? ’

‘ कोणती तुमची खोली ? ’ माईनीं जोड दिली.

‘ अरे चोरांनो, असा डाव आहे का तुमचा ? वासू !’

मुलाच्या नांवानं हंबरडा फोडून सासूबाई म्हणाल्या; ‘ बघ रे बाबा, आमच्या घरात घुसून आम्हालाच घालवून देती आहे तुझी सासू ! गोगलगाय नि पोटांत पाय ! लग्न व्हायच्या आधीं माझ्या गळ्यांत पडून म्हणत होती, काकू, माझी मुलगी तुमच्या मुठींत आवळ्यासारखी राहील, तुम्ही कांहीं काळजी करूं नका न् आतां माझ्या खोलीतून मला बाहेर काढायला बघती आहे. ’

भावोजी म्हणाले, ‘ आई, तुला ठाऊकच आहे माईची प्रकृति दम्यामुळ हल्लक झाली आहे. त्यांना तळमजल्यावरची ओलसर जमीन सोसत नाहीं. ती वरची खोली त्यांना द्यायचं मी ठरवलं आहे. ’

हें ऐकतांच सासूबाईच्या मस्तकांतील आग घराच्या छपरापर्यंत गेली. त्यांच्या तळपायांत आग कधींच नव्हती; ती नेहमीं मस्तकांतच असे. वन्संच्या अंगाचा भडका झाला. सासूबाई म्हणाल्या, ‘ वाश्या, मेल्या, तुला आईपेक्षां सासू जवळची वाटते होय ? बाईलबुद्ध्या, दुसरी बायको असली म्हणून काय झालं

तूं कांहीं म्हातारा बिजवर नाहीं आहेस. चल, आण त्या खोलीची किल्ली.'

माई शांतपणें म्हणाल्या, 'काकू, आतां तुम्ही अहेवपणाची ऐट विसरून गेलं पाहिजे. आतां ह्या वाड्याची मालकीण माझी कमळी आहे. तुम्ही फक्त अन्नवस्त्राच्या हक्कदार आहां नि स्पष्ट सांगते, बनुताईचा इथें रहायचा मुळीच हक्क नाहीं. जोपर्यंत भाऊभावजयींशीं त्या आर्जवून रहात आहेत तोपर्यंत त्यांना आम्ही इथें राहूं देऊं. या पुढें खोलीबिली विसरा. देव-घरांत पूजा करीत बसा. नाहीं तर ओसरीवर डाळ तांदूळ निवडीत बसा. इथें ओसरीवर रात्रीच्या पडत जा. खोली कशाला पाहिजे, तुम्हांला ?'

'अन् तुम्हांला तरी कशाला पाहिजे ? ह्या घरांत येऊन रहाण्याचा तुम्हांला काय हक्क आहे ?' —सासूबाई.

कमळाबाईनी 'माई ह्या इथें फुकट रहात नाहींत. तिला जो खर्च लागतो त्याच्या चौपट रक्कम ती आम्हांला दरमहा पोंचवित असते. इतकंच नाहीं तर तिचं घर, पैसे सगळं कांहीं तिच्यामागून आम्हांलाच मिळायचं आहे. तिची नि तुमची तुळणा मुळींच व्हायची नाही.' असें उत्तर दिलें. आणखी पुष्कळ वेळ बाचाबाची चालली होती. शेवटीं रडारडीवर प्रकरण आलं तेव्हां मी मध्ये पडलें. तळमजल्यावरची एक खोली रिकामी करवून तिच्यांत सासुबाईचं सामान ठेवायचं अन् तिच्यांतच त्यानीं नि वन्संनी निजायबसायचं अशी तडजोड मी करून दिली अन् परत घरीं आलें.

आगीवर कितीहि राख टाकून ती दडपायचा यत्न केला तरी निदान धुमसल्याशिवाय ती रहात नाहीं. तडजोड ही आगीवर टाकलेल्या राखेसारखीच दुबळी असते. वैराची आग ती कायमची दडपून टाकूं शकत नाहीं. मायलेकींच्या दोन्ही जोड्यांत सारखे खटके उडत असत. घराचे मालक सासूच्या आहारीं गेले असल्यानं आमच्या सासूबाईंची नेहमीं विटंबना होत असे. रात्रींच्या वेळीं सासूबाई नि वन्स यांना जेवायचं

नव्हतं, फराळ करायचा होता. पण कधीं दाणे किंवा केळीं संपली तरी एक एक दिवस आणायचं नाहीं. दुपारच्या वेळीं त्यांना उरलं असलेलंच खायला मिळायचं, लुगडी फाटली तरी लवकर नवीन घ्यायची नाहींत, अशा प्रकारें त्यांचे हाल व्हायला लागले. आतां मात्र आपल्या सुनांचे आपण कसे हाल केले त्यांची जाणीव सासूबाईना होऊं लागली. माई जरी विधवा होत्या तरी त्या सोवळ्या झाल्या नव्हत्या. रात्री भरपूर जेवत असत. इतकंच नाहीं तर कानांत कुडी, गळयांत सोन्याची सांखळी नि हातांत एक एक बांगडी असे डागहि त्यांनी कायम ठेवले होते.

सासूबाईचे दागिने बऱ्याच किंमतीचे होते. ते त्यांनी भावोजींच्या स्वाधीन केले नाहींत. समजा उद्यां आपलं नि आपल्या मुलाचं पटल नाही तर कांहीं वर्षं तरी त्यावर आपली निभावणी होईल अशी त्यांची खात्री होती. वन्संनी मात्र बरोबर कांहींच आणलं नव्हतं अन् त्यांना पोटगीचे सहा रुपये देखील सासरहून मिळत नव्हते. त्यांची स्थिति अगदीच केवलवाणी झाली होती. आईला सुद्धां त्या जड वाटू लागल्या होत्या. एक दिवस भावोजी सगळ्यांच्या देखत म्हणाले, ‘ हल्ली हिंगण्याच्या आश्रमांत गरीब विधवांना फुकट राहूं देतात अन् शिकवतात. फार चांगली सोय झाली आहे विधवा मुलींची, नाहीं ?’

कमळाबाई हासत म्हणाल्या, हा शाळिग्रामांचा वाडा हा सुद्धां एक विधवाश्रम झाला आहे. सासूबाई, माई, वन्स नि बाई. चौघीजणी विधवा इथें रहात आहेत. ’ आपल्या बोलण्याचं इतकं कौतुक त्यांना वाटलं कीं त्या हासत सुटल्या. ही थट्टा वन्संना फार झोंबली नि त्या म्हणाल्या , ‘तूंच एक बाकी आहेस आश्रमांत यायची !’ सगळ्यांनाच राग आला त्यांच्या अभद्र बोलण्याचा अन् भावोजी रागानं म्हणाले, ‘ काय ग, भावाच्या जीवावर उठली आहेस, होय ? तुला ह्या घरांतून घालवून दिलं पाहिजे !’

**माई म्हणाल्या, ‘ ही बनी आईबापांनीं लाडावल्यानं फार**

शेफारली आहे. खरोखरीच तिला इथें राहून देतां कामा नये खायला काळ नि भुईला भार !'

सासूबाईंना फार वाईट वाटलं. त्या म्हणाल्या, ' बिचारीवर अजाण असतांनाच दैवाची कुऱ्हाड पडली. नवरा काळा का गोरा तें सुद्धां तिनं बघितलं नाहीं. अशा दुर्दैवी पोटच्या गोळ्यावर आम्ही जीव की प्यार केलं ह्यांत कुठं चुकलं ? नका तिला घालवून देण्याची भाषा काढूं. वाटलं तर मला उपाशी ठेवा पण तिला खायला घाला.'

मी वन्संना मुद्दाम माझ्याकडे बोलावून आणलं अन् त्याच वेळीं रेणूकाबाई अग्निहोत्रींना भेटवलं. वन्संनी माझे नि राधाबाईचे जे हाल केले होते त्याच्याबद्दल काळानं पुरता सूड घेतला होता. त्यांच्याबद्दल प्रेम नसलं तरी दया मला वाटू लागली होती. असल्या स्थितींत भावजयीकडे आंसवांनीं भिजलेले भाकरीचे तुकडे मोडण्यापेक्षां हिंगण्याच्या शाळेंत जाऊन राहिलेलं काय वाईट ? असं त्यांच्या मनावर आम्ही ठसवलं. त्याहि कबूल झाल्या. सासूबाईचं मन वळवणं थोडं कठीण गेलं. दहा वर्ष शरीराच्या अवयवाप्रमाणें वागवलेल्या मुलीची ताटातूट त्यांना सहन होईना.

हिंगण्याच्या शाळेंतल्या नादाऱ्या संपल्या होत्या म्हणून आम्ही सात रुपये महिना द्यायचं कबूल करून अग्निहोत्र्याच्या ओळखीनं बनूवन्संना तिथल्या शाळेंत घातलं. सातांपैकीं तीन रुपये महिना मी, तीन सासूबाईनीं नि एक भावोजींनीं द्यायचा असा आमच्यांत ठराव झाला. वन्संना पोचवायला सासूबाई रेणुकाबाई नि मी अशा तिघी बैलाचा छकडा करून हिंगण्याला गेलों होतों. लकडीपूल ओलांडून डाव्या हाताकडे वळायचं नि नदीच्या काठांकाठांनं दोन कोस अंतर खांचाखळग्याच्या वाटेनं जायचं कीं आलं हिंगणं. वाटेनं पेरूच्या नि केळयांच्या बागा दुतर्फा होत्या नि झाडींतून वाट होती म्हणून मला पुष्कळ मजा वाटत होती. पुष्कळ वर्षांत मला अशा गांवाबाहेरच्या हिरव्या गार वाटेनं जायला मिळालं नव्हतं.

वन्सं मात्र आईपासून ताटातूट होणार म्हणून सारख्या रडत होत्या, सासूबाई स्वतःचं दुःख बाजूला ठेऊन त्यांचं समाधान करीत होत्या. आठवड्यांतून एकदां मी येऊन तुला भेटत जाईन; नि सणावारीं तुला बोलावीत जाईन जेवायला, त्या म्हणाल्या.

‘ नको ग बाई मला तें वाशाकडे जेवायला येणं. तें कांहीं आतां माझं माहेर राहृयलं नाहीं आई. माझ्याशीं हेवादावा करणाऱ्या कमळाबाईचं घर आहे तें; मीं आतां सासरामाहेराला दोन्हीला मुकलें ’ — बनूवन्सं.

रेणुकाबाईना आतां वन्संच्या बद्दल प्रेमाचा पुळका आला. त्या म्हणाल्या, ‘आक्का, तुम्ही अनाथबायकाश्रमांत रहायला लागलांत ना कीं चार दिवसांत तुम्हांला माहेर लाभल्यासारखं वाटेल बघा. सगळ्या मुलींबद्दल आण्णा नि बायाला इतकी वाटते माया कीं त्यांनाआईबापांचा विसर पडतो. पार्वतीबाई, वेणूबाई ह्या जशा आपल्या मावशा आहेत असं तुम्हांला वाटेल. ’

‘ त्यांतून वन्सं जेव्हां जेव्हां तुम्हांला आश्रमांत कंटाळा येईल तेव्हां तेव्हां भगवंतच्या घरीं येत जा. सणासुदीला तुम्हाला बोलावणं धाडीन तेव्हां येत जा. आपल्या धाकट्या भावाचं घर आहे तें’— मलाहि पुळका आला.

मानी स्वभावाच्या वन्संना माझ्या ह्या आमंत्रणानं चांगल्याच टांचण्या बोचल्या असल्या पाहिजेत. त्यांनीं मला कांहींच उत्तर दिलं नाहीं. थोड्याच वेळांत आम्ही हिंगण्याच्या अनाथबायकाश्रमांत पोचलों. आश्रम म्हणजे एक पत्रें घातलेली झोपडी अन् एक लहानसं दगडी धर्मशाळावजा घर एवढाच होता. पण नवीन शाळेचा पाया खणीत होते. तिथं आफिसांत एक पुरुष न् दोनतीन बायका होत्या. त्यांनीं रेणुकाबाईला ओळखलं. वन्संना त्या पुरुषानं कांहीं प्रश्ण विचारले, त्यांचं नांव लिहून घेतलं. झोपडींतल्या एका मुलीला बोलावून सांगितलं, ‘ही बनूताई ढेकणे आपल्या आश्रमांत नवीन आली

आहे. तिला एक जागा दाखवून द्या. बनूताई, ह्या सगळ्या तुमच्या बहिणी आहेत. त्यांच्याशीं प्रेमानं वागा.'

तिथें असलेल्या बायकांपैकीं एक आम्हांला छकड्यापर्यंत पोचवायला आली. ती पहिल्यांदा म्हणे सोवळी झाली होती, पण आतां मानेपर्यंत तिचे केस वाढले होते. बनूवन्सं असले थेर न करोत म्हणजे मिळवलं असं मला वाटलं. वन्संच्या वांचून सासूबाई म्हणजे शेपटावांचून उंदीर असं मला भासलं. तसं वाटणं चांगलं नाहीं पण वाटणं नि स्वप्न पडणं ह्या गोष्टी माणसाच्या हातच्या नाहींत. बाबांचं न् माझं लग्न लागतंय् असंसुद्धां मला एकदां स्वप्न पडलं होतं—कोणाजवळ बोलूं नका हो!

सासूबाई एकटया पडल्यावर त्यांच्यावर विहीण नि सून यांच्याकडून फारच हल्ले चढू लागले. भावोजी कोणाचीच बाजू घेत नसत. सासूबाईनीं एकदा आपल्या चादरीला साबण लावायला प्रारंभ केला तेव्हां माईनीं आपल्या लेकीला विचारलं, 'कमळे, हल्लीं बाजारांत साबू बराच स्वस्त झाला आहे म्हणे.'

दुसऱ्या एका वेळीं त्यांची चादर त्यांनीं नुसतीच आपटून धोपटून धुतली तेव्हां त्या म्हणाल्या, 'कमळे, अग त्या भडमुंजाचं धोतर आपल्या घरीं कसं आलं?'

एखादे वेळीं माई मुलीला विचारीत, 'कमळे, दूध इतका वेळ तापत ठेवलं आहे पण त्याच्यावर साय कशी आली नाहीं?' कमळाबाई म्हणाल्या, 'ती म्हातारी भाटी साय खायला फार सोकावली आहे. तिनंच मटकावली असेल.' दोन वेळां सासूबाईनीं ऐकून घेतलें. पण तिसऱ्या वेळीं त्या म्हणाल्या 'मला समजतात असलीं घालून पाडून बोलणीं. मला म्हातारी भाटी म्हणणं अन् साय खाल्याचा आळ माझ्यावर आणणं ही हलकटपणाची सीमा झाली. देवा रे देवा? जिथें फुलं वेंचलीं तिथें आतां गोवऱ्या वेंचण्याचा प्रसंग माझ्यावर आला आहे.'

नुसत्या बोलण्यांनींच सासूबाईंना त्रास होत होता असं नाहीं. त्यांच्या धुतलेल्या लुगडयाला पारोशानं शिवायचं; त्यांच्या अंग धुण्याच्या वेळीं न्हाणीघरांत खूप वेळ बसून रहायचं, त्यांच्याकडे कोणी आलं तर घरांत नाहीत असं खोटं सांगायचं हेहि प्रकार चालू झाले; पण सगळ्यांत कळस केला तो असा:— त्यांचे स्त्रीधनाचे दागिने त्यांनी डब्यांत घालून तो डबा त्यांना मिळालेल्या खोलींतल्या फडताळांत कुलुपांत ठेवून दिला होता. त्या फडताळाची किल्ली सासूबाई कधीहि विसंबत नव्हत्या. बन्सं होत्या तिथपर्यन्त फडताळावर पाळीपाळीनं त्या नजर ठेवीत. पण एक दिवस खोलीला कुलुप घालायचं विसरून त्या कथेला गेल्या असतांना दाराशीं किल्लीवाला ओरडत आला. माईनीं त्याला आंत बोलावून घेतल अन् सांगितलं, 'अरे, ह्या फडताळाची किल्ली हरवली आहे. हें कुलूप काढून दे अन् नवी किल्ली करून पाहिजे.' थोडा वेळ पैशाबद्दल घासाघीस घालून किल्लीवाल्यानं फडताळ उघडून दिलं. माईचं काम झाल्यावर परत त्याला कुलूप बसलें.

दोन दिवसांनीं सासूबाई सरदार पुरंदऱ्यांकडे गीता ऐकायला गेल्या होत्या. पुरंदऱ्यांचं अन् त्यांचं माहेरून नातं होतं. म्हणून पुरदरे मंडळी त्यांच्याशीं घरगुती गोष्टीहि बोलत. सौ. सरदारीणबाई म्हणाल्या, 'मावशी, तुला मोत्याची परीक्षा चांगली आहे. माझ्याकडे सराफानं एक आड गिऱ्हाईकी नथ विकायला आणली आहे. करशील कां तू तिची किंमत?'

हल्लीं आपल्याला नीट दिसत नाही वगैरे सबबी सांगून सासूबाईनीं नथ पाहायला मागितली. नथ पहातांच त्या चमकल्या. त्यांच्यानं कांहीं बोलवेना. सरदारीणबाईंना जरा आश्चर्य वाटलं अन् त्या म्हणाल्या, 'मावशी, असं फिट् आल्यासारखं काय करतेस ? हल्लीच्या तुझ्या स्थितींत नथ बघवत नसली तर माझंच चुकलं, मला क्षमा कर.'

'ताई, तुझं चुकलं नाहीं. स्वतःला नथ घालायची नसली तरी आपल्या लेकीसुनेनं घातलेली पहावी असं आमच्यासार

त्यांना वाटतंच. पण आत्तां मी बावचळलें आहें याचं कारणं इतकंच कीं ही नथ माझीच दिसते आहे अन् ती सराफाकडे गेली कशी याचा उलगडा झाला पाहिजे.'

'खरं कीं काय? तर मग ह्याची शहानिशा झालीच पाहिजे, पार्वती, दगडोबाला म्हणावं, ताबडतोब टांगा जोड. ही शेवटची आज्ञा मोलकरणीला होती. दोघीजणी टांग्यांतून प्रथम भावोजीच्या घरी आल्या. सासूबाईनीं फडताळ उघडून पाहिलं तेव्हांच त्यांच्या ध्यानांत आलं कीं इथें कांहीं तरी गडबड आहे. डब्याचं झांकण लावायचं राहिलं होतं. डबा खाली काढून पहातात तर त्यांत नथ नाहीं. लागलीच त्यांनीं डबा परत ठेवून फडताळाला कुलूप लावलं अन् दोघी भराभर घराच्याबाहेर पडल्या. 'अहो ताईसाहेब, जर थांबा कीं, कुंकू लावून तरी जा,' असं ओरडणाऱ्या माईच्याकडे त्या दोघींनीं पाह्यलंच नाहीं. त्या दोघी घाईनं आल्या काय अन् गेल्या काय? यांतली खुबी माईना कळाली नाहीं. अर्ध्या तासानं पुरंदऱ्यांचा टांगा परत भावोजींच्या दाराशीं उभा राहिला. मघाच्या दोघी उतारूंशिवाय एक गुजराती गृहस्थ टांग्यांतून आला होता. तिघांना माईनीं झोंपाळ्यावर बसवलं आणि आपण समोरच्या पोत्यावर बसल्या. कमळाबाई त्यांच्याशेजारी दाटीनं बसल्या.

'केशवलालभाई, ही नथ तुम्हाला कोणी दिली विकायला?' सरदारीणबाईंनीं सराफाला विचारलं.

'तें आम्ही सांगूं शकत नाहीं ताईसाहेब. दागिने विकायला काढायची पाळी येणं लाजिरवाणं असतं अन् म्हणून विकणारांची इच्छा नसते आपलं नांव प्रसिद्ध व्हावं अशी. आपल्याला निदान सराफ तरी नथ कोणाची आहे तें सांगणार नाहीं.' सराफ नम्रपणाचं सोंग आणून म्हणाला.

'तुम्ही नका सांगूं. म्हातारीनं कोंबडं झाकलं म्हणून सूर्य-चंद्र उगवायचे रहात नाहींत. माई, बोला ही नथ तुम्ही

केशवलालकडे विकायला ठेवलीत कीं नाहीं ? 'सरदारीण-बाईनीं मोठ्या दिमाखानं विचारलं.



" हो हो, दिली नथ मग पुढें काय म्हणणं आहे ? "

माईची गाळण उडाली पण कमळाबाईनीं कंबरेला पदर खोवून उभ्या राहून पैलवानी ऐटींत विचारलं, ' हो हो दिली; मग पुढें काय म्हणणं आहे ?

सासूबाईना सुनेच्या या अगाऊपणाचा राग आला नि त्या म्हणाल्या, ' कमळा, तुला कुणीं मधें बोलायला सांगितलं आहे? ताईसाहेबांच्या पुढें अशा गमजा चालायच्या नाहींत समजलीस! त्यांचे यजमान अन्नावारी मॅजिस्ट्रेट आहेत. खोटं सांगितली तर चावडीवर रवानगी होईल. '

ास

माई आपल्या मुलीला शांत करीत म्हणाल्या, ' कमळे, तूं मधें बोलूं नकोस. तुझ्या सवतीच्या मरणापासून ह्या वाड्यावर पोलिसची वाकडी नजर आहे. ( हें ऐकतांच सासूबाईचा चेहरा आंबट लोणचं खाल्ल्यासारखा झाला. ) उगीच त्याला डिवचण्यांत अर्थ नाहीं. हें बघा ताईसाहेब, कमळीच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नका. ही नथ मींच केशवलालभाईकडे किंमत करायला दिली होती.'

केशवलाल सराफांनीं सांगितलं, 'किंमत करायला असं आपण बोलल्या नव्हतां माईसाहेब. गिऱ्हाईक बघायला असं आपण म्हणाल्या होतात.'

'त्याचाच अर्थ तो. नुसतीच किंमत करायला म्हटलं असतं तर तुम्ही कांहींतरी थातुरमातुर आकडा सांगून टाकला असता म्हणून गिऱ्हाईक बघायला असं म्हटलं–' माई.

भगवंत तिथें ताजी केसरी वाचीत उभा होता अंगणांत, त्याला सांगून सासूबाईनीं मला बोलावून आणलं. केशवलाल भाईनीं माझ्या हातांत नथ ठेऊन विचारलं, 'बाई, ही नथ कोणाची आहे तें तुम्ही सांगूं शकाल का!'

सासूबाईची नथ माझ्या पक्क्या ओळखीची होती पण जरा उलथी पालथी करून निरखल्याची बतावणी करून मी म्हटलं, 'ही आमच्या सासूबाईची आहे.'

'ऐकलंत माई?' सरदारीणबाई म्हणाल्या.

'ऐकलं बरं ताईसाहेब. पण मी कुठं, माझी आहे, नाहीं तर माझ्या मुलीची आहे असं म्हटलं आहे?' माई म्हणाल्या.

'मग तुमच्या हातीं आली कशी? सरदारीणबाईंनीं विचारलं.

'विहीणबाइनींच ती माझ्याजवळ दिली नि ओळखीच्या सराफाकडून हिची किंमत करवा न् गिऱ्हाईक मिळालं तर पहा असं सांगितलं नि आतां हा शुद्ध कांगाव चालला आहे अजाणतेपणाचा!' माईनीं ओरडा केला. शेजारचे चार लोक येऊन

दरवाज्यांत गंमत पहायला जमले. सराफांनीं नथ माईंच्या हातावर ठेवली न म्हटलं, 'माईसाहेब, ह्या डागाच्या मागें अशी कांहीं भानगड असेल असं मला वाटलं नव्हतं, तुमच्याजवळून घेतली न चारचौघांसमक्ष परत तुम्हांला दिली. माझ्याकडे कांहीं देणंघेणं नाही. मी आपला जातों.'

असं म्हणून सराफ निघून गेले. माईनीं नथ सासूबाईंच्या अंगावर फेकली अन् म्हटलं, 'ठेवा तें सुंकलं तुमचं तुमच्याजवळ! कुठून तरी माझ्यावर चोरीचा आळ आणून मला घरांतून घालावायचा तुमचा डाव होता तें मला समजलं.'

'आजकाल खरं कळत नाहीं न् खोटं कळत नाहीं. मावशी, तुझी नथ तुला परत मिळाली ना? बरं झालं. मी आतां जातें. तिकडे टांगा पाहिजे असेल कोडतांत जायला. कमळाबाई, मला कुंकू लावा मर्जी असली तर,' असं म्हणून कुंकू लावून घेतल्यावर सरदारीणबाई गेल्या.

भावोजी आल्यावर ह्या सगळ्या बनावावर सपाटून भांडण झालं. भावोजींनीं शेवटी आईला सांगून टाकलं. 'आई, एका गंगाळांत दोन तपेल्या तरंगत ठेवल्या तर त्या एकमेकींवर आपटायच्याच. त्यांतली एक उचलून बाजूला ठेवली पाहिजे.'

'मला तरी घरांत ठेव, बाबा, नाहींतर माईला तरी ठेव,' सासूबाई म्हणाल्या,

'माई रहाणारच, तुम्ही आपला विचार करा,' कमळाबाईंनीं निक्षून सांगितलं.

'ऐकलंस का रे? तुलाय तसंच वाटतं आहे ना?'

मोठ्यानं हासून भावोजी म्हणाले, 'अग आई, बिजवर नवऱ्याला स्वतःचा आवाज असतो का? अन् मला बिजवर व्हायची पाळी तुझ्यामुळेंच आली आहे!'

दुसऱ्या दिवशीं आपल्या कपड्यांचं गाठोडं न् दागिन्यांचा डबा घेऊन सासूबाई आमच्या घरीं आल्या. 'भीमा, आतां नाहीं मला त्या माईचा न् कमळीचा सासुरवास सहन होत!

माझे सगळे अपराध पोटांत घालून तूं मला तुझ्याकडे थारा देत असलीस तर ठीक आहे नाही तर राधेला मीं ज्या विहिरींत लोटली तिच्यांत लोटून दे मला !' त्यांना दुःखाचा उमाळा आला.

मेलेल्याला काय मारायचं ? चार माणसांत पांचवे जड नव्हतं. 'रहा आमच्याकडे, तुमच्या नातवाचंच घर आहे.' मी म्हणालें.

✦ ✦ ✦

# ५ : स्वदेशी चळवळींत भगवंत आणि भाऊ

आमच्या वाड्यांत अशी एक जागा होती कीं सहज तिचा पत्ता कोणाला लागायचा नाही. मागल्या पडवीच्या खालीं एक बळद होतं. हल्लीं त्याला तळघर म्हणतात. बळदांत जायची वाट पडवीच्या मागल्या अंगणांतून होती. सहज कोणाच्या लक्षांत ती वाट येत नव्हती. बळद करणारांनीं जुन्या काळीं पेंढारी किंवा शत्रू लुटायला आले तर लपून बसायकरतां केलेलं असावं. पावसाळ्यांत त्यांत पाणी येत असल्यानें लांकडं किंवा गोवऱ्या ठेवायला त्याचा उपयोग होत नव्हता म्हणून तें रिकामंच पडलेलं होतं. भाऊनं तें स्वच्छ करून आंतल्या भिंतींना चुना लावला. मग त्याच्या अन् मित्रांच्या सभा त्या बळदांत होऊं लागल्या. भाग्यालाही त्या सभेंत घेतलं होतं. त्याचं अभ्यासावरचं लक्ष उडालेलं दिसत होतं. त्यांच्या तोंडून लाल-बाल-पाल, बहिष्कार, स्वराज्य, होमरूल, अशा शब्दांशिवाय दुसरं कांही निघेना. बाबा तर म्हणाले, 'ह्यापेक्षा तो पूर्वीं कोंबडीचें अंडें, गोमांस, डुक्कर म्हणत होता ते वेडेवांकडे शब्द पुरवले. त्यांतून अलिकडे तो बाम्ब शब्द वापरतो त्यानं तर माझ्या पोटांत धडकीच भरते.'

मी म्हणालें, 'ह्या शब्दांचा अर्थ तरी काय आहे? अन् ह्यांत भ्यायसारखं कांहीं आहे असं तुम्ही कशावरून म्हणतां?

बाबांनीं सांगितलं, 'अग, मी गणपतीला जातों ना रोज, तिथें आमच्यासारखी भिक्षुक मंडळी जमतात, तेव्हां गप्पा निघतात. विलायती साखऱ्यांत गाईचं रक्त अन् हाड (विष्णवे नमः) घातलेली असतात म्हणून यजमानाला ताकीद द्यायची कीं तुम्ही विलायती साखरेचं पक्वान्न कराल तर आम्ही तुमचं आमंत्रण घेणार नाहीं. इंग्रज लोकांना घालवून देऊन शिवाजी-

सारखं स्वराज्य स्थापन करणार आहेत म्हणे टिळक. सगळा मूर्खांचाच बाजार आहे झालं.'

मी विचारलं, 'अन् होमरूळ तो काय अन् तो कसा घ्यायचा ? '

बाबांनीं सांगितलं, 'होमरूळ नव्हे, होमरूल. स्वराज्याबद्दल तो इंग्रजी शब्द आहे. कांहीं तरी अचरटपणा करायला लागले आहेत हे इंग्रजी शिकलेले लोक. चांगली नोकरी चाकरी करावी नाहींतर उद्योगधंदा करावा, पैसे मिळवावे अन् आमच्यासारख्या सत्पात्र ब्राह्मणांना दक्षिणा देऊन पुण्य संपादन करावं तें राहृयलं बाजूला अन् लागले आहेत नादीं ह्या टिळकाच्या !'

मी म्हणालें, 'टिळक, परांजपे, खापर्डे थोर वजनदार पुढारी आहेत.'

बाबांना हासूं आवरेना. ते हसणं पुरें करून म्हणाले, 'टिळक एवढा वजनदार असला तर बघा गंमत. त्याच्या शिफारसपत्रानं एखाद्या आफिसांत पट्टेवाल्याची सुद्धां नोकरी कोणाला मिळते का पहा. तें राहूं दे बाजूला, पण भिमे, मला सांग भावड्यानं परवा नारळाच्या पोतंभर करवंट्या कशाकरतां आणून ठेवल्या ? गंधकाचा वास तर बळदांतून गेले दोन दिवस सारखा बाहेर येतोच आहे. तूं विचारलं आहेस कां त्याला ह्या बाबतींत कांहीं? '

'हो मीं विचारलं, घरांत असले ज्वालाग्रही जिन्नस कशाला आणले आहेत ?' तेव्हां तो म्हणाला, आम्ही आतां दिवाळींतली देशी दारू करायचा कारखाना घातला आहे. परदेशी फटाके, चंद्रज्योतीच्या काड्या, राखेचे साप आणखी असल्या दारूऐवजीं फुलबाज्या, हापटबार, सात बारी फटाके, वगैरे देशी दारू वापरा असा देशांत प्रचार करणार आहों. त्यासाठीं असे

कारखाने गांवोगांव निघत आहेत. त्यांतला मुख्य बंगालमध्यें आहे.'

बाबा म्हणाले, 'मला हें लक्षण ठीक दिसत नाहीं. ठकार भटजी सांगत होते, हल्लीं स्वदेशी चळवळवाले तरुण उडवा-यच्या दारूच्या नांवाखालीं बाम्ब तयार करायला लागले आहेत. बाम्ब म्हणजे कसा असतो हें त्यांनीं पाहृचलं नाहीं पण तें एक भयंकर हत्यार आहे म्हणतात.'

एवढ्यांत भगवंत आमचं बोलणं ऐकून जवळ आला अन् म्हणाला, 'आई, आजोबा, मी सांगतो बाम्ब म्हणजे काय तें लोकमान्यांच्या शब्दांत. तो एक तोडगा आहे. ती एक जादू आहे, मंत्र आहे, स्वराज्यसोपानावर चढायची ही एक शिडी आहे. बाम्ब हे आधुनिक काळाचं सुदर्शनचक्र आहे. समजलं बाम्ब म्हणजे काय तें ?' त्याच्या शेवटल्या दोन शब्दांबरोबर तोफेसारखा बार होऊन सगळा वाडा हादरला. माझी गाळण उडाली तर बाबांचे डोळे पांढरे झाले. भगवंत घाबरला नाहीं. पण त्याला आश्चर्य वाटल्यासारखं दिसलं, 'आं? आमच्या कारखान्याला जरा आधींच सुरवात झाली असं दिसतं. हा स्फोट घरांत होणं म्हणजे पोलिसच्या तावडींत सांपडण्या-सारखंच आहे.' असं म्हणून तो मागल्या पडवीकडे धांवत गेला. मीहि त्याच्या मागोमाग गेलें. बळदांतून धुराचा लोट बाहेर पडत होता नि आंतलीं माणसं खोकून खोकून बेजार झालीं होतीं. धूर कमी झाल्यावर मी अन् भगवंत बळदांत उतरलों. भाऊसकट पांच जण तिथें होते. आम्हांला पहातांच त्यांतल्या एकानं प्यायला पाणी मागितलं. मी वर जाऊन भरलेली कळशी अन् भांडं घेऊन आलें. सगळे पाणी प्याले. भाऊशिवाय बाकीचे सुरक्षित होते पण त्याचे मात्र दोन्ही हात अन् तोंड भाजलेलं होतं. 'करतां करतांच पेढा फुटला' असं तो पुटपुटला. सगळ्यांनीं मिळून त्याला वर आणलं, त्याच्याच खोलींत त्याला आणून निजवलं आणि डॉ. मुंगळ्यांना

बोलावणं पाठवलं. पंधरा मिनिटांत डॉ. मुंगळे आले. ' बरंचसं भाजलेलं आहे. मी औषधोपचार करायला तयार आहे पण ससूनमध्यें नेलेलं बरं.' असं मत त्यांनीं दिलं.

एक मित्र म्हणाला, 'नको रे बाबा ससून. तिथं नेलं म्हणजे सगळी चौकशी व्हायची. काय करतांना हात भाजले, तुम्ही सगळे तिथें काय करीत होता वगैरे आडवे तिडवे प्रश्न विचारतील अन् जागेचा तपास करायला येतील.'

' म्हणजे तशी कांहीं भानगड आहे कीं काय या केसमागें? आपण नाहीं बुवा ही केस हातांत घेणार? उगीच पोलीसचं झेंगट मागें लागायचं'– डॉ. मुंगळे म्हणाले. मी जवळच उभी होत्यें. 'वा: डॉक्टर, तुम्ही आमचे फ्यॅमिली डॉक्टर नि भाऊ लहानपणापासनं तुमच्याकडे ये जा करीत होता. पोलीसला भिऊन भाऊची केस सोडून देणं शोभेल का तुम्हांला?'

डॉक्टरनीं कांहीं उत्तर दिलं नाहीं पण एक जुनं धोतर मागितलं. भाजलेल्यावर कांहीं पातळ औषध शिंपडून मग मलम लावलं आणखी मीं दिलेल्या जुन्या धोतराच्या पट्ट्या फाडून त्या जखमांवर बांधल्या. ही सारवार चालत असतांना दोन उंच पुरुष आमच्या दाराशीं आले. त्यांतला एक हिंदु नि दुसरा मुसलमान होता. त्याचा पोषाक पोलिशी दिसत नसला तरी त्यांच्या बोलण्याचालण्यांवरून नि उर्मट वागणुकीवरून पोलीसमधले असल्याचे उघड दिसत होतं.

तो हिंदु म्हणाला, 'थोडया वेळापूर्वीं बार ऐकू आला तो ह्या घरांतूनच का?'

'इथें तर नाही बुवा कांहीं बारबीर झाला, पलीकडच्या आळींत असेल कदाचित्' –भाऊच्या मित्रांपैकीं एक हरिभाऊ भागवत म्हणाला.

'हा हा मिस्टर भागवत, आमच्या लिस्टांत तुमचं नांव आहे बरं का? जबाब देतांना संभाळून देत जा?' मुसलमान मनुष्य म्हणाला, 'अन् काय हो डॉक्टर मुंगळे साहेब, बॅण्डेज कोणाला बांधून राहिले आहांत?'

'हे आहेत ना डॉक्टर रणछोड रॉय? बर्नींगची केस आहे· बसले असतील स्टोपाशीं कारभार करीत?'

'कुठं कारभार करीत बसले असतील तें मी पक्कं जाणून आहे डॉक्टरसाहेब! जें न देखें रवी, तें देखे कवी; तसं जें न देखे कवी, तें देखे पोलीस शिपाई; न चाले तेथें कुणाची कारवाई; समजलं? जरा आम्हाला पाहूं द्या ना तुमच्या पेशंटची तब्यत?'

त्या दोघांनीं भाऊकडे पाहिलं; एकमेकांकडे पाहिलं; भोंवतालच्या लोकांकडे पाहिलं. मग तो मुसलमान म्हणाला, 'बाबूराव, आपल्या ओळखीची मंडळी आहेत. आपण घराची झडती घेऊं.'

मी आपली घरांत आलें. पुरुषमंडळींत फार वेळ उभी कशी राहूं? त्यांतल्या त्यांत खरं सांगायचं म्हणजे माझी घाबरगुंडी उडालेली होती. बाबाय् सारखे आंत बाहेर करीत होते. पोलिस लोकांनीं भाऊला ताब्यांत घेऊन डॉ. मुंगळच्यांना रजा दिली; दुकानच्या खोलींतल्या सगळ्यांचीं नांवें टिपून घेतलीं; आतां ते घराची झडती घेणार आहेत अशा बातम्या ते घेऊन येत होते. आम्ही भगवंताला भावोजींच्या घरीं पिटाळलं, नाहींतर त्याचंहि नांव टिपून घेतलं असतं.

कांहीं वेळानं पोलिसमधले पांचसहा लोक आमच्या घरीं आले. ते यायच्या अगोदर बाबांनीं बळदाच्या वाटेंत लाकडं न् गवऱ्यांचा ढिगारा रचून ती वाट दिसेनाशी केली होती; त्यामुळें अमृत पत्रिकेचे, केसरीचे न् काळाचे कांहीं अंक, थोडीशीं टपालांतून आलेली पत्रं न् ज्वालामुखी मलमाच्या लेबलं न चिकटवलेल्या शेंपन्नास डब्या यांशिवाय पोलिसांच्या हातीं कांहीं लागलं नाहीं.

पोलिसांनींच भाऊला ससून इस्पितळांत पोचवलं. बाबा न् मी रोज त्याला खाणं नेत होतों. त्या खाण्याचा डबा पोलिस लोक तपासून मगच आम्हांला आंत जाऊं देत होते. भाऊ बरा

झाल्यावर त्याच्यावर खटला भरावयाचा सरकारचा विचार होता, पण त्यानं सांगितलं स्टो पेटवतांना त्याचा भडका झाला न् त्यांत माझे हात आणि तोंड भाजलं. बार झाला होता हें खरं पण तो आमच्या घरांत नाहीं. ह्या सगळ्या वेळांत भाऊला न् त्याच्या योगानं आम्हांला फार त्रास झाला. वेळीं अवेळीं वाटेल ते फडतूस शिपुरडे आमच्या घरीं येऊन वाटेल ते प्रेष्ण विचारीत, दम देत, वाटेल ती वस्तु उचलून नेत. भगवंत राष्ट्रीय शाळेंत जात होता म्हणून त्याच्यावर पोलिसची संकरांत येईल अशा भयानं बाबा त्याला घेऊन मुंबईस प्रेम-जीच्या चाळींत कानजी धरमदासकडे महिनाभर रहायला गेले होते. हा कानजी आमच्या बाबांचा शिष्य होता. असं मी मागल्या खेपेला तुम्हांला सांगितलंच आहे. इकडे सगळं कांहीं स्थिरस्थावर झाल्यावर भाऊनं बाबांना पत्र लिहिलं नि मग ते दोघे पुण्यास परत आले. थोड्याच दिवसांनीं भगवंत जात होता तें महाराष्ट्र विद्यालय सरकारच्या दडपशाहीमुळं बंद झालं; त्या शाळेंतल्या मुलांना कोणत्याहि शाळेंत घेऊं नये असा हुकूम निघाला, अन् मुलाचं आतां काय करावं अशी काळजी उत्पन्न झाली. तळेगांवला समर्थ विद्यालय नांवाची शाळा निघाली होती. अन् तिच्यांत त्याला घेतलं असतं पण मुलाला आपल्यापासून दूर ठेवायला मी तयार नव्हते. अशा वेळीं माझं काम करणारे एक अग्निहोत्री काय ते उपकारी पुरुष होते. द्रौपदीच्या प्रत्येक हांकेला जसा कृष्ण धांवून येत होता तसे माझ्या प्रत्येक अडचणीच्या वेळीं अग्निहोत्री किंवा त्यांची बायको उपयोगी पडे. त्यांनीं नूतन मराठींत जाऊन हा मुलगा कांहीं दिवस आजारी पडला होता म्हणून शाळेंत येऊं शकला नाहीं अशा तऱ्हेचा अर्ज करून भगवंताला पुनः शाळेंत घातलं. त्याचंहि स्वदेशी चळवळीवरचं प्रेम थोडसं कमी झालं होतं. कारण स्वदेशीच्या नादानं कित्येकांचे झालेले हाल त्यानं ऐकले होते. भाऊच्या डोक्यांतलं स्वदेशीचं प्रेम मात्र कायम

राहिलं होतं. त्यानं आतां वर्तमानपत्र काढलं होतं, त्याचं नांव 'हिंदसेवक'. आमच्या घराच्या पुढील रस्त्यावरची दुकानवजा खोली हेंच हिंदसेवकचं कार्यालय झालं. बळदामधला दारूचा कारखाना मी हट्टानं काढून टाकविला. एक तर पोलिसांची भीति अन् दुसरं म्हणजे एकादे वेळीं भडका झाला तर आमच्या घराचे बारा वाजायचे. ह्या गोष्टींत भाऊ किंवा त्याचे मित्र यांची काडीमात्र भीड मी बाळगली नाहीं. बळदाचा उपयोग कोऱ्या कागदाचे गठ्ठे, हिंदसेवकाच्या न खपलेल्या अंकांची रद्दी, मोबदला येणाऱ्या पत्रांची नि मासिकांची रद्दी ठेवण्याकडे होऊं लागला. हिंदसेवकमध्यें काय मजकूर येत होता तें कोणी वाचून दाखविल्याशिवाय मला समजत नव्हतं ; पण त्याचा बराचसा खर्च माझ्याच अंगावर पडत होता. भाऊला मात्र एडिटरसाहेब अशी पोकळ पदवी मिळाली होती. पुष्कळ दिवस तें पत्र चाललं अन् शेवटीं भाऊला एक वर्षाची शिक्षा झाली अन् पत्र बंद पडलं.

भगवंत परत अभ्यासाला लागला होता. रात्रीं अकरा वाजेपर्यंत जागून नि पहांटे साडेपांचला उठून तो जेव्हां शक्लुपच्मुच् किंवा ट्रायअँगल्, इक्वल किंवा बॉटल ऑफ बाटरलू असं कांहीं तरी घोकीत बसे तेव्हां माझ्या कानांत कोणी अमृत घालीत आहे असं मला वाटे. त्याला पुष्कळ श्रम पडत म्हणून मी स्वतःचं दूध तूप कमी करून त्याला खायला देत असें. जागरणानं त्याचं कपाळ दुखत असे म्हणून तेल लावून चेपीत असें. पहिल्याच वर्षीं तो मॅट्रिक झाला तेव्हां आम्हांला सगळ्यांना आनंद झाला. त्यानंतर दर वर्षीं पास होत तो सेकंड क्लासांत बी. ए. झाला. प्रत्येक परीक्षेला त्याला मुंबईस जावं लागे नि बाबा त्याला घेऊन कानजी धरमदासकडे उतरत असत. जसे कांहीं तेवढ्या करतांच ते जगले होते ; कारण भगवंत बी. ए. झालेला त्यांनीं ऐकलं आणि लगेच एक रुपयाचे दोन शेर पेढे दगडू हलवायाकडून विकत घेऊन ते घरीं आले. मला म्हणाले, 'ह्यांतले

पावशेर पेढे कसब्याच्या गणपतीला प्रसाद म्हणून दाखवतो अन् मग बाकीचे वांटायला काढूं.' असं म्हणून ते गणपतीला गेले. परत येतांना ठेंच लागायचं निमित्त झालं अन् खालीं पडले ते वर उठलेच नाहींत. ठकार भटजी आम्हांला सांगायला आले. नातू बी. ए. झाला तेव्हां गणपतीपुढें ब्राह्मण भोजन घाला असा थट्टेनें आम्ही आग्रह करीत होतों. त्या योगानं ऐनापुऱ्यांना हर्षवायु झाला असला पाहिजे अन् त्याच्या भरांत त्यांचा जीव गेला असला पाहिजे असा ठकारभटजींचा अंदाज होता. यथाकाल गोष्टी घडल्या म्हणजे कोणाला विशेष दुःख होत नाहीं. बाबांचं वय साठाहून अधिक झाल होतं; डोळ्यांत मोतीबिंदु अन् कानांत बहिरेपणाला प्रारंभ झाला होता. दांत पडून गेल्यानं चावण्याची अडचण होत होती. एकंदरीनं जगण्यापासून त्यांना त्रासच वाटत होता. नातवाला बी. ए. झालेला पाहून त्यांना कृतार्थपणा वाटल्यावर त्यांनीं मृत्युलोक सोडला हें काय वाईट झालं ?

भगवंत बी. ए. झाला म्हणून सासूबाईना, मला भावोजींना, कमलाबाईंना, माईना, अगदीं विठी मोलकरिणीला देखील आनंद झाला. आमच्या पोपटाला सुद्धां समजलं कांहीं-तरी चांगलं आपल्या घरांत झालं आहे. तो पंख फडफडवून भाग्या शाबास, भाग्या शाबास असं ओरडूं लागला. मात्र आम्हांला बाबांच्या मरणामुळें पेढे वाटतां आले नाहींत; बाबांच्या तेराव्यापर्यंतचे सगळे विधी भगवंतला करावे लागले; कारण भाऊ तुरुंगांत होता, तो नेमका चौदाव्या दिवशीं सुटला. आम्हांला अगोदर कांहीं कळालं नव्हतं कीं कांहीं नाहीं, दाराशीं टांगा येऊन थडकला. कोण आहे म्हणून मी पहायला जातें तर भाऊ अगदीं आजाऱ्यासारखा थकलेला टांग्यांतून उतरतो आहे. त्याला पाहून रस्त्यांतून जाणाऱ्या एका विद्यार्थ्यानं त्याचा हात धरून 'वंदे मातरम् डॉक्टर रॉय, सुटका झाली वाटतं तुमची ?' असं म्हटलं. 'येरवड्याच्या तुरुंगांतून माझी सुटका

झाली तेव्हां मला माझे कपडे परत देऊन जेलरनं दरवाज्यांतून घालवून दिलं. ओळखीपाळखीचं जवळपास कोणी दिसलं नाहीं. बन्‌गार्डनपर्यंत चालत आलों न्‌ हा टांगा बारा आण्याला ठरवून आलों,' भाऊनं सांगितलं.

'बारा आण्याला बंडपासून गांवापर्यंत यायला हा कांहीं गांवांतला टांगा नाहीं. लाल लेबलवाला लष्करचा फस्‌ क्लास टांगा आहे. सवदेशीवाले तात्या ! बंदा रुपाया टाका. सोजीर लोक तर पांचपांच रुपयांची नोट टाकतात माझ्या अंगावर हाये ठाऊक ?' टांगेवाल्यानं लेचकर झोडलं.

मी माझ्या पेटींतून एक रुपया काढून आणून भाऊजवळ दिलेला रुपया त्यानं टांगेवाल्याजवळ दिला अन्‌ म्हटलं दारूच्या नशेंत असले तरच ते पांचपांच रुपये देतात पण शुद्धींत असले तर कांहीं एक न देतां बुटाच्या लाथा मारून बराकींतून घालवून देतात तुम्हां लोकांना, मीं पाहचलं आहे अनेकदा! तुम्हां लष्कराच्या टांगेवाल्यांना आपल्या लोकांपेक्षां सोजीर लोकच जवळचे वाटतात.'

'आपले लोक काय दगडी देतात ? आम्हीं तर शहरच्या हद्दींतलं भाडं सुद्धां घेत नाहीं, आज आपला आलों म्हटलं सवदेशीवाले तात्या जेलमधून आले आहेत त्यांना द्यावं पोचवून. बिचारे सालभर खडी फोडून थकले असत्याल,' असं बोलून टांगेवाला निघाला. चार आणे परत दे असं भाऊ ओरडला तेव्हां तो हासत म्हणाला, 'आम्ही सुटचा चवल्यापावल्या जवळ ठेवीत नाहीं.'

भाऊ तुरुंगांतून सुटून आल्याची बातमी गांवभर पसरली. पुष्कळ लोक येऊन त्याला भेटून गेले. पुष्कळांनीं हार आणले होते. दुसऱ्या दिवशीं केसरी हापिसांत, सार्वजनिक सभेंत, भालाकार भोपटकरांच्याकडे आणखी कुठें कुठें त्याला पानसुपाऱ्या झाल्या. पण पुढें काय हा प्रेष्ण त्याच्या नि माझ्या डोळ्यापुढें उभा होता. हारांतलीं न्‌ गुच्छांतलीं फुलं खाऊन

त्यांच्यावर निर्वाह करतां आला असता तर टिळकांच्या चळवळींत शेकडों देशभक्त न् त्यांच्या कुटुंबांतलीं माणसं उपाशीं राहचलीं नसती.

बाबा गेले, भगवंत बी. ए. झाला, भाऊ तुरुंगांतून परत आला, ह्या गोष्टी पंधरा दिवसांत झाल्या; आणखीहि एक सांगण्यासारखी गोष्ट ह्या वेळीं झाली. सासूबाई न् दुसरी एक बाई माजघरांत बोलत उभ्या होत्या. ह्या नव्या बाईचे केस मानेपर्यंत होते, ती पांढरं पातळ नेसलेली नि पांढरी चोळी घातलेली होती. ही कोण नवी बाई सासूबाईशीं बोलत आहे असं मी आश्चर्य करतें आहें इतक्यांत तिनं मागें पाहचलं अन् कोण असेल सांगा बरं! अहो बनूवन्स होत्या त्या! सोवळ्या होत्या तेव्हां कशा उग्र, तापट दिसायच्या नि आतां कपाळावर विचरलेले केस, कानांत कुडीं, अंगावर चोळी नि तें पांढरं पातळ यांच्या शोभेनं किती प्रसन्न दिसत होत्या! यजमान (माझे, त्यांचे नव्हेत) स्त्रीवेष घेतांना असेच दिसत असतील. त्या हासतांना उजव्या गालाला पडलेली खळी नि त्यांच्या दांतांत पंगती तरी किती सुरेख दिसत होत्या! 'वन्स!' मी आश्चर्य, आनंद नि दुसऱ्या सगळ्या भावना कीं काय तुम्ही म्हणत्तां ना त्या एकवटून त्यांना हांक मारली. त्यांनींहि 'वहिनी!' असं दाटलेल्या कंठानं उत्तर देऊन मला पोटाशीं धरलं अन् म्हटलं, 'वहिनी ही आतां तुझी वैरीण असणारी वन्स राहिली नाहीं. पांच वर्षांत मराठी सात यत्तांचा अभ्यास करून मी फायनल झालें. आतां मला इंग्रजी शिकण्याकरतां पांच वर्षं टिकणारी कालरशिप मिळाली आहे. ती ह्या अटीवर कीं मी तें अमंगळ सोवळं पाळायचं नाहीं. ती अट पाळायला लागल्याबरोबर माझ्या तोंडाचा विद्रुपपणा जसा नाहींसा झाला तसा मनाचा दिखील नाहींसा होऊन गेला. यापुढें आपण दोघीं एकमेकींवर बहिणीसारखी माया करीत जाऊं. बरं पण भगवंत बी. ए. झाल्याचे पेढे मागायला आलें होतें,

तर कळलं कीं तुझे बाबा नुकतेंच स्वर्गाला गेले. एक गोष्ट वाईट झाली पण चांगल्या गोष्टीनं तिचा वचपा दसपटीनं भरून काढला.'

भगवंतला लहानपणीं माझ्यापेक्षां आत्याबाईचा लळा अधिक होता. अजूनहि तो तिला विसरला नव्हता. आठ दिवसांतून एकदां तो वन्संना भेटायला जाई. त्यांचं रूपांतर त्याला फारच आवडलं नि मला म्हणाला, 'आत्याबाईसारखं तूं कर.'

मी म्हणालें, 'वेड्या, आत्याबाईची गोष्ट वेगळी नि माझी वेगळी. त्यांनीं आपल्या पतीला पाहिलंहि नव्हतं. पण मी तुझी आई आहे. तुझ्या बायकोपुढें, मुलांपुढें कर्तव्यनिष्ठेचा नि धार्मिकपणाचा कित्ता असला पाहिजे. तीन वरसं कां होईना पण सौसार सुख मी भोगलं आहे. राहिलेला जन्म संन्यासांत घालवणं मला जड वाटत नाहीं. वन्संनीं जरी ह्यानंतर पुनर्विवाह केला तरी मला त्यांत मुळींच वाईट वाटायचं नाहीं.'

आतां नोकरी करावी का एल् एल्. बी. होऊन वकिली करावी हा प्रेष्ण भगवंतापुढें येऊन पडला. सासूबाई म्हणाल्या, 'एल एल. बी. व्हायचं म्हणजे त्यानं मुंबईस राहिलं पाहिजे. शिवाय दोन वरसं आणखी खर्च करीत बसायचं तेवढी ऐपत आपल्याला कुठें आहे?' वन्स म्हणाल्या, 'मास्तरकीसारखी हलकी नोकरी करण्यापेक्षां वकील होणं मानाचं आहे.' भाऊ म्हणाला, 'त्यानं वकील होऊन टिळक किंवा लाला लजपतराय यांच्यासारखा पुढारी व्हावं.' माझ्या मताला कोणीच भीक घालीना. एक सबंध दिवस ह्या चर्चेत गेल्यावर अग्निहोत्री आमच्याकडे आले ते म्हणाले, 'मास्तरकी आणि वकिली ह्या शिवाय जगांत दुसरे धंदेच नाहींत कीं काय? हा चांगला वरच्या क्लासांत नि आजपर्यंत नापास न होतां बी. ए. झाला आहे. ह्याला सहज रेव्हीन्यू खात्यांत चिकटवून देतां येईल.'

मी विचारलं, 'हें कोणतं खातं?'

अग्निहोत्र्यांनीं सांगितलं, 'हें वसुली खातं. ग्रॅज्युएटला

पहिल्यांदा अव्वल कारकुनाच्या जागेवर नेमतात अन् मग तो मामलेदार, हुजुर दिपोटी कलेक्टर, दिपोटी कलेक्टर किंवा नशीब चांगलं असलं तर असिस्टंट कलेक्टर सुद्धां होऊं शकतो. यापुढें लायक हिंदी माणसाला कलेक्टर सुद्धां होतां येईल असं स्टेट सेक्रेटरींनीं वचन दिलं आहे.'

'सरकारी नोकरीची रुपेरी बेडी कशाला पायांत अडकवून घेतोस?' असं भाऊचं म्हणणं भगवंताला मुळींच पसंत पडलं नाहीं. उपदेश करणाऱ्याच्या आयुष्याचे कसे धिंडवडे झाले होते हें त्यानं प्रत्यक्ष पाहिलेलं असल्यावर रुपेरी सांखळीबद्दल तिटकारा त्याला कसा येणार? अग्निहोत्र्यांच्या वशिल्यानं त्याला पुण्याच्याच मामलेदार कचेरींत कारकुनाची जागा मिळाली. वर्षभर काम केल्यावर तो अव्वल कारकुनांत जाणार होता. बी. ए. झालेला मुलगा अन् त्यांत रेव्हेन्यू खात्यांत उमेदवारीची नोकरी मग मला स्वर्ग दोन बोटं उरला यांत नवल नाहीं. कारण मुलींचे बाप रोजच्या रोज आमच्याकडे खेटे घालूं लागले. तसं पाहिलं तर त्याचं लगिन दोन तीन वर्षांपूर्वींच करून टाकायला पाहिजे होतं. बी. ए. झाल्याशिवाय लग्न करणार नाहीं, असा हट्ट धरल्या कारणानं आमचा नाईलाज झाला. त्यांतून भाऊच्या उपद्व्यापामुळें आमचे दिवस धांदलींत अन् जिकिरींतच गेले होते. आतां मात्र वैशाखांत लग्न करून टाकायचं नक्की केलं.

✦ ✦ ✦

# ६ : : भगवंताचें लग्न आणि त्यानंतर

भगवंताच्या वयाच्या मानानं निदान १४–१५ वर्षांची तरी बायको त्याला हवी होती, पण १२–१३ च्यापुढें वय असलेली मुलगी सांगून येत नव्हती. मुलगी सांगून कोणी आलं तर पहिल्यांदा त्याला सासुबाईकडे पाठवीत होतों; सासुबाईंनीं पसंत केलेल्या मुली भावोजी, कमलाबाई, मी अन् भाऊ बघत होतों. भगवंतरावाला एखादे वेळीं मुलगी आम्ही पाहूं देत होतों. पण त्याचं मत्त कधींच विचारलं नाहीं. नवरा पसंत आहे कां असं मुलींना कोणीच विचारत नव्हते. अक्षरशः आम्ही दीडशें मुली पाहिल्या अन् शेवटीं क्षीरसागरांची बारा वर्षांची यमू पसंत केली. यमू अंगानं चांगली उफाड्याची होती. मराठी तीन बुकं वडिलांनींच तिला शिकवली होती. घरांत लहान भावंडं असल्या कारणानं मुलाबाळांचा तिला कंटाळा नव्हता. अडीअडचणीला निदान गव्हाच्या आरोळ्या ती करूं शके. पांचशें रुपये हुंडा अन् खर्चाकरतां पांचशें रुपये द्यायला क्षीरसागर तयार झाले. मग लग्नचिठ्ठ्या निघाल्या. लग्नाच्या आमंत्रणाखालीं वासुदेव तात्याजी शाळिग्राम ह्यांची सही होती. कै. बंडो तात्याजी यांचे चिरंजीव असं मुलाच्या नांवाच्या आधीं छापलं होतं. पण मी म्हणालें भावोजींना कीं 'आणि भीमाबाई' असा शब्द घाला कीं! इतक्या खस्ता खाऊन लहानाचा मोठा केला अन् त्याच्या लग्नाच्या पत्रिकेवर माझं नांवहि नसावं? भावोजी म्हणाले, 'भीमावहिनी, आमंत्रण-पत्रिकांवर बायकांचीं नांवं छापायची रीत नाहीं. बायकांना लिहायवाचायला आलं तरी उघडपणें त्यांचीं नांवं परक्या पुरुषांच्या हातीं जावीं न् मग त्यांनीं तीं उच्चारावीं हें बरोबर नाहीं. बंडूचं नांव आहे ना पत्रिकेवर, मग तुझं वेगळं कशाला पाहिजे? नवऱ्याच्या नांवांत बायकोचं आलंच.'

भगवंतचं लग्न चार दिवस थाटांत झालं; मला वाईट वाटलं कीं कमलाबाई नि वासुभावोजी यांना वराचे आईबाप होण्याचा मान फुकटम् फाकटी मिळाला, नि मी मुलाची आई झालें चोर ! जिथें कांहीं सोहाळा किंवा विधि चालला असेल तिथें मी आपला अमंगळ चेहरा दाखवायचा नाहीं, कांहीं पहायचंच झालं तर फटींतून पहायचं. डोक्यावर पगडी, एका गालावर गालबोट, पगडीवरून मुंडावळ्या, अंगांत बंदाचा अंगरखा, पगडीवरून बुट्ट्याचा भरजरी शेला, गळ्यावरून लोंबणारा हार, नेसायला रेशीमकाठी धोतर, पायांवर लाल-भडक पुणेरी जोडा, असा भगवंत घोड्यावर बसलेला मला डोळे असून पहायला मिळाला नाहीं. धृतराष्ट्राला संजय जसा लढाईचं वर्णन सांगत होता तशी अग्निहोत्र्यांची लीला खिडकींतून बघून मला मिरवणुकीचं वर्णन सांगत होती. आम्हांला आमच्या कमी झालेल्या ओळखीच्या मानानं अहेर-भेटी पुष्कळ आल्या होत्या. अहेराचीं चंदेरी पागोटीं, अहेराचीं सोलापुरीं लुगडीं, चांदीचीं जाडजाड भांडीं, थोडीशीं जरीचीं उपरणीं यांचा खच पडला होता. या आलेल्या जिनसांतून चांगल्या चांगल्या वस्तु निवडून माईंनीं आपल्या लेकीच्या घरीं लम्पास केल्या असं वन्संनीं सांगितलं. कमलाबाईंना अजून मूलबाळ झालं नसल्यानं त्यांच्या घरीं कार्य व्हायचा तूर्त तरी संभव नव्हता म्हणून त्यांचे नातेवाईक नि इष्टमित्र यांची चांगलीच गर्दी भगवंतच्या लग्नांत झाली होती.

वरातीच्या वेळीं मुलीचं नांव काय ठेवायचं याबद्दल पुष्कळ वाटाघाट झाली. भाऊ, वन्सं, कमलाबाई म्हणू लागलीं नवीन फ्याशनचं नांव ठेवा. लक्ष्मी, शिता, पार्वती हीं नांवं आतां फार जुनीं झालीं आहेत, त्यांच्याबद्दल कमला, लीला, आनंदी, जया असं नवीन धर्तीचं ठेवावं. सासुबाई म्हणाल्या ' भगवंत म्हणजे विष्णु. त्याच्या बायकोचं नांव लक्ष्मी ठेवा. वाटलं तर दुसऱ्या एखाद्या नांवानं हाक मारा पण ठेवलेलं नांव लक्ष्मी



'भगवंत व सूनबाई मला नमस्कार करतात'

असूं द्या. माझ्या बंड्याच्या घरची लक्ष्मीच नाहीं का ती ?' भगवंतनं आजीच्या इच्छेप्रमाणें लक्ष्मी नांव अक्षतांवर लिहिलं. मेला चावट असा झाला होता, 'वाट्टेल तें नांव ठेवा, मला त्याचा थोडाच उपयोग आहे ? मी कांहीं तिला नांवानं हाक मारणार नाहीं साहेब लोकांसारखा!' असं म्हणाला.

लगीन थाटानं पार पडलं. हुंड्याच्या पांचशें रुपयांपैकीं चारशेचं वीस तोळे सोनं घेतलं. आठ तोळ्यांची हलकीशी सरी, सहा तोळ्यांच्या पाटल्या, बाकी कांहीं मूद, अग्रफूल, मोहोरेची आंगठी, भगवंतला एक आंगठी असं करण्यांत खर्च केलं. बाकीचा खर्च व्याहयांनीं दिलेल्या पांचशें रुपयांत झाला. पण त्यांत उरलं मात्र कांहीं नाहीं. लग्नांत जावयानं रुसायची चाल होती, तिच्याप्रमाणें भगवंत रुसला होता, अन् काय मागितलंन् ? नेहमीप्रमाणें अंगठी, भिकबाळी, चांदीचं तांब्या-

भांडं नाहीं मागितलं तर पायसिकल मागितली. चार वर्षं घरापासून कॉलेजपर्यंत पायीं रखडला नि आतां नोकरी लागल्यावर पायसिकल कशाला पाहिजे होती? तशीं कॉलेजांत जाणारीं मुलं पायसिकलवरून जायला लागलीं होतीं, चांगल्या दहाबारा पायसिकली कॉलेजांत जात रोजच्या. भावोजी थट्टेनं म्हणाले, 'सायकल रे कशाला पाहिजे तुला ? तपकीरगल्ली-पासून मामलेदार कचेरीपर्यंत जायचं न् परत यायचं तेवढ्या-साठीं ? हां ! माझ्या ध्यानांत आलं ! सासुरवाडीला ऊठसूट पळतां यावं म्हणून ही योजना दिसती आहे!'

'मग तूं या योजनेचा उपयोग कां करून घेतला नाहींस?' भगवंतनं त्यांना विचारलं.

'अरे मला सायकलवरून सासुरवाडीं जायचं कारण उत्पन्नच झालं नाहीं. सासुरवाडच माझ्या घरीं चालून आलं,' भावोजी म्हणाले. कमलाबाईनीं किंवा माईनीं ऐकलं नाहीं म्हणून बरं झालं, नाहींतर मोठंच तुफान माजलं असतं ते घरीं गेल्यावर.

सूनबाई लग्न झाल्यावर आमच्या घरीं रहायला आल्या नाहींत. चांगल्या सहा महिने माहेरींच होत्या. तोंपर्यंत भगवंत पायसिकलवरून रोज सासुरवाडीस जाऊन यायचा, बायकोच्या हातून मिळालेला चहा प्यायला. दुसरं कांहीं नाहीं. मग पुढें योग्य वेळीं सौंस्कार होऊन सून घरीं आली. फीमेल हायस्कूलमध्यें इंग्रजी पहिलींत होती. तिला आतां शाळेंत जाऊं द्यायचं म्हणजे नवऱ्याबरोबर जेवायला घातलं पाहिजे नि संध्याकाळीं पांच वाजतां ती येणार, तेथपर्यंत उष्टीखरकटीं कुणीं करायचीं ? सासूनं का आजेसासूनं? मी तिला शाळेंत जायची बंद केली न् सांगितलं भगवंतला कीं, तुला वाटलं तर तूं स्वतः तिला शिखव; पण तिला शाळेंत जाऊं देणार नाहीं मी.

भाऊनं भगवन्त अज्ञान असतांना पुष्कळ काम केलं होतं; पैशाचे व्यवहार तो करीत होता, शेती संभाळली होती, पैसे परमेश्वरी नोटांत घातले होते, त्यांचं व्याज आणीत होता;

पण आतां भगवन्त मोठा झाल्यानं त्याच्या हातून कारभार काढून घ्यावा असं भगवंतला वाटूं लागलं होतं. भगवंत शाळेंत असतांना इतिहास पाठ करीत असे तेव्हां तो वाचीत असे कीं, नाना फडणिसांनीं सवाई माधवरावाचं न् त्याच्या पेशवेपणाचं रक्षण केलं पण तो वयांत आल्यावर नानांचा वरचष्मा त्याला सहन होईना. तसंच आतां भगवंतला वाटूं लागलं होतं. भाऊला आतां धंदा असा कांहीं नव्हता. देशभक्त म्हणून तो समजला जात होता, त्याचीं लेचकरं होत, कुठें मेजवानी झाली कीं सगळ्यांच्या पानांपुढले दक्षिणेचे पैसे 'पैसा फण्ड' करीत उचलायचे,

**स्वदेश-स्वधर्म-स्वभाषादिकांचा**
**उत्कर्ष व्हावा जगिं हेतु साचा**

असा कांहींसा श्लोक मोठ्यानं म्हणायचा. शिवाजी उत्सव, गणपति-उत्सवांत लुडबुड करायची हेच त्याचे उद्योग राहिले होते. टिळकांना शिक्षा झाल्यावर पोलिसनीं देशभक्तांना असा कांहीं दम भरला होता कीं चांगले चांगले जहाल देखील नरम होऊन गेले. भाऊचा दारूचा कारखाना अन् त्यांतले ते पेढे यांचं नांवहि आतां निघत नव्हतं.

एक दिवस भाऊ मला न् भगवंतला म्हणाला, 'कापडाचं उत्पादन पुरेसं झाल्याशिवाय देशाची उन्नति होणार नाहीं. हातमागाचा धंदा अडाणी कोष्ट्यांच्या हातांत राहिल्यानं लुगड्यांशिवाय त्यांत दुसरं कांहींच निघत नाहीं म्हटलं तरी चालेल. मी या विषयाचा चांगला अभ्यास केला आहे. जपानांत हातमागावर कोटिंग अन् शर्टिंगसुद्धां उत्तम प्रतीचं निघतं.'

'फार छान. आपल्या देशांतसुद्धां कोणी हातमागावर शर्टिंग काढलं तर सात वार कापड मी अवश्य घेईन,' भगवन्त म्हणाला.

तर दुसरी मिळेल पण आई मेली तर दुसरी मिळणार आहे का ? वडील गेले असल्यानं सावत्र आईसुद्धां मिळायची नाहीं. हें मीं आपलं थट्टेनी बोलल्यें हों ! वठलेल्या झाडांची काळजी घेण्यांत अर्थ नाहीं, रोपटीं वाढवण्याचाच उपयोग आहे या जगाला.

मी अगाऊ कळवून ठेवलं न घराची वेवस्था काय करावी याचा विचार करूं लागलें. भाऊच्या ताब्यांत घर देणं भाग होतं. सूनबाई लहान नि भाऊ ब्रह्मचारी तेव्हां लोकापवादाच्या भीतीनं तरी सूनबाईला माहेरीं लावून देणं भाग होतं. नाहीं तरी आणखी चारपांच महिन्यांनीं तिचे दिवस भरणारच होते, जरा आधीं पाठवली म्हणा ना ! सासूबाईना आतां मोतींबिंदू झाल्यानं नीट दिसत नव्हतं, त्यांची वेवस्था काय करायची हें मला समजेना. भावोजींच्या घरीं ठेवण्यापेक्षां मला मारून टाक असं त्या म्हणत. भाऊ म्हणाला काकूंना मी संभाळीन, तूं काळजी करूं नको पण त्या फटिंगाचा काय नेम ? वाटेल तेव्हां यावं, वाटेल तेव्हां जावं. खाल्लं तर खाल्लं नाहींतर उपाशी, असली ती वल्ली झाली होती.

पण देवाला काळजी ! वन्सं एकाएकीं आल्या. त्यांचे केस आणखी थोडे वाढून त्यांची लहान मुलींच्या सारखी वेणी त्यांनीं घातली होती, नवीन तऱ्हेचं चीट त्या नेसल्या होत्या अन् पुणेरी जोडा घालून आल्या होत्या. हातांत छत्री सुद्धां होती त्यांच्या. ' वहिनी, तूं भगवंतकडे कोपरगांवला जाणार आहेस म्हणे ? '

' होय. त्याचे जेवणाखाणाचे हाल होताहेत. लक्ष्मीला पाठवावं तर ती लहान, त्यांतून तिकडे उन्हाळा. तेव्हां मीच जातें झालं. लक्ष्मी थोडे दिवस माहेरीं राहील. '

' आईची काय वाट ? '

' सासूबाई इथेंच रहातील घर संभाळायला. भाऊची सोबत आहे त्यांना. '

वन्स म्हणाल्या, ‘ त्यापेक्षां असं करा ना मी जातें माझ्याबरोबर आईला घेऊन. माझ्यावांचून तिला करमत नाहीं अन तिच्यावांचून मला करमत नाहीं. आम्ही दोघी राहूं एकमेकींच्या सोबतीनं.’

मी विचारलं, ‘ पण तुम्ही रहाणार तरी कुठें ? तुमच्या आश्रमांत अशा म्हाताऱ्या बायकांना घेतात कां ? ’

‘ आतां मी आश्रमांत रहात नाहीं. माझी ट्रेनिंगची परीक्षा पास झाल्यापासून मला मंडईसमोरच्या मुलींच्या शाळेवर हेड मास्तरणीची नोकरी लागली आहे. आतां मी तिथेंच दोन खोल्या भाड्यानं घेतल्या आहेत. आणखी आईलाहि माझ्याचकडे नेईन म्हणतें. ’

लगेच सासुबाईची संमति घेतली. वन्संच्याकडे ओढा असल्यानं त्यांच्याकडे रहायला त्या कबूल झाल्या. त्याच दिवशीं आपली वळकटी घेऊन त्या वन्संकडे रहायला गेल्या नि अशा तऱ्हेनं सासुबाईच्या संबंधींचा पेंच सुटला. सुनबाई माहेरी गेली नि मी भाऊच्या स्वाधीन घर करून ट्रंक वळकटी अन् पोपटाचा पिंजरा घेऊन दौंडास जाणाऱ्या आगगाडींत बसलें. टेशनवर पोंचवायला भाऊ अन् भावोजी असे दोघे आले होते. दोन तासांनीं दौंडास गाडी पोंचताच मी भगवंतच्या पट्टेवाल्याची चौकशी करूं लागले. फलाटावर इकडून तिकडे जाणाऱ्या प्रत्येक पट्टेवाल्याला मी विचारलं, ‘ काय रे तूं कोपरगांवहून आला आहेस कां ? ’ पण इतके मेले वाह्यांत आहेत कीं एकानं सुद्धां धड उत्तर दिलं नाहीं. एकजण म्हणाला, ‘ मी कोपरगांवहून नाहीं आलों ढोपरगांवहून आलों आहें. ’ दुसरा एकजण म्हणाला, ‘ आम्ही आर. एम्. एस्.चे शिपाई आहोंत. ’ तर तिसरा एकजण नगरच्या मुनसफ कचेरीचा पट्टेवाला निघाला. शेवटीं मी आपल्या हातांनीं ट्रंक, वळकटी व पिंजरा सरकवीत सरकवीत कोपरगांवच्या गाडीकडे नेलं. उतारूंपैकीं एकानं माझी दया येऊन सामान डब्यांत चढवलं. मी डब्यांत बसतांच कोपरगांवचा

शिपाई माझ्यासमोर येऊन उभा राहिला. अन् त्यानं विचारलं, 'आईसाहेब, आपणच शाळिग्रामसाहेबांच्या मातोश्री ना?' मी 'होय' असं म्हणून त्याची अशी खरड काढली आहे कीं ज्याचं नांव तें. तो म्हणाला, 'मी पुण्याच्या गाडीजवळून आठ खेपा केल्या पण तुमचा पत्ता लागला नाहीं. मग ह्या गाडीवर आलों तर आपण सामान सुमान चढवून बसलांत देखील.' ज्यानं सामान चढवून दिलं होतं तो म्हणाला, 'जमादार, कशाला उगीच थापा मारतां? पुण्याची गाडी आली तेव्हां तुम्ही दुकानांत चहा पीत बसलां होतां, तें काकूबाईंनीं स्वतः सामान ढकलीत आणून डब्यांत चढवीत असतां उठलां पण नाहींत.' दौंडाहून गाडी सुटल्यावर भीमेचा पूल लागला. जिचं नांव मला दिलं होतं तिचं मोठं थोरलं पात्र अन त्यांतून वहाणारी पाण्याची बारीक धार पाहून मला बरं वाटलं नाहीं. पण पावसाळ्यांत ती नदी दुथडी भरून वहाते असं लोक म्हणत होते. मी एक पैसा पुलाखालीं टाकून नमस्कार केला. कोपरगांवच्या अलीकडे गोदावरीचा पूल लागला नि गोदावरीची अवस्था तीच होती. मधून मधून महापूर तर इतर वेळीं ठणठणाट. माझ्या औक्षाच्या नदीची अवस्था अशीच नाहीं का? सध्यां तरी मुलगा मोठ्या रोजगारावर असल्यानं माझं औक्ष पाणीदार झालेलं होतं. एक चुकारतट्टू कां होईना पट्टेवाला मला सामोरा आला होता ना? कोपरगांवास पोंचल्यावर त्याहिपेक्षां माझा सत्कार झाला. भगवंतराव, त्याच्या हाताखालचे दोन कारकून आणखी एक पट्टेवाला असे मला उतरून घ्यायला आले होते. टेशणाबाहेर दोन घोडे जोडलेला पण पुण्याच्या छकड्यासारखा दिसणारा टांगा माझ्यासाठीं आणलेला होता. भगवंतराव, मी अन पोपट असे तिघे ह्या टांग्यांतून बिऱ्हाडाकडे निघालों. कारकून, पट्टेवाला आणि सामान बैलाच्या खटाऱ्यांतून येणार होतं. भगवंतला पहातांच पोपटाला फार आनंद झाला नि तो

पिंजऱ्यांतल्या पिंजऱ्यांत नाचत नाचत 'भाग्या, ऊठ शाळेंत जा' असं म्हणूं लागला. टांगा हांकणाराला त्याची मजा वाटत होती. पण भगवंताला मात्र राग येत होता. टांगा इतका खडखडत होता कीं आम्हांला नीट बोलतांहि येत नव्हत. म्हणून आम्ही गप्प बसलों होतों. थोडया वेळानें भगवंतचं बिऱ्हाड आलं. तिथेंहि एक नोकर दाराशीं उभा होता. मला नमस्कार करून तो 'या, आईसाहेब' असं म्हणाला. तें ऐकून मला मूठभर मांस चढलं असेल तर त्यांत नवल नाहीं.

✦ ✦ ✦

## ७ : : आईसाहेब

भगवंतचं बिऱ्हाड म्हणजे स्वतंत्र बंगलेवजा झोंपडी किंवा झोंपडीवजा बंगला होता. त्याला माडी नव्हती. बाहेरच्या बाजूला चार फुलझाडं नि बंगल्याला पुढं पडवी नि आंत चार खोल्या होत्या. त्यांपैकीं एका खोलींत वैलाच्या दोन चुली घातलेल्या होत्या. मागें लहानसं परसू होतं नि त्यांत नहाणी-घर स्वतंत्र केलेलं होतं. अंघोळ करतांना थंडीवाऱ्याचा किंवा उन्हाचा उपद्रव होऊं नये म्हणून अशीं स्वतंत्र नहाणीघरं घरोघर कां होऊं नयेत असं मला वाटलं. घराच्या फाटकांत उभं राहिल्यावर गोदेचं अफाट कोरडं पात्र अन् पलीकडलीं झाडं न् शेतं दिसत होतीं. पाणवठ्याची एवढी एकच जागा असल्यानं गुरंढोरं, कुत्रीं, डुकरं, गाढवं, कावळे-चिमण्या, पोपट, बगळे सगळ्यांची गर्दी तिथें होत होती. प्यायचं पाणी तिथूनच घरोघर जाई. कधीं न संपणारी डोक्या-वर घागर न् कंबरेवर कळशी घेतलेली बायकांची एक रांग पात्रांतल्या पाण्याच्या डबक्यापासून गांवाच्या वाटेनं जाणारी न् दुसरी परत येणारी सारखी गिरणीच्या पट्ट्यासारखी गरगर फिरत होती, सकाळपासनं दिवेलागणीपर्यन्त.

आमच्या घरीं म्हणजे भगवंतच्या कोपरगांवच्या बिऱ्हाडीं कचेरीचे दोनतीन शिपाई घरचं काम करीत असत. यांना तैनाती शिपाई म्हणत. कचेरींतून पगार घ्यायचा न् साहेबांच्या घरीं काम करायचं. त्याशिवाय मी गेल्यापासून त्यानं एक पाणक्या सुरू केला होता. पाणक्याचं एक लहानसं घोडं होतं. त्याच्या पाठीवर लाकडाची माखण बसविलेली होती. माखणीच्या प्रत्येक पारड्यांत पाण्याच्या दोन दोन

घागरी मावत, पाणक्या डबक्यांतलं पाणी आंत भरून घागरी माखणींत ठेवून देई नि घोडं आपसुखच आमच्या दाराशीं येऊन उभं राही; मग शिपायांपैकीं एकानं त्या घागरी रिकाम्या करून घेऊन माखणीवर ठेवतांच घोडं परत नदीवर जाई.

सकाळीं दहाच्या सुमाराला एक कारकून घाईघाईनं आले. मला पाहून नमस्कार करून ते म्हणाले, " आईसाहेब आपण आलांत हें फार चांगलं झालं. रावसाहेबांची जेवणाखाणाची सोय उत्तम झाली न् मातुश्रीचं छत्र डोक्यावर आलं. न मातुः परदैवतम् ! काय ? "

' काय हो रणशिंग ? टपालांत कांहीं आहे का रावसाहेबां-कडून आलेलं ?' भगवंतच्या खोलींतून त्याचा आवाज आला. त्या खोलीकडे जात रणशिंग म्हणाले, ' हो हो तर रावसाहेब. आपलं नशीब जोरावर आहे. मामलेदारसाहेबांनीं तीन महिने रजा वाढवून पाहिजे म्हणून अर्ज केला आहे. तो मंजूर होऊन येईपावेतों आपल्याकडे च्यार्ज राहील अशी ऑर्डर आली आहे.'

' मग सध्या, मीच रावसाहेब झालों आहे म्हणायचा ! ह्यः ह्यः ह्यः ! ' भगवंत आनंदानं हासला. पोपटानं वरच्या पिंजऱ्यांतून ह्यः ह्यः ह्यः अशी त्याची नक्कल केली, रण-शिंगांनीं बिचकून वर पाहृलं तर पोपट हासत आहे असं पाहून त्यांनीं त्याचं कौतुक केलं, ' फार चलाख दिसतो आहे पक्षी, न शिकवतां तो अशी नक्कल करतो वाटतं,' ते म्हणाले.

स्वैपाकघरांत मी चटणी वाटीत बसलें होतें तिथें भगवंत आला नि माझ्या पाया पडून म्हणाला, ' आई, मी अॅक्टिंग मामलेदार झालों, तूं काल इथें आलीस न् आज आर्डर हातांत पडली.'

' आईसाहेबांचा पायगुणच तसा! आमचे कायमचे मामले-दार रावसाहेब धायगुडे आजारी पडून औषधोपचारासाठीं मुंबईला गेले अन् तिथें त्यांचा आजार लांबला; म्हणून राव-साहेबांकडे अॅक्टिंग च्यार्ज आला. आतां तीनचार महिने

पहायला नको; आमचेच रावसाहेब मामलेदारीवर रहाणार. नाहीं का रे इब्राहीम ?' जवळच उभ्या असलेल्या भिस्त्याला त्यांनीं विचारलं.

'जी हां, मास्तर. साईबाबांची मेहेर असल्यावर काय होणार नाहीं? धायगुडे साहेबांचा आजार सालभर लांबेल आणि हेच रावसाहेब इथें रहातील' इब्राहीमनं साथ दिली.

थोड्या वेळानं बरीचशी मंडळी भगवंतच्या खोलींत जमली. पेढे द्या, पेढे द्या असे किंवा कॉंग्रॅच्युलेट असे शब्द ऐकूं येऊं लागले. पेढ्यांच्या आधीं निदान चहा तरी द्या असें कोणीतरी म्हणालं. रणशिंग माझ्याकडे येऊन म्हणाले, 'आतां तुम्हांला थोडीशी तसदी पडणार आहे. सगळी मंडळी चहा मागत आहेत. दारूचे मक्तेदार पावरीशेट, ओव्हरसिअर कानडे, कंत्राटदार बोरावटे वगैरे प्रतिष्ठित मंडळी रावसाहेबांचे कॉंग्रॅच्युलेशन करायला जमली आहेत. तीं कांहीं तशी सोडायची नाहींत रावसाहेबांना. मी दूध अन् कपबशांची व्यवस्था लावतो. आपण आधण ठेवा दहा बारा कपांचं.'

रणशिंगांच्या नि श्रीपती नांवाच्या ब्राम्हण शिपायाच्या मदतीनं मी चहा तयार केला. श्रीपतीनं चहाच्या दुकानांतून पांच सहा कप आणले होते. त्यांत चहा ओतून दिला. रणशिंग हलक्या आवाजांत मला म्हणाले, 'इथं रावसाहेबांकडे अठरा पगड जातींचे लोक यायचे त्यांना घरांतल्या कपबशा कोण देणार? अशा वेळीं गोपाळ चहावाल्याकडून उसन्या घेऊन याव्या हें उत्तम. गडीमाणसाकडूनच त्या धुवाव्या अन् परत– ओ, आलों रावसाहेब' असं म्हणून रणशिंग आणि श्रीपती दोघांनीं चहा नेऊन दिला.

थोड्या वेळानं जमलेली मंडळी बाहेर येऊन अंगणांत उभी राहिली. पावरीशेट म्हणाले, 'आम्हांला आईसाहेबांचं दर्शन घ्यायचं आहे.' बोरावटे म्हणाले, 'रावसाहेब, आपल्या मातोश्रींना बोलवा कीं जरा बाहेर.' भगवंत माझ्याकडे आला.

अन् म्हणाला, 'सगळ्या लोकांना तुला पाह्यचं आहे. दोन मिनिटं बाहेर ये.'

'इश्श. सगळ्या पुरुषांच्यासमोर मी कशाला येऊन उभी राहूं?' मी म्हणालें.

रणशिंग म्हणाले, 'आईनं लेकरांच्या समोर उभं रहायला काय हरकत आहे? आपण जरूर सगळ्या लोकांचा नमस्कार घ्यायला अन् आशीर्वाद द्यायला बाहेरच्या पडवींत आलं पाहिजे. नाहीं तर सगळ्यांना फार वाईट वाटेल.' शेवटीं निरुपायानं मी बाहेरच्या पडवींत जाऊन अंगणाकडे तोंड करून उभी राहिलें. माझ्या समोर गांवांतले प्रतिष्ठित लोक उभे होते. पावरीशेट दोन्ही हात जोडून म्हणाले, 'आईसाहेब, मी गांवठी दारूचा मक्तेदार. रावसाहेब धायगुडे अन् त्यांच्या पहिले खांडवाला समद्यांची मेहेरबानी माझ्यावर होती. आपले चिरंजीव शालिग्रामसाहेव फार लायक माणूस. इतक्या लहान वयांत मामलेदारीचा चान्स कोणाला मिळत नाहीं. पण ह्यांना तो मिळाला. कलेक्टर साहेबांची ह्यांच्यावर फार मर्जी आहे. आमच्यावर आपली क्रिपा असावी. आपण देवी आहां. म्हणून आपल्या पायतलीं ही फुलाची पाकली भेट ठेवतो आहे.' आपल्या हातांतील दहा रुपयांची नोट त्यानं माझ्या पायावर ठेवली. मी ती उचलून त्याच्या अंगावर फेकीत म्हणाले, 'अहो, मला नमस्कार केला तरी हरकत नाहीं. पण हे पैसे कशाला पाहिजेत?'

पावरी म्हणाला, 'आपण देवीच्या दर्शनाला गेलो म्हणजे तिच्यापुढें कांहीं तरी परसाद ठेवतो कीं नाहीं? देवी कांहीं तें फेकून देत नाहीं. तशा आपण आमच्या आई आहां. आपल्या पायावर हें ठेवतों.' असं म्हणून पुन्हां त्यानं ती नोट माझ्या पायावर ठेवली. रणशिंगांनीं ताबडतोब उचलून ती आपल्या हातांत घेतली. बाकीच्या लोकांनीं आपापलीं नांवं सांगून मला नमस्कार केला. प्रत्येक वेळीं मान डोलावून मी त्यांचा नमस्कार घेतला. सगळीजणं मला आईसाहेब म्हणत होती. हा माझा

मान बघायला सासूबाई जवळ असायला पाहिजे होत्या. मंडळी जाण्याच्या आंत पेढ्यांचं शिप्तर आलं. भगवंतच्या इच्छेप्रमाणें त्यांतले दोन दोन पेढे प्रत्येकाच्या हातावर मी ठेवले नि मग सगळी निघून गेली.

मामलेदार केवढा सत्ताधारी असतो तें आतां मला कळलं. कोपरगांव ग्रामपंचायतीचा तो अध्यक्ष. जमिनीचे दस्तऐवज त्याच्या ताब्यांत. रजिष्टर खातं त्याच्या हाताखालीं. तालुक्यांतले सगळे पाटील अन् तलाठी त्याच्या ताब्यांत. कोणचीही गाडी वेठीला धरावयाचा त्याला अधिकार. अज्ञानाच्या इस्टेटींवर त्याची देखरेख. आणखी सुद्धां हजार कामं त्याच्याकडे होती. महिन्यांतून पंधरा दिवस फिरायचं पण ती फिरती सुद्धां किफायतशीर होती. एक दिवस भगवंत म्हणाला, 'टिळकांची स्वदेशी चळवळ, गणपति उत्सव, शिवाजी उत्सव यांची वावटळ ह्या मागासलेल्या तालुक्यापर्यंत पोंचली नाहीं. म्हणून सरकारी अंमलदारांची इकडे फार प्रतिष्ठा आहे. एखाद वेळीं कलेक्टरची किंवा दिपोटी कलेक्टरची स्वारी तालुक्यांत आली म्हणजे मामलेदाराचं नाक जरा खालीं होतं. बाकी सगळे व्यापारी, जमीनदार, वकील पैशानं कितीहि मातबर असले तरी मामलेदारापुढें त्यांचं तेज पडत नाहीं.'

मी कोपरगांवला गेल्यावर चारच दिवसांनीं भगवंतला रहातं नि शिरडी ह्या बाजूला फिरतीवर जाण्याची वेळ आली. तो म्हणाला 'एकटी इथें रहाण्यापेक्षां येतेस कां माझ्याबरोबर फिरतीला? तू खेडेगांवांतून अन रानांतून फारशी हिंडली नाहींस. तुलाहि बरं वाटेल, बाहेर मोकळ्या जागेंत हिंडण्यानं' मी म्हटलं, अजून गांवांत माझ्या ओळखी झाल्या नाहींत; तेव्हां दिवसभर करायचं तरी काय? म्हणून मी होकार दिला. ठराविक दिवशीं बैलाच्या खटाऱ्यांतून कारकुनी मंडळींबरोबर भांडींकुंडीं पाठवून दिली अन् दोन तासांनीं भगवंत आणि मी छकडेवजा टांग्यांतून निघालों.

आमच्याबरोबर पट्टेवाला सुद्धां होता. गोदावरीच्या वाळवंटांतून टांगा पार होतांना आम्हांला खालीं उतरावं लागलं होतं. वाळू तापून तव्यासारखी गरम झाली होती. माझे अनवाणी पाय इतके भाजले कीं त्यांना टरारून फोड आले. पट्टेवाला म्हणाला, 'आईसाहेब, माझ्या वहाणा आपण घाला कीं!' मी म्हणालें, 'अरे मला पायांत कांहीं घालायचं असतं तर तें घ्यावयाची मला ऐपत का नाहीं? पण आम्हां संन्यासी बायकांना पायांत कांहीं घालण्याची किंवा डोक्यावर छत्री धरावयाची मनाई आहे.' मग त्या बिचाऱ्यानं माझ्यापुढें सतरंजी टाकली मी तिच्यावर पाय दिला. मग एक पोतं पुढें टाकलं त्याच्यावरून चाललें अशा तऱ्हेनं पायघड्या टाकवीत मीं नदीचं पात्र ओलांडलं.

वाळवंट संपलं तिथें टांगा उभा होता. त्यांत बसून आम्ही शिरडीला गेलों. तिथें आंब्याच्या राईत रावसाहेबांचा क्यांप होता. दोन तंबू झाडाच्या जागेंत ठोकले होते. एकांत भगवंतची सोय होती. दुसऱ्यांत माझी होती. आम्हांला जेवायला करायचं कारणच्च नव्हतं, सगळीं जेवणं बाहेर पडत होतीं. मी उठून दुसरीकडे जेवायला जायला तयार होत नव्हतें. पण लोक फार आग्रह करायचे. आईसाहेब, लेकराकडे जेवायला यायचं त्यांत भीड कसली बाळगायची? असं सगळे म्हणायचे. आज अमुक सावकाराकडे तर उद्यां शेजारच्या गांवच्या तमुक जमीनदाराकडे अशीं जेवणं चालायचीं. इतर जातीचे लोक असले तर मुद्दाम ब्राह्मण आचारी वाढपी आणवीत नि सोवळ्यानं स्वैपाक करीत. चहाहि सोवळ्यानं एक ब्राह्मणाचा पोरगा आणून देई.

शिरडीचे साईबाबा तेव्हां जिवंत होते. त्यांचा आश्रम म्हणजे दोन मोठाल्या झोपड्या होत्या पण ते झोपडींत न रहातां जुन्या मशिदींत रहात होते अन् एका शिळेवर बसून रहात. भगवंत त्यांच्या दर्शनाला गेला तेव्हां त्याला ते म्हणाले,

'अरे भगवंत, तूं सच्चा भगवंत, असलास तर मला लागलीच दोन रुपये तेरा आणे न् एक पैसा देशील.' भगवंतानं आपल्या



भगवंतच्या खिशांत साईबाबांनीं मागितले तेवढेच पैसे निघाले.

खिशांतले सगळे पैसे बाहेर काढले अन् ते बरोबर तितकेच भरले. एक पैसा कमी नाहीं न् जास्ती नाहीं ! असं साईबाबाचं अंतर्ज्ञान होतं. मला म्हणत होता भगवंत कीं आई तूं चल बाबांच्या दर्शनाला; तर मी म्हणालें 'मी घरांतूनच मनोमन त्यांचं दर्शन घेतें. साधुसंतांचे देह पहायला काय जायचंय ? ते तुमच्या आमच्यासारखेच हाडामांसारक्ताचे गोळे असतात; त्यांचं मन मोठं असतं, बोलणं खोटं नसतं. तेव्हां त्यांचा उपदेश ऐकावा, त्यांच्या मनासारखं आपलं मन मोठं करावं पण त्यांच्या देहाचं कोडकौतुक कशाला करायचं ?' मी कांहीं त्यांच्या दर्शनाला गेलें नाहीं.

शिरडीपासून जवळच साकोरी गांव आहे. तिथं कलेक्टरचा

तळ पडला; उन्हाळा संपत आला होता म्हणून म्हणे या वरसाची शेवटची हरणाची शिकार त्याला करायची होती. कलेक्टर युरोपियन होता अन् शिकारीसाठीं त्यानं आणखी दोनच्यार साहेबांना नि मडमांना पाहुणे म्हणून बोलावलं होतं. कोपरगांव तालुक्यांत शिकारीला सुरुवात करूनही शिकार पार्टी संगमनेर तालुक्याच्या जंगलांत जाणार होती. ह्या भागांतल्या सपाट मैदानावर हरणांचे कळप पुष्कळ होते, सहज एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जायला लागलं तर वाटेनं दृष्टीस पडत असत. कलेक्टर न् त्याचे पाहुणे कोपरगांव तालुक्यांत असेपर्यन्त त्यांची तैनात ठेवायचं काम भगवंतकडे होतं. त्यांना दारूच्या बाटल्या, मांस, कोंबडचा अन् डुकराचीं पिल्लं न् कायकाय लागत होतं तें सांगायचीय् मला किळस वाटते. त्याशिवाय दूध, लोणी, भाज्या हेंहि लागे. ह्या सगळ्यांचे पैसे खरं पाहिलं तर कलेक्टरनीं द्यायला पाहिजेत; पण ते कधींच देत नसत. दिलेच तर दहा रुपये किंमतीच्या दारूच्या बाटलीचा एक रुपया, दोन शेर लोण्याचे दोन आणे, दहा शेर दुधाचे दहा पैसे असा अनागोंदी हिशोब करून एखादी पांचाची नोट कंत्राटदाराच्या अंगावर फेकून शंभर रुपयांची पावती लिहून घेत. कोणताहि बडा अंमलदार तालुक्यांत आला तर त्याच्या सरबराईचं काम मामलेदाराकडे होतं.

शिकार ही एक मोठीच खर्चाची बाब होती. शेंदोनशें हाकारी हरणांना पिटाळून साहेबांच्याजवळ दवडवीत अन् मग साहेब गोळ्या झाडून हरणं मारीत. ह्या हाकाऱ्यांना वेठीनं धरून आणायचं अन् प्रत्येकाच्या अंगावर भाकरीपुरते चारचार आणे फेंकायचे तरी पन्नासपाऊणशें रुपये खर्च येई. साहेबाजवळ पैसे मागितले तर तो गरम होऊन एकदम 'गेट आऊट' म्हणजे दाराबाहेर चालता हो म्हणे. गेट म्हणजे दार. आतां हा खर्च मामलेदार कुठून करणार ? वेगळाले मक्तेदार, दारू दुकानदार, जमीनदार यांचीं कामं झटपट करून देऊन त्यांच्याकडूनच काढणार न् काय ?

साहेब कॅम्पाला आला म्हणजे चांगली दारू आणून द्यायची हें काम पावरीशेट करीत होता नि दारू पिऊन साहेब जरा खुषींत आला कीं वाटेल त्याच्या फायद्याचे नि वाटेल त्याच्या तोटचाचे कागद साहेबापुढें ठेवून त्याच्या सह्या घ्यायच्या हें मामलेदाराचें काम. रणशिगाच्या नि पावरीच्या शिकवणीवरून भगवंत कामांत चांगलाच तरबेज झाला.

तालुक्यांतील फिरती करून मृग सुरूं झाल्यावर आम्हीं कोपरगांवला परत आलों. तिथें मृगांत पावसाला आरंभ होत नाहीं पण आर्द्राचा पाऊस पडतो. भगवंत इतका मातृभक्त होता कीं त्याच्याकडून कांहीं काम करून घ्यायचं तर लोक माझ्याकडे येत, माझ्यापुढे पांच किंवा दहाची नोट ठेवून विनवणी करीत, 'आईसाहेब, रावसाहेबांकडून एवढं काम करवून द्या.' दिवसाकांठीं चार पांच तरी नोटा माझ्याजवळ जमत. पैसे बॅकेंत टाकणं किंवा परमेश्वरी नोटा घ्यायच्या म्हणजे सरकारच्या डोळचावर येईल म्हणून मी सोनं विकत घेत होते. पावसाळचांत भगवंतला फिरतीवर जायचं नव्हतं. पण आतां आमचे डोळे पुण्याहून येणाऱ्या टपालाकडे होते. सूनबाईचे दिवस भरत आले होते. तेव्हां तिचा रिझर्ट काय लागतो तें आम्ही पहात होतों. मी तर साईबाबांना नवस केला कीं सूनबाई सुखरूप बाळंत होऊन मुलगा झाला तर शिरडीचा एक वेळचा भंडाऱ्याचा खर्च मी करीन. खरोखरच भादव्याच्या महिन्यांत तार आली कीं 'यमू सुखरूप बाळंत झाली. पुत्र झाला. अभ्यनंदन–क्षीर-सागर.' लगेच गांवभर बातमी पसरून सगळीजण आमच्याकडे पेढे मागायला आली. आम्हीहि दोन शिपतरं पेढे हलवायाकडून आणले अन् मागेल त्याला दिले. हलवायाचे पैसे कधींच चुकते झाले नाहींत, पण त्याच्या घराजवळ सरकारी जमीन होती तिचा उपयोग न करण्याबद्दलची नोटीस त्याला निघाली होती ती बंद झाली.

तारेमागोमाग पत्र आलें. मुलगा चांगला निरोगी आहे. कोणासारखा दिसतो तें आतांच सांगतां येत नाहीं. आपण रजा काढून बारशाकरितां आईसाहेबांस घेऊन येथें जरूर येणें. मी बारशाची तयारी केली. शेजारीच येवलें गांव आहे नि तिथें पितांबर, पैठण्या वगैरे कपडे फार चांगले होतात. टांग्यांतून मुद्दाम येवल्याला जाऊन सूनबाईकरतां एक अन् विहिणीकरतां एक अशा दोन पैठण्या नि सूनबाईच्या बहिणी-भावजयींकरतां खण खरेदी केले. नातवाकरतां डूल, हासळी, चिमुकली सलकडीं, सोन्याचा कडदोरा नि चांदीच्या साखळ्या इतकं सगळं येवल्याच्याच सोनाराकडून करून घेतलं. बारशाच्या अगोदर चार दिवस आम्ही पुण्याला गेलों. आमच्या घरांत भाऊचं राज्य चालू होतं. सगळीकडे केरकचरा नि अव्यवस्था. मी नोकराकडून झाडलोट करून घेतली नि व्यवस्था लावण्याकरतां महिनाभर पुण्यांतच रहाण्याचा विचार केला. भाऊला आतां ३४ वें वर्ष लागलं होतं आणि ज्योतिषाप्रमाणें त्याला आतां लग्न करायला हरकत नव्हती. पण जन्मभर अविवाहित राहून देशसेवा करायची आहे असं त्यानं सांगितलं. मग काय मेला देशसेवा करणार होता कोण जाणें ? एकदां घडलेली अद्दल पुरें झाली नाहीं वाटतं !

बारसं मोठ्या थाटानं झालं. भादव्याच्या महिन्यांत जन्म झाला म्हणून त्याचं पाळण्यांतलं नांव गणपति ठेवलं, पण नवीन पद्धतीप्रमाणें त्याला मधुकर म्हणायचं असं ठरवलं. पैठण्या, खण अन् मुलाच्या अंगावर घालायकरतां आणलेलं सोन्याचं लेणं पाहून सगळ्यांचे डोळे दिपले. माई आपल्या मुलीला हळूच म्हणाल्या, 'मामलेदारी चांगलीच मानवलेली दिसते भगवंताला.' मला ते खवचट शब्द ऐकू आले. पण मी उत्तर दिलं नाहीं. सासूबाई अन् वन्स सुद्धां बारशाला आलेल्या होत्या. वन्स आतां कुंकू लावायचं विसरलेल्या सवाष्णीसारख्या सोज्वळ दिसत होत्या. त्यांनीं चांगला पांच रुपयांचा बाळंतविडा केला.

त्यानंतर दोन, तीन दिवसांनीं आम्ही आमच्या घरीं भोजन-समारंभ केला. कमलाबाई, सासूबाई, वन्स नि माई या सगळ्यांना येवल्याचीं लुगडीं दिली. क्षीरसागरांना पागोटं अन् जरीचं उपरणं तसंच भावोजींना जरीचा रुमाल अशा भेटी दिल्या. आमचे उपाध्ये तमण्णाचार्य सुद्धां जेवायला आले होते. जेवतांना त्यांनीं वन्सच्यावर कडक टीका केली, पण वन्संनीं हासत, खेळत ती सगळी उडवून दिली. समारंभ थाटानं पार पडला. इतक्या आनंदाचे दिवस माझ्या आयुष्यांत फार दिवसांनीं आले होते नि त्यांत भर घालायकरतांच कीं काय कोपरगांवहून रणशिंगांच्या सहीची तार आली, 'धायगुडे जास्ती नाहींत. अभ्यनंदन.' इतके चारच शब्द तारेंत होते. कायमचे मामलेदार धायगुडे रजेवर असतांना वारले म्हणून अॅक्टिंग मामलेदार शाळिग्राम यांना कायम होण्याचा चान्स आलेला होता. आंधळा मागतो एक डोळा अन देव देतो दोन!

✦ ✦ ✦

## ८ : : : भाऊची कर्जबाजारी, नि भगवतरावाची मामलेदारी

' ताई, आपल्या हातमागाच्या कारखान्याला जर लहानसं ऑईल इंजिन जोडलं तर सहा माग एकदम दुप्पट काम द्यायला लागतील; हल्लीं रोजचं तीसचाळीस वार कापड निघतं आहे त्याऐवजीं ऐंशीं वार निघायला लागेल अन् आपला दुप्पट फायदा होईल,' भाऊ अगदी लाडांत येऊन मला म्हणाला.

' मग घे विकत, नाहीं तर भाड्यानीं. आठशें रुपयाचं कापड तुझ्याजवळ पडून आहे न् लढाईला तोंड लागतांच आठशेंचे दोन हजार होतील म्हणत होतास. आतां लढाई तर सुरू झाली आहे म्हणे, विकून टाक तें कापड न् घे ऑईल-इंजिन '– मी.

आमचं बोलणं ऐकून भगवंत बसल्या जागेवरून आमच्या जवळ येऊन उभा राहिला अन् म्हणाला, ' कापड विकून आधीं शेताच्या खंडाचे दोन वर्षाचे सहाशें रुपये देऊन टाक माझे ' ' माझे ' बरं का, आमचे नाहींत ! आतां तो एका मुलाचा बाप झाला होता ना !

थोडा वेळ भाऊ कांहीं बोलला नाहीं, जमिनीवर बोटानं रेघोट्या काढीत कसला तरी विचार करीत होता. मग तो म्हणाला, ' बोहोरी लोक म्हणजे मारवाड्यांवर ताण करणारे आहेत. '

' कां, काय झालं भाऊमामा ? तुला अनुभव आला कीं काय ? ' भगवंतनं विचारलं.

' मीं हातमागावर काढलेलं तें सगळं आठशें रुपयांचं कापड त्यानं जप्त करून नेलं ' भाऊ मोठ्या दुःखानं एका दमांत म्हणाला.

'काय ?' मी रागानं उद्गारलें.

'व्हाट दि मीन . . . ?, असं कायसं मूठ वळवून भगवंत ओरडला.

'भगवंत, असा खवळूं नको. हा कापडाचा उद्योग आपण देशकार्य म्हणून करीत आहों, नफ्याकरतां नाहीं' – भाऊ.

भगवंत म्हणाला, 'मामा, आपण करतों आहों, आपला कारखाना असे शब्दप्रयोग आतां कारखाना तुटींत येतो आहे म्हणून तुला सुचताहेत. नाहींतर माझा कारखाना, मीं इतका नफा मिळवला अशी भाषा होती. ती चौथीच्या पुस्तकांतली पैशाची पिशवी सांपडणाऱ्या दोन वाटसरांची गोष्ट आहे, तिची आठवण झाली मला.'

ती गोष्ट काय आहे सांगूं? भगवंत वाचीत असे तेव्हांपासून मला ऐकूनऐकून माहीत झाली आहे. एकदां दोन वाटसरूं रानांतल्या वाटेनं चालले होते. त्यांना एक पिशवी वाटेंत पडलेली दिसली. तेव्हां एकजणानं घाईनं पुढें जाऊन ती पिशवी उचलली न् म्हटलं, 'ही पिशवी मीं उचलली तेव्हां माझी एकटयाची आहे.' थोडयाच क्षणांत पिशवीचा मालक दोन सरकारी शिपाई घेऊन पाठीमागून येत आहे असं त्यांनीं पाहिलं. ते आपली झडती घेणार न् पिशवी चोरल्याचा आळ घालून आपल्याला बांधून नेणार असं लक्षांत येऊन तो म्हणाला, 'गडया, ही पिशवी आपण उचलली हें बरं केलं नाहीं.' मित्र म्हणाला, "असं का रे ? फायद्याच्या वेळीं 'मी' न् तोटयाच्या वेळीं 'आपण' असा फरक कां करतोस?"

भाऊनं उत्तर दिलं, 'भगवंत, तुझे उद्गार माझ्या काळजाला झोंबत आहेत. ताईच्या न् तुझ्या कल्याणाकरतां मीं केवढा स्वार्थत्याग केला आहे तो तूं विसरावास अन् य:कश्चित् सहाशें रुपडयांकरतां येवढं आकांडतांडव करावंस हें तुला शोभत नाहीं. तुम्हां तरुण विवाहितांना आपलीं घरचीं माणसं परकीं वाटतात अन् सासुरवाडीचीं जवळचीं वाटतात.'

इंग्लिशमध्यें कांहींतरी वाक्य बोलून भगवंत म्हणाला, ' पुढें ज्याची फेड करून घ्यायची असते त्याला स्वार्थत्याग म्हणण्यापेक्षां स्वार्थसाधना नांव दिलेलं चांगलं भाऊमामा ! '

' बोल बाबा, बोलून घे मला माझ्या सध्याच्या अडचणींत, पण ह्या अडचणींतून निघून मी तुमची पै न् पै फेडून टाकीन असा मला विश्वास आहे. तुम्ही मला ऑईलइंजिनसाठीं एक हजार रुपये द्या न् बघा माझी करामत. कापडाचा भाव खूप चढला आहे—' भाऊ.

मला भाऊची दया आली. बिचाऱ्यानं आमच्याकरतां पुष्कळ कष्ट सोसले होते ते मी विसरूं शकत नव्हतें; पण आतां नव्या बाळाच्या बारशाच्या न् बाळंतपणाच्या खर्चानं आमच्याजवळ रोख हजार रुपये सांपडले नसते; म्हणून पुनः शेताच्या तारणावर भगवंतच्या सहीनं हजार रुपये बोहोऱ्याकडून कर्जाऊ घेतले नि भाऊला दिले. भगवंत कांहीं मोठासा खुषींत होता असं नाहीं, पण माझ्या आग्रहावरून त्यानं सही दिली. ह्या व्यवहारावरून त्याचे सासरे क्षीरसागर त्याच्यावर फार रागावले असं तो म्हणत होता.

हां हां म्हणतां भगवंतची रजा सरली. उद्यां सकाळच्या प्यासिंजरनी कोपरगांवला परत जायचं तर आज पुनः भाऊचा न भगवंतचा खटका उडाला. भगवंतची पायसिकल भाऊ वापरीत होता. भगवंत म्हणाला, ' मला फिरतीवर जायला टांगा असतो पण जवळच्याजवळ कुठें जायचं असलं तर सायकलसारखं सुटसुटीत साधन नाहीं. भाऊमामा, माझी सायकल दे बुवा परत मला. '

' अरे, त्या कुग्रामांत सायकल जाण्यासारखे रस्ते तरी आहेत कां ? त्या खडचादगडांच्या न् काटचाकुटचांच्या रस्त्यानं सायकलच्या धावेला पंकचरं मात्र होतील शंभर हजार '—भाऊ.

' होऊं देत पंकचर. त्यांचं मी बघून घेईन. माझी सायकल मला परत पाहिजे. एवढंच मी तुम्हांला सांगतों मामासाहेब.

आज संध्याकाळला माझी सायकल मला परतं मिळालीच पाहिजे. उद्यां सकाळच्या पॅसिंजरनी आई न् मी कोपरगांवला परत जाणार आहों,' असं म्हणून टोपी चढवून भगवंत बाहेर गेला.

तो गेल्यावर भाऊ माझ्याजवळ येऊन बसला अन् डोळ्यांत पाणी आणून म्हणाला, 'ताई, अशी लाचारीची वेळ माझ्यावर कधीं आली नव्हती. आधीच भगवंत माझ्यावर रागावला आहे न् त्यांत हें आगीत तेल पडण्यासारखंच होणार.'

मी विचारलं, 'आणखी काय बाबा त्रांगड करून ठेवलं आहेस ?' तो म्हणाला, 'मध्यंतरी कारखान्यांतल्या मजुरांची मजुरी थकली होती. त्यांना द्यायला माझ्याजवळ एक पैसासुद्धां शिल्लक नव्हता. त्या वेळीं सायकल विकून टाकून मी ऐंशी रुपये जमा केले अन् थकलेली मजुरी देऊन टाकली. अन् आतां हा सायकल परत मागतो आहे ती देऊं कुठून ? आतां मला तो लुच्चा, ठक म्हणाला तरी ऐकून घेतलं पाहिजे.' मला थोडासा धक्काच बसला भाऊचं वर्तन ऐकून. तसा तो लबाड नव्हता पण परिस्थितीच्या कचाट्यांत सांपडला होता. त्याला मी सुचवलं, 'आतां तू कारखान्यांत रात्र काढ, किंवा एखाद्या मित्राकडे जाऊन रहा. भाऊच्या द्रिष्टीस पडूं नको नि सकाळीं आठाची गाडी आहे तिची वेळ टळली म्हणजे घरीं ये. म्हणजे त्याची अन् तुझी तोंडातोंडी व्हायला नको.' त्याप्रमाणें तो आम्ही पुणं सोडीपर्यंत भगवंतच्यासमोर आलाच नाहीं. लक्षुमी अन् बाळ यांना रीतीप्रमाणें तीन महिने होईपर्यंत क्षीरसागरांच्या घरून हालवायचं नव्हतं. म्हणून मी नि भगवंत दोघं परत कोपरगांवला आलों. टेशणवर त्याच्या गळ्यांत नि माझ्या पायावर चार पांच हार पडले होते. शेवंतीच्या अन् कण्हेरीच्या फुलांचे. पण त्या दुष्काळी गांवांत मोगरा नि गुलाब कुठून येणार ? उन्हाळ्याच्या दिवसांत तर कागदाच्या फुलांचे हार थोडं अत्तर लावून देण्याची तिथें चाल होती.

आतां निदान राहुरी – बेलापूरकडून तरी शेवंती यायला लागली होती.

आतां आम्ही धायगुडे साहेब ज्या बंगल्यांत रहात होते, त्यांत रहायला गेलों. भगवंतनं कलेक्टरसाहेबांच्या शिकारीची व्यवस्था इतकी चोख ठेवली होती अन् तीहि साहेबांच्या खिशाला पैची तोशीस न लागूं देतां कीं साहेबांनीं खूष होऊन भगवंतचंच नांव मामलेदाराच्या जागेकरतां सुचवलं अन् तो कायमचा मामलेदार झाला. आमचं वैभव जास्तच झळकूं लागलं. त्यांतून कोपरगांव हें शिरडीला जाण्याचं टेशण असल्यानं मोठाले लोक साईबाबांच्या दर्शनाला आले म्हणजे प्रथम आमच्याकडे टेकत. मग तिथून जातां येतांचा टांगा ठरवून शिरडीला जात. ह्या लोकांचं एखादं जेवण आमच्या घरीं होत असे. दीक्षित सॉलिसिटर, खाण्डवाला डॉक्टर असे मोठाले लोक आमच्याकडे पाहुणे येत. पावरीशेट म्हणाले, ‘रावसाहेब, तुमचा सगळा थाठमाठ उत्तम जमला आहे. पण तेच्यामदीं एक खामी आहे. मिसेस शालिग्राम आपला प्रिन्स ऑफ वेल्स ह्यांना घेऊनशानी येतील तेव्हां तो परफेक्ट होईल.’

‘आतां आणखी दीड महिना झाला की, पावरीशेट, तुमची इच्छा पूर्ण होईल.’

पावरीशेटची इच्छा पूर्ण व्हावी असा पंढरीनाथाचा हेतू नव्हता. भगवंतची बदली पंढरपूरला झाली अन् आम्ही कोपरगांव सोडून पंढरपूरला गेलों. तिथें नुकतीच आगगाडी सुरू झाली होती नि टेशण आणि गांव यांच्या मधल्या रस्त्यावर बंगले अन् धर्मशाळा बांधल्या जात होत्या. पंढरपूरला बदली झाल्यानं मला फार बरं वाटलं. देवाधर्मांत वेळ चांगला जाईल, नित्य सुद्धां पांडुरंगाचं दर्शन होईल, चंद्रभागेचं स्नान होईल, चांगलीं चांगली कीर्तनं अन् प्रवचनं ऐकायला मिळतील असा मोठा आनंद मला झाला. आम्हाला टेशणरोडवर एका बंगल्यांतील जागा भाड्यानं मिळाली. नदी तिथून जवळ होती पण

पांडुरंगाचं देऊळ लांब होतं. मला त्याची फारशी अडचण भासली नाहीं कारण आमच्या घरीं टांगा होता. भगवंत जेव्हां फिरतीवर गेला नसेल तेव्हां मला टांग्यांतून जातां येत होतं. पहांटे उठून जवळपासच्या बायकांच्या संगतींत चंद्रभागेवर जाऊन स्नान करणं अन् पहांटे काकडआरतीला देवळांत हजर रहाणं हें मोठं भाग्य होतं. ‘ ऐसें भाग्य कधीं लाहतां होईन’ अशी साधुसंतांना सुद्धां तळमळ लागून राहिलेली होती, तें भाग्य माझ्याकडे आतां चालून आलं होतं. तुम्हांला ठाऊकच आहे कीं, विठोबाच्या गाभाऱ्यांत प्रवेश मिळणं फार कठीण असतं अन् देवापुढें पळभर सुद्धां तुम्हांला उभं राहूं देत नाहींत. पण माझ्याबरोबर कचेरीचा डगला पट्टा चढवलेला शिपाई येत होता अन् तो बडव्या पुजाऱ्यांना दरडावून सांगत असे की, मामलेदारसाहेबांच्या मातोश्री आहेत ह्या. मग सगळे लोक मला दबकून असत. एकदां तर पांडुरंगाच्या ओठांवर लोण्याचा गोळा चढवावयाचा मान मला मिळाला होता; आहांत कुठें ? आम्ही पंढरीला गेल्यावर सूनबाईचे तीन महिने पूर्ण झाले अन् ती बाळाला घेऊन स्वतःच्या घरीं आली. लवकरच कार्तिकी एकादशी आली अन् विठ्ठलाची महापूजा रावसाहेब अन् बाई-साहेब यांच्या हस्तें झालेली ह्या आईसाहेबांना डोळे भरून पहायला मिळाली. खरं म्हणजे तो दिपोटी कलेक्टरचा मान आहे. पण त्या वेळचा दिपोटी कलेक्टर सहस्रबुध्या प्रार्थना-समाजिष्ट होता, म्हणून मूर्तिपूजा करायचं त्यानं नाकारलं. ह्या सहस्रबुध्याच्या घरीं भगवंतची कशी फजिती झाली तें मी मागेच तुम्हांला सांगितलं आहे. पुन्हां एकदां ऐका, कदा-चित विसरला असाल. एक दिवस सकाळच्या प्रहरीं मेवामिठाई खरेदी करून भगवंत गेला सहस्रबुद्ध्याच्या मुक्कामावर. आणखी रावबहाद्दूर पूजा करताहेत असं ऐकून ओसरीवर झोंपाळ्या-वर वाट पहात बसला. इतक्यांत तीन गोजिरवाणी मुलं आंतून धांवत आलीं आणखीन त्याच्याजवळ बसली. एकंदरींत मुलं

बरीच चुणचणीत दिसली, तशी भगवंतानं प्रत्येकाला खाऊ दिला. हें मुलांचं कौतुक ओसरीवर डाळ निवडीत बसलेली माझ्यासारखी एक बाई बघत अन् मुलांच्या लिला बघून गालांतल्या गालांत हांसत होती.

सहस्रबुद्धया पूजा आटपून बाहेर आला नि ओसरीच्य आरामखुर्चीवर बसून भगवंताशीं बोलूं लागला. तीं द्वाड पोरं भगवंतच्या फारच अंगसटीं जाऊं लागलीं. तेव्हां रावबहादूर त्यांना डोळयांनीं दटावूं लागले. भगवंत म्हणाला, 'साहेब, लहान मुलं आहेत त्यांनीं असं केलं तरी आपण रागावयाचं कारण नाहीं. मुलं म्हणजे फुलं आहेत. त्यांना चुरगाळूं नये. घ्या रे घ्या आणखी पेरू घ्या.' त्या तीन मुलांतला लहान मुलगा होता त्यानं भगवंतरावाची पगडी आपल्या डोक्यावर



" 'गृहरत्नानि बालकाः' असं कालीदासानं म्हटलं आहे, साहेब! "

चढवली, मधली मुलगी होती तिनं त्याचा चष्मा, काठी पटकावली अन् मोठा मुलगा झोपाळ्याखालीं जाऊन पेरूंशीं खेळत पडला होता. इतक्यांत एक घाणेरडा, काळा, खर्जुडा मुलगा भगवंतरावाच्या जवळ चिकटून उभा राहिला अन् 'मला थाऊ दे' असं म्हणाला. भंगवंतरावाला वाटलं हा त्या स्वैपाकाच्या बाईचा मुलगा असेल म्हणून त्यानं त्याला बाजूला सरकावून अगदी थोडा खाऊ त्याच्या हातावर दिला अन् 'चल जा' म्हणून तो मुलगा ज्या ठिकाणीं चिकटून उभा होता तो कोटाचा भाग स्वच्छ झटकला. त्या दांडगाई करणाऱ्या मुलांच्या अंगावर सहस्रबुद्धचा ओरडला, 'ए कारट्यांनों, चला चालती व्हा इथून! इथें कोणी बसायला आलं कीं शिच्याना जसा ऊत येतो. गेट आउट ड्याम फूल!' भगवंतराव म्हणाला. 'मुलांना मन मानेल तसं खेळूं द्यावं साहेब. 'गृहरत्नानि बालका:' असं कालीदासानें म्हटलं आहे. अशी चुणचुणीत मुलं कोणाला जवळ नकोतशी वाटतींल? नाही तर हा माझ्या जवळ उभा होता असलीं रोगट न् खुजट मुलं,–'

त्या काळ्या खर्जुड्या मुलाला जवळ घेऊन सहस्रबुध्या म्हणाला, 'मिस्टर शाळिग्राम, माफ करा, हा रोगट न् खुजट मुलगाच माझा आहे न् हीं तीन द्वाड कारटीं आमच्या स्वैपाकाच्या बाईची नातवंड आहेत!' भगवंताला जें काय चोरट्यासारखं वाटायला लागलं आहे म्हणून सांगूं? दहा वेळ त्यानं सहस्रबुद्धयापुढें नाक घासून माफी मागितली.

भगवंतच्या साध्याभोळ्या स्वभावानं त्याच्यावर बाजू उलटायचं आणखी एक उधारण देतें. तें पण मीं पूर्वीं तुम्हांला सांगितलं होतं तरी आठवणीखातर पुन: एकदां सांगतें. एकदां येवल्याला भगवंतराव मामलेदार असतांना फर्लाण्डीस नांवाचा हापकाष्ट कलेक्टर तिथें आला. भगवंतनीं याच्या आधीं त्याला पाहचलं नव्हत. कलेक्टरला लागणारं सामान म्हणजे बाटल्या, अंडी, दूध, कोंबडीं न् मटण सगळं रहदारी बंगल्यावर

पाठवून माल बरोबर पोचला आहे कां नाहीं तें पहायला बुटणेराकडे म्हणून भेटायला तो गेला. बुटणेरसाहेबांची स्वारी रहदारी बंगल्याच्या आसपास फेऱ्या घालीत होती. तिच्याकडे जाऊन खांद्यावर हात टाकून भगवंतरावानं विचारलं, 'बुट्–मारीन बुटणेरसाब, मालमसाला सब अच्छा आहे ना. मुरगी, अंडा, सोडा, दूध नीट है ना सगळं ?'



' बुट-मारीन बुटणेर साब ' – भगवंत

बुटणेरसाहेबानं कुत्र्यासारखं गुरगुर करून भगवंतरावचा हात झिडकारून दिला नि म्हटलं, 'फूल! तूं मला कोण समजतो आहेस?' (कलेक्टर इंग्रजींत बोलला नि त्याचा अर्थ भगवंतनीं मला सांगितला, तो अर्थ मी सांगतें आहें.)

'आपण फर्लाण्डीस साहेबाचे बुटणेरसाहेब आहां.'

'नो, मी बुटणेर नाहीं.'

'माफ करा, रंगावरून तसं वाटलं,' भगवंत म्हणाला नि त्या माणसाची मिजास एकदम भडकली. 'सिपॉय्, हकाल देव सालेकू!' तो ओरडला नि शिपाई त्याच्या हांकेला धांवत येतांना पाहून भगवंतची खात्री झाली कीं आपण ज्याला बुटणेर समजत होतों तोच फर्लाण्डीस होता!'

एकदा भगवंतचीच फजिती कशी झाली ती सांगत्यें. पंढर-पुरासच तो मामलेदार असतांना तोंडलं गांवच्या एका पैसेवाल्या जमीनदारानं त्याला हुर्डापार्टीला बोलावलं होतं. त्या जमीनदाराच्या शेताच्या हद्दीचे दगड, शेजाऱ्याच्या नि सरकारच्या जमिनींत घुसल्याबद्दल मोजणीदारांनीं तक्रार केली होती, म्हणून निकाल द्यायकरतां कमेटी नेमली तिचा मुख्य मामलेदार या नात्यानं भगवंत होता. अर्थात् त्याची बदली झाली तर जो नवीन मामलेदार येईल तो मुख्य व्हायचा होता. कमेटीची बैठक आणखी एक महिन्यांनीं भरायची होती. पार्टी मोठी छान झाली. सायीचं दही, गरमागरम हुर्डा, दोन चार प्रकारच्या चटण्यान् तिखट, मग चहा, न् शेवटीं पान-सुपारी. जमीनदार भगवंतकरतां त्रयोदशगुणी विडा बनवीत होता. चार पिकलेलीं पानं त्यांच्या वरच्या वरच्या शिरा कातरून पसरून फडक्यानं पुसून काढलीं, मग त्यांना चुना कात, अगदीं मोजून लावला, आणि तो सुपारी कातरायला लागला.

इतक्यांत कचेरींतले कारकून उत्पात पायसिकलवरून तिथें आले. 'रावसाहेब अर्जण्ट फोनोग्राम आला आहे, हा पहा,' ताजी आलेली तार भगवन्तच्या हातांत देत ते म्हणाले.

जमीनदारानं सुपारी पानांवर घातली, जायपत्री, खोबरं, केशर, गुंजेचीं पानं, कंकोळ, कापूर, जिनतानची गोळी असं सगळं टाकून पानांची घडी केली अन् लवंग घेतली टोंचायला—

'माझी ट्र्यॉन्सफरन्स झाली जुंदरला,' तार वाचून भगवंतनं सांगितलं.

लवंग टोंचून विडा बनवून भगवंतच्या पुढें धरून जमीनदारानीं बिचारलं. 'वरच्या जागेवर?'

'नाहीं, मामलेदार म्हणूनच; अन् सात दिवसांच्या आंत जागेवर रुजूं व्हायचं आहे. आतां नवीन मामलेदार पंढरपूरला येईल तो ह्या तुमच्या हद्दीच्या प्रकरणाचा निकाल करील!' नेहमीच्या बावळट साधेपणानीं भगवंत म्हणाला नि तो भगवंतच्या पुढें केलेला त्रयोदशगुणी विडा त्या जमीनदारानं मागें घेऊन आपल्याच तोंडांत टाकला!

लक्षुमी पंढरपूरला आल्यावर आईसाहेबांचा दिमाख कमी कमी होऊं लागला. मला त्यांत गैर कांहींच वाटलं नाहीं. म्हाताऱ्या (मी जरी वयानं म्हातारी झालें नव्हतें तरी एका मुलाची विधवा झालेली आई ह्या नात्यानं म्हातारीच म्हणायची.) बायकांनीं योग्य वेळेला आपली पोझिशन ओळखून तरूण सुनांना जागा मोकळी करून द्यावी यांत शहाणपणा आहे. तरुणांच्या प्रत्येक गोष्टींत लुडबुड करायची अन् मग त्यांनीं थप्पड दिली म्हणजे गाल खप्पड करून बसायचं हें मला पसंत नाहीं. एक दिवस सूनबाईचं नि आमच्या गाडीवाल्याचं बोलणं मला ऐकू आलं. ती म्हणाली, 'काय रे नामदेव हल्लीं घोडीं रोडावत चाललेलीं आहेत? त्यांना काम फार पडतं कीं काय?'

नामदेवानं सांगितलं, 'काय सांगूं, बाईसाहेब, आपलेच दात अन् आपलेच वोठ–तक्रार तरी कोनाजवळ करायची, पर इचारलं म्हनून सांगतों. रावसाहेब दौऱ्यावर असले म्हणजे घोड्यांना पाटील, कंत्राटदार अन जमीनदारांकडून कडबा फुकट मिळतो. पर पगा पंढरपूरला आल्यावर तो विकत घ्यावा लागतो. घोड्यांना पोटभर मिळत नाहीं हें एक अन पांडुरंगाच्या देवळावर जावं लागतं, त्यानं घोड्यांची बी झोप पुरती होत नाहीं अन् नामदेवाची पन होत नाहीं.'

सूनबाई म्हणाली, 'चंद्रभागेवर जायचं नि देवाला जायचं त्यासाठीं टांग्याची ऐट कशाला? पायांनीं जाण्यांतच पुण्य

आहे.' तेव्हांपासून मी कानाला खडा लावून घेतला कीं यापुढें टांग्यांतून म्हणून एकटीनं जायचं नाहीं. माझं तसं जाणं तिच्या डोळ्यांत सलतं आहे नि खरं पाहिलं तर तीच टांग्याची मालकीण आहे. तिनं मला टांग्यांतून जाण्याचा वरपांगीं आग्रह केला तरी तिचं खरं मत मला माहीत झालेलं होतं. म्हणून त्या भानगडींत मी पडलें नाहीं. दुसरं एक उधारण सांगतें. मधुकरचा वाढदिवस जवळ आला होता. पक्वान्न काय करायचं याबद्दल बरीच वाटाघाट झाली. माझ्या मनांत श्रीखंड करावं असं होतं अन् सूनबाईच्या मनांत जिलब्या कराव्यात असं होतं. सासूपणा गाजवून आपल्या मताप्रमाणें श्रीखंड करावं असं मनांत आणून गवळ्याला मी सांगितलं कीं उद्यां पांच शेर जास्ती दूध आण. दुपारीं मी बोलून गेलें कीं, गवळ्याला मी सांगितलं आहे जास्ती दूध आणायला. तेव्हां सूनबाई कांहीं बोलली नाहीं; पण सकाळीं गवळी दूध घालायला आला नि त्यानं जास्ती दूध आणलं नाहीं, तेव्हां मी जास्ती न आणण्याचं कारण विचारलं. तो म्हणाला, 'काल संध्याकाळीं बाईसाहेबांकडून नामदेव शिपायामार्फत निरोप आला कीं दुधाची वर्दी क्यानसल केली आहे.' माझ्या ध्यानांत आलं कीं आतां भगवंतच्या घरावरचं माझं राज्य संपलं आहे नि लक्ष्मीचं राज्य स्थापन झालं आहे. कमलाबाई घरीं आल्यावर आपली सत्ता गाजवूं पहाणाऱ्या सासूबाईंची भावोजींच्या घरीं जशी ससेहोलपट झाली तशी आपली होऊं नये अशी माझी इच्छा होती. बाळाच्या जावळासंबंधीं असाच आमचा मतभेद झाला. माझं म्हणणं असं होतं कीं मधुकरचं जांवळ त्याला तीन वर्सं पुरी होईपर्यंत काढूं नये. पण सूनबाई म्हणाली, 'आतां तो एक वर्षाचा झाला आहे ना? त्याचे केस कापून टाकले पाहिजेत. फार लांब वाढले तर कपाळावर येतात नि मुलं तिरळी पहायला लागतात.' मी म्हणालें, 'त्याच्या केसांची लहानशी वेणी घालून ती दोऱ्यानं बांधून टाकली तर केस कपाळावर यायचे नाहींत.'

'इश्श ऽऽऽ' लांब हेल काढून लक्ष्मी म्हणाली, 'मला नाहीं आवडत मुलींच्या केसांसारखी मुलांची वेणी घातलेली, त्यानं सगळीजणं चिडवतात मुलगी मुलगी म्हणून. मी तो सवा वर्षाचा झाला कीं त्याचं जावळ ठेवणार नाहीं.' याचा अर्थ इतकाच कीं सासूबाई, तुम्ही आतां आमच्या संसारांत लुडबुड करूं नका. मी योग्य तो धडा घेतला आणि दिवसांतला शक्य तितका वेळ घराच्याबाहेर घालवूं लागलें. पहांटे उठून नदीवर स्नानाला जायचं, तिथून परस्पर देवळांत जाऊन तिथेंच नऊ वाजेपर्यंत वेळ घालवायचा, मग घरीं यायच, जेवण-खाण नि घटकाभर वामकुक्षी करून पुन्हां देवधर्म, भजन, कथाकीर्तन करीत दिवेलागणीला घरीं यायच; पण बाळाला घटकाभर खेळवण्याशिवाय घरांत लक्ष म्हणून द्यायच नाहीं. ह्या माझ्या वागणुकीमुळें माझ्या मनाला शांति मिळाली नि मुलाला अन् सुनेला पण समाधान वाटायला लागलं. ती दोघं बरोबर फिरायला किंवा नाटकाला जात असत, कधीं कधीं तर एक-मेकांना अगदीं चिकटून जात पण मी कधीं त्यांच्याविरुद्ध ब्र काढला नाहीं.

'भगवत,' मी एक दिवस तो खुषींत आहे अस पाहून म्हणालें, 'आपण पढरपुरांत आहों तोंपर्यंत एकदां सासूबाईंना नि वन्सना यात्रेला म्हणून बोलवायला काय हरकत आहे ?'

'कांहींच हरकत नाहीं, आई. तसं पाहिल तर माझ्या सासुरवाडची सगळीजण दोन दोनदा इथें येऊन गेली आहेत. काका, काकू अन् माई सुद्धां आली होती. आजीला अन् आत्या-बाईला उद्यांच बोलावण धाडतों. कारण लवकरच माझी बदली होण्याचा सभव आहे.'

त्या दोघींना लागलीच आमंत्रण गेलं अन् त्या आगाऊ कळवून पढरपूरला आल्या. भगवंत दौऱ्यावर गेला होता म्हणून कारकून उत्पात आणि शिपाई नामदेव ह्या दोघांना टेशनवर पाठवलं होतं. दोघीहि मोठ्या खुषींत दिसत होत्या. वन्स तर

अगदीं अपटुडेट, असं कायसं तुम्ही म्हणता ना, तशा दिसत होत्या. लांब केसांचा बुचडा, लांब बाह्यांचं पोलकं, इरकली लुगडं, पायांत चप्पल नि हातांत छत्री. सासूबाई मात्र अगदीं जुन्या पद्धतीच्या राहिल्या होत्या. वन्सनीं आल्याबरोबर पुरुषांच्याप्रमाणें मला नि लक्ष्मीला हात जोडून नमस्कार केला. आम्ही मात्र त्यांना नि सासूबाईना खालीं वाकून नमस्कार केला. दुसऱ्या दिवशीं भगवत दौऱ्यावरून परत आला. आजीला न् आत्याला पाहून त्याला फार आनंद झाला. 'आतां आल्यासारख्या चार दिवस राहून जा, घाई करूं नका परत जायची,' तो वन्सना म्हणाला.

'यापेक्षां चार दिवसांहून ज्यास्त राहूं नका म्हणेनास पस्ट? अरे आम्ही तर महिनाभर इथें रहायच्या विचारानं आलों होतों!' वन्सं डोळे मिचकावीत माझ्याकडे पाहून म्हणाल्या.

'आत्या, तूं न् आजी महिनाभर राहिलांत तर मला आनंदच होईल पण माझी जुन्दरला बदली झाली आहे अन् आठ दहा दिवसांत जायला लागेल. आर्डर आली होती सात दिवसांत निघायची पण जरा खटपट करून मुदत वाढवून घेतली आहे'—भगवत.

'आपण गेलांत तरी बिऱ्हाड महिनाभर राहीलच ना इथें' सूनबाई बाहेर येऊन म्हणाली. 'मग आत्याबाई नि मोठ्या आजीबाई राहिल्या महिनाभर तर काय अडचण आहे?' तिनं वडील माणसांत असं येऊन नवऱ्याशीं बोलणं आम्हांला चमत्कारिक वाटलं पण ती होती रावसाहेबीण नि आम्ही आपल्या होतों आस्रित विधवा! आमच्या वाटण्याला काय किंमत आहे?

'लक्ष्मी, तूं येवढं बोललीस नि अगत्य दाखवलंस यानंच केवढं बरं वाटलं मला! तुझ्या घरीं महिनाभर राहून पुरण-

पोळीचं जेवण रोज जेवल्यागत वाटतं आहे मला –' सासूबाई म्हणाल्या. सुनेशीं बोलणं कस होतं नी आतां नातसुनेशीं कसं लघळपणाचं झालं, आलं का लक्षांत तुमच्या? परिस्थितीनीं त्यांना लोण्याच्या गोळ्यासारखं नरम करून टाकलं होतं.

नंतरच्या पहाटे मामलेदार साहेबांच्या टांग्यांतून सासूबाई नि वन्संना घेऊन गुजराथ्यांच्या धर्मशाळेजवळच्या डोहाकडे स्नानाकरतां गेलें. वन्सं अंगाला साबण लावायला लागल्या, तेव्हां धर्मशाळेंतला गुजराथी नोकर मोठ्यानं ओरडला; 'अहो इथें साबू लावायचा नाहीं !'

'कोण हो तुम्ही आम्हांला सांगणार साबण लावायचा का नाहीं तें ? ही नदी तुमच्या मालकीची आहे कीं काय ?' वन्संनीं ओरडून विचारलं.

'थांबा सांगतों' असं म्हणून तो घाटाच्या पंचवीस पायऱ्या उतरून खालीं आला नि म्हणाला, 'आमच्या घाटाला साबणाच्या फेसांचा विटाळ होतो.' आमच्या बरोबर मुद्दाम एक पट्टेवाला दिला होता तो आधीं जरा लांब उभा राहिला होता तो जवळ येऊन म्हणाला, 'मोहन, जरा बेतानं बोल, रावसाहेबांच्या घरची मंडळी आहेत.'

मोहन जरा टरकला अन् आदबीनं बोलायला लागला. 'हें बघा बाईसाहेब, साबूनं पाणी अपवित्र होतं. त्यांत चरबी रहाते. आपण इथें तीर्थाच्या जागेंत साबू लावला नाहीं तर चांगलं होईल.'

'उलट तुमचं हें घाणेरडं साचवणीचं पाणी स्वच्छ होईल आमच्या साबणानं,' वन्सं म्हणाल्या.

'बने, उगीच वादंग घालूं नको परक्या ठिकाणीं. पवित्र म्हणजे स्वच्छ नाहीं. क्षेत्रांतलीं कुंडं जितकीं ज्यास्त घाणेरडीं तितकीं ज्यास्ती पवित्र असतात–' सासूबाई म्हणाल्या.

'काय बोलल्यात आजीबाई ? साधु लोकांच्या अंगाचा मळ पाण्यांत जितका मिसळेल तितकं तें पाणी ज्यास्ती शुद्ध होतं.' –मोहन.

'शाबास तुमची ! साधुजनांच्या अंगाच्या मळानं आमच्या मनांतल्या पापांचा मळ साफ होऊन जातो असं तुमचं म्हणणं आहे कीं काय ? '

'हाज तो (होय तर)?' तो गुजराथींत म्हणाला.

'पण काय हो इथें आम्ही बायका स्नान करीत असतां इकडे बघायचं कारण? आम्ही काय तुमच्या घाटाचे दगड काढून पळवणार होतों कीं काय? जा पाहूं इथून लांब न् बायका स्नान करतांना इकडे बघूं नका!' असं वन्संनीं चापल्यावर तो बडबडत परत गेला. आम्ही तिघी गुडघाभर पाण्यांत शिरून तपेलीतपेलीनं अंगावर पाणी घ्यायला लागलों. तेवढ्यांत 'ममोपात्तदुरितक्षयद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं प्रातः-स्नानं करिष्ये' असा मंत्र म्हणत एक बडव्या तिथें येऊन उभा राहिला.

'हं संकल्प सोडा माईसाहेब, त्याशिवाय चंद्रभागेचं स्नान फुकट आहे.' तो म्हणाला.

'हूं. हें उदक धरतें हातांत. बोला संकल्प.' सासूबाई.

'म्हणा ममोपात्त.' बडव्या सांगूं लागला.

'अरे ए बहिरट म्हणे म्हणा ममोपात्त. अरे वा रे पठ्ठ्या, त्यांचं नांवगांव गोत्र विचारल्याशिवाय लागला संकल्प सोडवायला! अहो आजीबाई, कोण गांव?' असं ओरडत दुसरा एक बडव्या तिथें प्रगट झाला,

मग त्या पट्टेवाल्यानं त्यांना चापलं. 'अहो भटजी, तुमचं इथें काम नाहीं. रावसाहेब शाळिग्रामांच्या आई, आजीबाई अन् आत्याबाई अशा तिघी आहेत. आपण दुसरीकडे जावा.' मग आम्ही बडव्यांच्या त्रासाशिवाय आंघोळी करून कोरडी लुगडी नेसून पायींच पांडुरंगाच्या देवळाकडे गेलों. टांग्याचा विटाळ, स्नान झाल्यावर नको असं सासुबाईंचं म्हणणं पडलं.

✦ ✦ ✦

# ९ : : अवमानित भगिनीमंडळ

आम्ही नगरप्रदक्षिणेच्या वाटेनं वाटेंतले देव घेत घेत जातांना दोन पोक्त वयाच्या स्वकेशांनीं वन्संना गाठलं अन् त्या म्हणाल्या, 'नमस्ते, ढेकणे. आलों कीं नाहीं आम्ही ठरल्या-प्रमाणें?'

वन्स म्हणाल्या, 'फार चांगलं झालं. आणखी किती जणी येणार आहेत? आपण शंभरावर आमंत्रणं पाठविली. त्यांतल्या पन्नास जणींनीं येतो अशी उत्तरें दिलीं. आतां प्रत्यक्ष किती जणी येतात तें पाहिलं पाहिजे. पण हें पहा, रखमाताई, सकाळपासून संध्याकाळपर्यंत बसून रहावं लागलं तरी हरकत नाहीं अशा खंबीरपणानं आपलं धरणं कायम राहिलं पाहिजे,'

ही काय भानगड आहे असं मी वन्संना विचारलं तेव्हां त्या म्हणाल्या, 'तें एक राजकारण आहे. बोलून चालून बायकांचं राजकारण त्यात मोठंसं साध्य कांहींच नाहीं. देवळांत गेल्या-वरच समजेल काय आहे तें.' आम्ही पुढें जाऊं लागल्यावर आणखी एक वीस वर्ष वयाची स्वकेशा आम्हांला येऊन मिळाली. 'कसा नाहीं मिळत विठ्ठलाच्या गाभाऱ्यांत आम्हांला प्रवेश तें पहाते. पुरुषांनी मेल्यांनीं वाटेल ते अनाचार करावे नि विठोबाची पूजा करावी, त्याला आंघोळ घालावी अन् त्याच्यापुढें आलेले पैसे गडप करावे, पण बायकांच्या बाबतींत मात्र हे नाकानं कांदे सोलीत बसतात.'

आम्ही महाद्वारांत शिरलों तेव्हां आठ दहा स्वकेशांचं टोळकं आमची वाट पहात उभं असलेलं आम्हाला दिसलं. 'हल्लो, मिसेस ढेकणे. कबूल केल्याप्रमाणे आम्ही इथें जमलों आहों. इतकच नाहीं तर खुद्द पंढरपुरांतल्या दोन भगिनी आपल्याला

जॉईन झाल्या आहेत. त्यातली एक तर व्यतिपाताची सून आहे,' एक चांगली गोरी, उंच नि लठ्ठ बाई म्हणाली.

'आपण जरा बाकीच्या स्वयंसेवकांची वाट पाहूं नि मग मंदिरावर हल्ला चढवूं,' वन्स म्हणाल्या, 'नि हे बघा आई नि वहिनी, तुम्ही देवदर्शन करून खुशाल घरीं जा. आमचं इथलं काम आटपल्यावर मी घरी येईन. किती वाजतील तें सांगतां येत नाहीं. पण येईन हें निश्चित.'

'वन्स, हें काय नवीन खूळ काढलं आहेत? मुकाट्यानं देवदर्शन करायचं अन् घरीं परतायचं तें टाकून हें काय आरंभलं आहेत?'

'तूं आधीं आईला घेऊन दर्शनाला जा. मग परत आलीस म्हणजे तुला सांगेन आमची काय कारवाई आहे ती.'

सासूबाईंना घेऊन मी दर्शनाला गेलें. पुजारी लोक रावसाहेबांची आई म्हणून मला ओळखत होते नि तेवढ्यामुळें सासूबाईंना देवाच्या चरणावर मस्तक ठेवण्यासकट सगळ्या सवलती मिळवून दिल्या. परत जातांना वन्संना बोलवायला लागलें तेव्हा त्या म्हणाल्या, 'मी तर येत नाहींच पण आमचा पराक्रम पाहायला तूंहि आईला पोंचवून इथें परत ये, पहा गंमत आपल्या नणंदेची.'

सासूबाईंना टांग्यात बसवून घरी पोंचवून मी पुन्हां देवळांत आलें. जवळ जवळ पन्नास निरनिराळ्या वयाच्या स्वकेशा बायका गाभाऱ्याच्या वाटेशीं धरणं धरून बसल्या होत्या. मघाच्या त्या लठ्ठ नि उंच बाई अन् वन्स दोघी उभ्या राहून बडवे लोकांच्या पुढाऱ्याशीं भांडत होत्या. वन्स म्हणाल्या, 'तुमचं म्हणणं काय आम्ही आपल्या वेण्या पतीला स्वर्गांत जाताना उपयोगी पडाव्या म्हणून कातरून दिल्या नाहींत हा आमचा मोठा अपराध आहे?'

बडव्यांतला मुख्य म्हणाला, 'विवाहित पुरुष मरणोत्तर स्वर्गाला जायला निघाला तर वाटेत भयंकर वैतरणी नदी आहे.

ती ओलांडायला एकच उपाय आहे, अन् तो म्हणजे पत्नीच्या केशकलापाला धरून ती ओलांडून जाणं. अविवाहित लोक किंवा विधूर ह्यांना पत्नीच्या केशकलापाचा लाभ होत नसल्यानं त्यांच्याकरतां दान दिलेल्या गाईची शेपटी हें साधन सांगितलं आहे.'

ती प्रचंड बाई, तिचं नांव काशीबाई देवचक्के होतं असं नंतर कळालं, म्हणाली, 'उत्पातबुवा, तुम्ही चांगले इंटरपर्यंत शिकलेले आहां. ह्या सगळ्या पुराणांतल्या वांग्यांवर तुमचा स्वतःचा विश्वास आहे काय? ह्या आमच्या सेक्रेटरी बनुताई ढेकणे, ह्यांचा नवरा त्याच्या चवदाव्या नि ह्रिच्या दहाव्या वर्षी मेला. काय बिचाऱ्यांनीं पापं केली असतील इतक्या लहान वयांत कीं वैतरणी ओलांडायला त्याला बायकोचे केस अवश्य वाटावे अन् तुम्ही बडवे, परिचारक, सेवक, आराध्ये मात्र सगळे पवित्रपणाचे पुतळे लागून गेला असाल नाहीं ? मी तर ऐकलं आहे, महाराष्ट्रांत सगळ्यांत कुठें जास्ती अनाचार होत असतील तर ते ह्या क्षेत्रांतच. आतां आपला ढोंगीपणा पुरे करा नि आम्हांला गाभाऱ्यांत जाऊं द्या. न पेक्षां दुतर्फा वाईट परिणाम होईल. '

उत्पात म्हणाले, ' माझ्या एकट्याच्या विश्वासावर इथल्या गोष्टी अवलंबून नसतात. सगळे बडवे जेव्हां इंटरपर्यंत शिकतील तेव्हां कांहीं सुधारणा झाली तर होईल. तूर्त मी इतकंच सांगतों कीं तुम्ही जोंपर्यंत केशसंभाराचा हव्यास ठेवला आहे तोंपर्यंत सभामंडपांतूनच तुम्हांला देवदर्शन घेतां येईल. आपण धर्माप्रमाणें शुचिर्भूत होऊन या म्हणजे गाभाऱ्याचं दार तुम्हांला खुलं होईल.'

एका म्हाताऱ्या बडव्यानं हासत विचारलं, ' तुम्हांला केश हवेत कां केशव हवा ?'

एका स्वयंसेविकेनं हासतच उत्तर दिलं, 'केश हवे, केशव पण हवा परंतु केशवपन नको. '

तिचं उत्तर ऐकून सगळ्या स्वयंसेविका हासूं लागल्या पण बडव्यांना त्याच्यांतली खुबी समजली नाहीं. ते नुस्तेच आ वासून एकमेकांकडे बघत राहूचले. (मलासुद्धां त्या बोलण्याचा अर्थ त्या वेळीं समजला नाहीं, पण वन्सनीं माझ्याकडून दहा वेळ शब्द घोकवून त्याचा अर्थ सांगितला.) बराच वेळ स्वयंसेविकांची नि बडव्यांची बोलाचाली झाली.

ह्या बायकांना वेड्यावांकड्या शिव्या देण्याची बडव्यांची इच्छा होती, पण त्यांच्यापैकींच दोघी त्या टोळींत असल्यानं शिव्या देतां येईनात. स्वयंसेविकांनीं धरणं धरून एक दिवसभर पूजाअर्चा आडवून धरली. वन्सं घरीं जेवायला आल्या नाहींत. संध्याकाळीं पांच वाजतां धरणं उठलं. कारण बहुतेक स्वयंसेविका मुंबईपुण्याहून आल्या होत्या अन् त्यांना रात्रीच्या मद्रास मेलनं परत जायचं होतं. वन्सं घरीं आल्या त्या अगदीं भुकेल्या होत्या, पण आपला जय झाला असा आनंद त्यांच्या चर्येवर दिसत होता. 'ह्या खेपेला एक दिवस तरी देवाची पूजाअर्चा आम्ही आडवून धरली, पुढल्या खेपेस निदान चार दिवस देव पारोसा ठेवूं. मेल्यांना आमच्या केसांना धरून वैतरणी तरून जायची असते!'

'वन्सं,' मी म्हणालें, 'ही चळवळ तुम्हीं काढलीत?'

'मी एकटीनं नाहीं. काशीताई देवचक्के मुंबईला म्युन्सिपालटीच्या इस्पितळांत नर्स आहेत त्यांनीं न् मीं दोघींनीं काढली, ज्ञानप्रकाशांत न् इंदुप्रकाशांत जाहिरात दिली न् इथें आम्ही जमलों. पुढल्या खेपेला याहून ज्यास्त जोराचा धक्का देऊं या धर्ममार्तण्डांना!'

'वन्सं, थोड्या वर्षांत तुम्ही फारच सुधारलात हो! पहिल्यांदा घराच्या बाहेर तुमची नजर फिरकायची नाहीं!' मी.

'त्याचं कारण असं मला घरांतच डांबवून ठेवलं होतं म्हणून मीं माझी माया दाखवायची ती कोणावर? आईबाप नि भांवंडं यांच्यावरच, तिला लांबचा पल्ला गाठतां येत

नव्हता. मी वैर कुणाशीं करायच तर आपल्या रहात्या घरीं परक्या ठिकाणाहून आलेल्या आपल्या भावजयीशीं. दुसऱ्या कोणावर आपल्या बऱ्यावाईट भावनांचा प्रयोग करून पहा-णार आम्हीं बालविधवा ? आतां सगळं जग माझ्यापुढें खुलं आहे, मायाममता करायला न् वैर साधायला. सध्यां क्षेत्रांतल्या कर्मठ दांभिकांवर सूड उगवायचं ठरवलं आहे आमच्या अव-मानित भगिनीमंडळानं—' वन्संनीं सांगितलं.

बाई बाई बाई ! केवढं शहाणपणाचं बोलणं, मला सगळं समजलं दिखील नाहीं नीटसं पण लक्षांत राहिलं आहे सगळं. पाठ करायचं न् म्हणायचं मला छान साधलं आहे, मग समजो, न समजो. आणखी एकच दिवस वन्सं नि सासूबाई पंढरपुरास राहिल्या. गोपाळपुरा, पुंडलिकाचं देऊळ, अनाथबालकाश्रम एवढं पाहिलं, थोडा बाजार केला. कुठें पंढरपुरी डाळ, बुक्का, विठोबाचं पत्र्याच्या चौकटींत बसवलेलं चित्र, एक तुळशीची माळ असं कांहीतरी सटरफटर घेतलं. माझ्या नातवाच्या हातांत पांच रुपयांची नोट ठेवली अन् ज्यास्ती रजा नाहीं असं ऐटींत सांगून त्या रात्रीच्या मेलनी परत गेल्या.

हुर्डापार्टीच्या वेळीं भगवंतच्या करतां विडा तयार करून त्याच्या पुढं धरून मग आपल्याच तोंडांत कोंबणाऱ्या तोंडलींच्या जमीनवाल्याची खोड मोडण्यासाठींच भगवंतनीं आपली बदली लांबवून घेतली होती. त्याच्यावर नेमलेल्या कमेटीचा मुख्य आतां भगवंतच झाला अन् तो विडा आतां त्या जमीनदाराला चांगलाच महाग पडला. 'मला पार्टीला बोलावून माझा अपमान केलास बाबूलाल–तुला वाटलं हा रावसाहेब शाळिग्राम चालला जुन्नरास. आतां कोण ह्याला पुसतो ? माझ्यापुढं धरलेला विडा माझ्या बदलीची बातमी ऐकतांच स्वतःच्या तोंडांत घातलास, सगळे तमासगीर हासले न् त्यांच्याकडे मोठ्या विजयी वीरासारखं टकमक बघितलंस. मुद्दाम तुझा नक्षा उतरायसाठींच मी माझीं बदली लांबवली. आतां ते हद्दीचे

दगड उलट तुझ्याच जमिनींत घुसडतों अन् वर लबाडीबद्दल तझ्यावर फौजदारी ठोकतों. आहेस कुठें ?' भगवंत गरजला.

'भाग्या शाबास! भाग्या शाबास!' पिंजऱ्यांतून पोपट ओरडला.

पोपटाच्या या समयसूचक शब्दाचं कौतुक करण्यासारखी बाबूलालची स्थिति नव्हती. तो खूप हातापाया पडला भगवंतच्या कित्ती वेळ तरी मेला लाचारीचीं बोलणीं बोलत होता, अन् भगवंत गर्जत होता. थोड्या वेळानं उत्पात कारकून आले, ते म्हणाले, 'रावसाहेब, आपल्या मूर्खपणाबद्दल बाबूला आतां चांगलाच पश्चात्ताप होत आहे. मी त्याला नीट समजावून सांगतों आपली क्षमा कशी मागायची तें. चल रे बाबूलाल जरा इकडे ये.' आमच्या बंगल्यावर गच्ची होती, तिकडे उत्पात न् बाबूलाल गेले. जरा वेळ त्यांची हळूहळू कांहीं तरी भाषा झाली नि दोघे खालीं येऊन भगवंतच्या बैठकीत गेले. 'ऑल लाइट! ऑर लाइट! मी आतां ती तुमची चूक साफ विसरून गेलों आहे. तुम्ही निर्धास्त रहा,' असे भगवंतचे नि 'आपण मायबाप आहां, लेकराचा अपराध माफ करा' असे बाबूलालचे शब्द ऐकूं आले. उत्पात न् बाबूलाल घराबाहेर गेल्यावर भगवंत मी बसले होत्यें तिथें आला न् म्हणाला, 'आई! विडा फार महाग पडला बाब्याला!'

'अस्सं! काय किंमत पडली?'

एक बोट दाखवीत म्हणाला, 'एक हजार!'

'शाबास भाग्या! भाग्या शहाणा आहे,' पिंजऱ्यांतून पोपटाचा आवाज ऐकूं आला.

हें ऐकतांच भगवंतचं पित्त भडकलं. पिंजऱ्यावर जोराची चापट मारून तो म्हणाला, 'ह्या विठ्यानं माझी विटंबना चालवली आहे गाढवीच्यानं! इथें लोक मला सगळे म्हणतात रावसाहेब, कोणी थोडे भगवंतराव म्हणतात, पण लहानपणचं

भाग्या नांव घेणारा हा हरामखोर विठ्याच आहे.'

'ही: ही: ही: ' ! पोपटानं हासण्याची नक्कल केली.

'हा अणखी वाह्यात्पणा !'—भगवंत.

लक्ष्मी म्हणाली, 'सासूबाई सुद्धां आपल्याला आतां तसल्या नांवानं हाक मारीत नाहींत.'

'आई, उठल्या सुटल्या माझी मानखंडणा करणारा हा पोपट देऊन टाक कोणाला तरी, नाहींतर दे सोडून पिंजऱ्यांतून.'

मी म्हणालें, 'बाळ, बोलून चालून हा मुका प्राणी' —

लक्ष्मी म्हणाली, 'मेला मुका असता तर फार बरं झालं असतं—'

मी म्हणालें, 'मुका असता तर त्याच्या नशिबांत पिंजरा कशाला आला असता? कावळ्याचिमणीला नाहीं ते कुणी पिंजऱ्यांत अडकवीत? आतां हा तुझ्या लहानपणापासून घरीं आहे. तुला तेव्हां सगळीं जणं भाग्या म्हणत असत तोच शब्द त्याच्या तोंडांत बसला आहे. त्याला बापुड्याला काय कळणार तूं रावसाहेब झाला आहेस तें ?'

'कांहीं असो. माझ्या घरीं नको तो उर्मट पक्षी.'

'बरं आहे बाबा,' मी म्हणालें 'जुंदरला जातांना आपल्या पुण्याच्या घरीं ठेवून येईन त्याला, भाऊ संभाळील त्याला.'

थोड्याच दिवसांनीं जुंदरला जायला आम्ही निघालों. निघण्याच्या आधीं कचेरीच्या लोकांनीं रावसाहेबांना पान-सुपारी केली. सूनबाईला न् मलाहि बोलावलं होतं. गांवांतले प्रतिष्ठित लोक आले होते, पुष्कळांची लेचकरं झालीं. राव-साहेब मनमिळाऊ, निगर्वी, प्रामाणिक आहेत; आपल्या हाता-खालच्या लोकांशीं प्रेमळपणानं न् वरिष्ठांशीं आपला आब राखून वागतात अशीं भाषणं झालीं. मलाय् भाषण करायचा आग्रह सगळ्यांनीं केला. सभेंत बोलायचा हा माझा पहिलाच प्रसंग; पण मी धीटपणानं बोललें. 'भाग्याचा जन्म झाल्यावर थोड्या दिवसांनीं त्याचे वडील वारले. ऱ्यांड साहेबाचा (इश्य

कसलं मेलं नांव ! ) खून झाला त्याच वर्षी याचा जन्म झाला अन् महाराणी चारचाकी का कोण ती ! (चारचाकी नाहीं हो, व्हिक्टोरिया असं कुणीसं सांगितलं) तिच्या मरायच्या सालीं त्याचे वडील वैकुंठवासी झाले. त्यानंतर भाग्याचा संभाळ मी अन् त्याच्या मामांनीं केला. भाग्या फार हुशार अन् प्रत्येक परीक्षेंत फस्ट क्लासांत पास होत बी. ए. झाला. भाग्याचा भगवंत झाला नि कोपरगांवला मामलेदार कचेरींत कारकुनीची जागा मिळवून भगवंतराव झाला. भगवंताची कृपा असल्यावर काय कमी पडणार आहे ? कायमचे मामलेदार धायगुडे रावसाहेब हे वारले अन् आमचा भगवंत रावसाहेब झाला. जिजाबाईंनीं शिवबाचे जसे शिवाजी महाराज केले तसेच ह्या गरीब भीमाकाकूंनीं भाग्याचे रावसाहेब भगवंतराव केले, ह्यांत मी मोठंसं काय केलं म्हणा ? पण पोराला लहानपणीं बिघडूं दिलं नाहीं. नाहीं तर स्वदेशी चळवळींत टिळकांच्या मागें लागून जर हा बहकला असता तर सरकारी नोकरी याला कशी मिळाली असती ? तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादानं लवकरच दिपोटी कलेक्टर व्हायची संधि मिळो येवढंच पांडुरंगाजवळ मागणं आहे.’

माझ्या भाषणाला खूप टाळ्या पडल्या. नामदेव अन् उस्मान दोन्ही शिपाई म्हणाले, ‘आईसाहेब, तुमचं लैचकर सगळ्यात छान झालं.’ आम्ही पंढरपूर सोडून पुण्याला येऊन पोंचलो. पुण्यापासून जुंदरला जायला आगगाडी अजूनही नाहीं. मधलं अंतर आहे २८ कोस. तळेगांव दाभाडेपासून एक मोटार जुंदरला जात असे. पण तिचं माणशी भाडं १० रुपये होतं. टपालच्या टांग्यांतून पांच रुपये स्वारी घेऊन बारा तासांत टांगा नेत असत. पण त्यांत सामान फार थोडं जाई. सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे गाडीतळावर जाऊन जुंदरची बैलगाडी ठरवायची अन् सामान सुमान, कबिला घेऊन दरमजल करीत तीन रात्रींनंतर तिथं पोंचायचं. भगवंत एकटाच टपालाच्या

टांग्यातून गेला. त्याचं पत्र आल्यावर मी, सूनबाई नि नातू अशा तिघांनी चांगली सोबत घेऊन जुंदरला जायला निघायचं असं ठरलं. सूनबाई बाळाला घेऊन माहेरी जाऊन राहिली नि मी स्वतःच्या घरांत राहिलें. भगवंतचं पत्र १५ दिवसांत आलं नाहीं. तोंपर्यंत भाऊन केलेल्या व्यवहाराची तपासणी करण्यांत दिवस गेले. कापडाच्या कारखान्यांत त्यानं फारच गोंधळ करून टाकला होता. एक ऑईल इंजन बसवलं होतं पण हातांनीं चालवायचे माग त्या इंजनावर चालेनात. म्हणून ते सगळे लाकडाच्या भावानं विकून टाकलं अन् नवीन, यंत्रानं चालणारे माग उधार घेऊन बसवले. ते कोणाला चालवता येईनात म्हणून जास्ती रोजन्दारीचे कारागीर आणावे लागले. बाजारांत कापडाचा भाव वाढला होता म्हणून रोख पैसे देऊन कोणी आपल्या दुकानांत ठेवीनात. उधाऱ्या वसूल होईनात अन् बोहऱ्याचं व्याज तुंबलं. त्यानं भाऊवर फिर्याद केली नि इंजन अन् माग यांचा लिलाव पुकारला. भगवंतराव जामीन राहिला होता म्हणून बोहऱ्यानं त्याच्यावर नोटीस काढली होती.

'बाबा रे, तूं घरचं खा नि स्वस्थ बैस' असं भाऊला सांगायची वेळ आली होती. पण तो कसला ऐकतो? त्यानं एक मासिक पुस्तक काढलं. वर्तमानपत्रांत आपटी खाल्ल्यावर मासिक काढण्याची काय जरूर होती? पण म्हणतात ना? 'जो गुण बाळा तो जन्म काळा.' मासिकांत गोष्टीबिष्टी घ्यायच्या नाहींत, अवघड अवघड विषयच घ्यायचे असा त्याचा उद्देश होता; मग घेतो कोण असलं कंटाळवाणं मासिक? बोहऱ्याची नोटीस जुंदरास भगवंतच्या हातांत पडतांच हा प्रकार तरी काय आहे तें पहायला भगवंत घाईनं पुण्यास आला.

तसा भाऊ लुच्च्या नव्हता, माझे विम्याचे रोख पैसे हातांत आले तेव्हां तर तो साधा माधोकरी होता. पण कशाला त्यानं हात लावला नाहीं. पण कारखानदार आपण, विकणार आपण,

इंजनेर आपणच असा कारखाना चालायचा कसा? बोहो-यानं देणं सहा हजाराचं दाखवलं अन् भगवंत जामीन असल्यानं कोथरूडचं शेत बोह-याला लिहून द्यावं लागलं. झालं. त्या दिवशीं मामाभाच्यांची जी खडाजंगी झाली ती सांगतां पुरवत नाहीं. मलाही भगवंत नाहीं नाहीं तें बोलला. माझ्या मुर्वतीखातर त्यानं शेत गहाण टाकलं होतं ना? आतां मी न् भाऊनंच तें जिवापाड कष्ट करून राखलं होतं ही गोष्ट तो साफ विसरला. मनुष्य उपकार विसरतो नि अपकार मात्र आपल्या मेंदूवर कोरून ठेवतो.

मला वाटतं आतां ह्या वेळेपासून माझ्यांत न् भगवंतांत दुहीचं बी पेरलं गेलं. एकच पेला नाटकांतली सिंधु म्हणते ना कीं मुलीचं लग्न झालं म्हणजे ती आईबाप, बहीण भाऊ यांच्या द्रिष्टीनं मेली अन् ते तिला मेले आहेत असं समजावं. ह्यापेक्षां मला वाटतं मुलाचं लग्न झालं म्हणजे तो आपल्या सासूसास-यांचा मुलगा न् मेहुण्यांचा भाऊ होतो. तो आपल्या आईबापांना पारखा होतो नि बहीणभावांना चोर समजतो. मी नाटक पाह्यलं का असं विचारतां होय? कां नाहीं पाहाणार? कोपरगांवला, येवल्याला, पंढरपूरला रावसाहेबांच्या बरोबर चिकार नाटक पाह्यलींत. अर्थात् मी खुर्चीवर बसत नसे. सूनबाई बसे त्याच्या शेजारी, न् मी नातवाला मांडीवर घेऊन बायकांत बसत असे.

आतां नाटकाचा विषय निघाला म्हणून आठवण सांगतें

✦ ✦ ✦

## १० . : :    पुनः एकदां नाटकाचा विषय

पंढरपुरास गंधर्व मंडळीचा मुक्काम पडला होता. भगवंत होता तेथं मामलेदार. खेळ लागला मानापमान, न् आम्हांला वाटलं कचेरीला ठरलेलीं फुकट तिकिटं येतील म्हणून. खेळाच्या दिवशीं सकाळपर्यंत कशाला कांहीं ठिकाण नाहीं. सकाळीं भगवंत आपल्या दोन पेट् (बरोबर आहे ना शब्द?) कारकुनांशीं म्हणजे उत्पात नि व्यतिपात यांच्याशीं बोलत होता; तेवढ्यांत उस्माननीं माडीवर येऊन निरोप सांगितला 'गंधर्व कंपनींतले पंडित साहेब भेटायला येऊं का म्हणून पुसताहेत.'

'जा पाठवून दे त्यांना वर–' उत्पात म्हणाले.

'आतां ही वेळापूरला दिलेल्या तगायांची यादी तपासून पहा, मी देवाच्या अलंकारांची यादी ह्या दुसऱ्या यादीशीं टचाली करून पहातों.' व्यतिपात मोठ्ठ्यांदा पंडितांना ऐकूं जावं एवढ्या आवाजांत बोलले.

पंडित माडींत येऊन उभे राहिले. भगवंत त्यांच्याकडे लक्ष न देतां उत्पातांना म्हणाला, 'एकंदर सात हजार सातशें सात रुपये तगाई दाखल वेळापुरांत खर्च झाले आहेत, परत फेड अजून तीन हजारांची देखील झाली नाहीं! तिथें तलाठी कोण आहे नालायक?'

पंडित हात जोडून म्हणाले, 'मी आलों आहें रावसाहेब आपल्या भेटीला.'

'कोण, तलाठी?' वर डोळे न करतां भगवंतनं विचारलं.

'नाहीं, मी पंडित, गंधर्वांचा मॅनेजर.'

'ओ ऽ ऽ, सारी मिस्टर पंडित. बसा बसा. अहो उत्पात व्यतिपात! आईसाहेबांना सांगा कपभर चहा तयार करवायला·

आपली कंपनी इथें येऊन तीनचार दिवस झाले नाहीं का?–' भगवंत.

'हो तीनचार झाले म्हणायचे; तशी एक अगाऊ पार्टी येते बिऱ्हाडाची न् थेटरची गोठवण करायला. मग सवडीसवडीनं सगळे येतात. नारायणराव न् मास्तर आज येतील, सकाळच्या मेलनं,'

'आपण कधीं आलेत?'– भगवंत'

'मी येऊन लगभग तीन दिवस झाले.'

'मग आमच्यावर कृपा फार उशिरा झाली म्हणायची? बरं सगळा जम बसला आहे ना नीट? आणला का हो चहा व्यतिपात? घ्या पंडितसाहेब.'

पंडितांनीं आणखी थोडा वेळ कांही अडचणी वगैरे सांगितल्या न् मोठा उदारपणा दाखवून एक फुकट पास भगवंतला दिला. उत्पातांच्यानं रहावेना, ते म्हणाले 'मॅनेजर-साहेब, आमच्या कचेरीला दहा पास लागतात.'

'कबूल, पण तितके द्यायचा मालकांचा हुकूम नाहीं. मी काय? त्यांचा ताबेदार. ते आल्यावर विचारीन, दहा काय पण शंभर पास यांना द्या म्हणाले तरी देईन. कंपनीचं दिवाळं निघालं तर दुसरीकडे भीक मागायला जाईन' पंडित रागानं म्हणाले.

दुपारच्या वेळीं तिजोरींत आले एंटरमेंट टॅक्सचीं तिकिटं मागायला कंपनीचे लोक. तिजोरीचे कारकून होते व्यतिपात. 'आतां रात्रीं खेळ न् आत्तां दुपारीं आले आहेत तिकिटं मागायला टॅक्सचीं! आमच्याजवळ दहा रुपयांचीं तिकिटं आहेत फकस्तं, सोलापूरहून मागणी करून इथें आणावीं लागतात, इथें काय आमची तालुका तिजोरी...' व्यतिपात म्हणाले.

कंपनीच्या लोकांनीं खूप आर्जवं केलीं पण मामलेदार राव-साहेब कामाच्या गर्दींत असल्यानं आजच्या दिवसांत त्यांची भेट होणं शक्य नाहीं, एंटरमेंटची तिकिटं चिकटवल्याशिवाय

नाटकाचीं तिकिटं चालणार नाहींत,नुस्ते पैसे भरायची परवानगी आम्ही देणार नाहीं असें व्यतिपातांनीं साफ सांगितलं. पंडित स्वत: आले, दहा पास कचेरीकरतां त्यांनीं मुकाटचानं लिहून दिले न् काय चमत्कार ? रावसाहेबांच्या खास तिजोरींतून एक हजार रुपयांचीं एण्टरमेण्ट तिकिटं निघालीं.

एकांतून दुसरा विषय निघत जातो. मी नाटकांना जातें कीं नाहीं हें सांगतांना जरा वहावत गेलें जिन्सीवाले प्रोफेश्वरां-सारखी. मी कांहीं जिन्सीवाल्यांना पाह्यलं नाहीं; पण भोंडे त्यांची नक्कल करतात ती पाह्यली आहे. पंढरपूरच्या मुक्कामांत गंधर्वाचीं नाटकं चांगलीं आठदहा पाहून घेतलीं. त्यांत एक नट कित्ती वेळ पाहिलेला, ओळखीचा वाटे. पण कोण तें ध्यानांत येईना. कामं आपलीं बारीकसारीकच होतीं त्याच्याकडे. मानापमानांत चोर–शेंडी चोर–शेंडी करीत आपलीच शेंडी धरून इकडून तिकडे जाणारा, तर एकच प्याल्यांत तळीरामच्या भोवतीं जमलेल्या गर्दीतला एक, सौभद्रकल्लोळांत भादव्या असली थर्ड क्लास कामं करणारा–पण तीं सफाईदार करीत होता. साठ वर्षांहून ज्यास्त वयाचा नक्कीच दिसत होता, सत्तरचा दिखील असेल.

मग एक दिवस नाटकाच्या आधीं नटांचीं नांवं लिहिलेली पाटी रंगभूमीच्या पुढें ठेवलेली होती. उत्पातांची शाळेंत जाणारी मुलगी माझ्याजवळ बसली होती, तिनं नांवं वाचून दाखविलीं. त्यांत शेवटलं नांव नाना कापशीकर हें होतं ! आत्तां माझ्या ध्यानांत आलं पक्केपणीं. माझ्या बाबांना फसवून मला एका स्त्रीपार्टी नटाच्या गळ्यांत अडकवणारा हा एका नांवाजलेल्या नाटक मंडळीचा मालक न् रंगभूमीवरचा नायक होता. आतां नारायणराव गंधर्व जसे या मंडळीचे मालक आहेत तसा तो मालक होता न् आतां हा असलीं भिकार कामं करतो आहे, वाईट वाटलं मला ! उत्पातांच्या मुलीला मीं

सांगितलं कीं हा नाना कापशीकर पूर्वी चांगला नट होता, कंपनीचा मालक होता—

तशी तिनं सव्वा वीत लांब जीभ काढून अय्या केलं.

यानंतर दोनतीन दिवसांनीं कापशीकरांची स्वारी आमच्या दाराशीं आली. रावसाहेबांच्या मातुश्रींना भेटायचं आहे असं त्यांनीं नामदेव टांगेवाला शिपाई तिथें उभा होता त्याच्या-जवळ सांगितलं. भगवंतराव क्लबांत गेला म्हणून बैठकीच्या खोलींत मी त्यांना आणायला सांगितलं. मी आधीं तिथें जाऊन बसलें न् ते येतांच 'या बसा खुर्चीवर' असं म्हटलं.

'वर कशाला ? इथें खालींच बसतों. खुर्चीवर बसायची लायकी आतां आमच्यांत राहिली नाहीं,' खोकत खोकत बोलून ते खालीं बसले, 'रावसाहेब म्हणजे आमच्या बंडोपंतांचे चिरंजीव; त्यांना ओळख द्यावी असं वाटत होत.'

'माझं अस मत्त आहे कीं ती ओळख आपण त्यांना न दिलेली बरी. त्यांना माहीत आहे कीं आपण एका नटाचे चिरंजीव आहों. पण तुम्ही चारचौघांत त्यांना भेटून त्या गोष्टीची जाणीव करून देऊं नये हें चांगलं. बरं, मी ब्राह्मणाला सांगून येतें तुमच्यासाठीं कापी ठेवायला.' कापी होईपर्यंत आमच्या सुखदु:खाच्या गोष्टी झाल्या. माझं हल्लीचं सुख नि नानांचं दुःख. बिचारे गंधर्व मंडळींत असल्यानं त्यांना खाय-प्यायला नि अंथरायला कांहीं कमी नव्हतं, पण रोख पैसे क्वचितच दृष्टीस पडत असत. चंपूबाईची फार दुर्दशा झाली आहे, तिला कांहीं उद्योग करतां येत नाहीं, म्हातारी झाली आहे न् मला पैसे मिळत नाहींत म्हणून तिच्याकडे कांहीं पाठवितां येत नाहीं वगैरे दुर्दैवाची कहाणी सांगून त्यांनीं माझ्याकडून पांच रुपये न् सूनबाईचं एक जुनं लुगडं उपटलं, न् खोकत खूरडत परत गेले.

ही एक जुनीच आठवण मधेच झाली म्हणून सांगितली. आतां आपण मूळ आख्यानाकडे वळू. भगवंत आपल्या मामावर नि मामाला पैसे द्यायचा आग्रह करण्याबद्दल माझ्यावर रागावला. जुंदरला जातांना तो बायको न् मुलगा दोघांनाच घेऊन गेला. तिथे तो मामलेदार म्हणून नेमला नव्हता, लढाईच्या कामगिरीवर त्याची नेमणूक झाली होती. पहिली जागतिक लढाई म्हणतात ना ती बरं का ही! सैन्यांत भरती करायला रंगरूट (तेव्हांचा हा शब्द. आतां मला रिक्रूट असं नीट म्हणतां येतं) गोळा करायचे अन् वॉरलोन खपवायचं हें काम त्याच्यांकडे आलं.

आपल्याला भाग्या भाग्या म्हणून हांक मारणाऱ्या विठूला त्यानं माझ्याजवळ ठेवून दिलं होतं. फार दिवसांनी माझी अन् त्याची ताटातूट झाली होती. नुसत्या शरीरानंच नव्हे तर मनानं पण ती झाली होती. मी भावासाठीं त्याचं अहित केलं अशी त्याची समजूत झाली. सगळ्या प्रकारचीं दुःखं गिळून टाकून ज्याच्यासाठीं मी खटपट करीत झगडत जगलें होतें त्याला माझ्याविषयीं दुजाभाव वाटावा यापरतं दुर्दैव तें काय?

जुंदरास तो गेल्याला सहा महिने होत आले. मधून मधून भाऊ मला त्याच्याविषयीं वर्तमानपत्रांत आलेल्या बातम्या सांगे. पेशल ऑफीसर शाळिग्राम ह्यांनीं मिलिटरी शिपायांच्या मदतीनें जुंदर, खेड, मंचर भागांत फार आरेरावी चालविली आहे. धट्टयाकट्टया शेतकऱ्यांच्या जवान मुलांना दारू पाजून त्यांच्याकडून सैन्यभरतीच्या अर्जाखालीं सह्या घेतात आणि त्यांना पकडून लष्करांत घालतात. तू सैन्यांत नांव दाखल केलंस तर तुझं गहाण पडलेलं शेत किंवा दागिना सावकाराकडून सोडवून तुला परत देऊं असं आमिष दाखवून इतकंच नव्हे तर अनीतीची आमिषें दाखवून मशारनिल्हे शाळिग्राम हे सैन्यभरतीचा सपाटा लावीत आहेत, अशा तऱ्हेच्या

तक्रारी पुष्कळ पत्रांतून आलेल्या होत्या. खुद्द भाऊच्या मासिकांत छापण्यासाठीं पुष्कळ पत्रं येत असत. पण आपल्या भाच्याविरुद्ध मजकूर तो कसा छापील?

आणखी सुद्धा आरोप भगवंतवर येत होते. एखाद्या जवानाला रिक्रूट पकडायच अन् त्याच्या आईबापांकडून पैसे घेऊन सोडून द्यायच. वॉरलोनची सर्टिफिकिटं लोकांना घ्यायला लावायची नि मग त्यांना भय दाखवायचं कीं इंग्रजांचं राज्य जाईल अन् यांचे पैसे नवे राज्यकर्ते देणार नाहींत, त्यापेक्षा पावपट कां होईनात पैसे आजच घ्या अन् सर्टिफिकिटं मला विकत द्या. फंडाला पैसे गोळा करायचे अन् चुकीच्या पावत्या देऊन मधल्यामधें पैसे गडप करायचे. माझा मुलगा इतका बिघडेल अन् लबाडीचे उद्योग करील असं मला कधींहि वाटलं नव्हतं. पण गुळाच्या ढेपेवर मुंगळ्याला सोडायचं अन् त्यानं तिथे आपले पाय चिकटवू नयेत अशी धारणा मनांत करायची हा वेडेपणा नव्हे काय? तो जुंदरास गेल्यावर पोंचल्याचं सुद्धां पत्र मला आलं नाहीं. मधून मधून तो सरकारी मोटारींतून पुण्यास कामासाठीं येई, पण तेव्हां आपल्या घरीं न उतरतां सासुरवाडीं उतरत होता. खूप खूप दिवसांनीं तो उभ्या उभ्या भेटायला आला. 'आई, जुंदरास पुरेशी जागा नाहीं, म्हणून तुला मी अजूनही नेऊं शकत नाहीं. आठ पंधरा दिवसांनीं मी इथें खेप घालतो परंतु प्रत्येक वेळेला परत जायची घाई असते. ठीक आहे ना तुझी प्रकृति?' त्यानं विचारलं.

मी म्हणाले, 'वयोमानाप्रमाणें ठीक आहे, थोडे थोडे सांधे दुखतात. त्यासाठीं रबरी गुडघ्याच्या मिक्याप घ्या असं मुंगळे डॉक्टरनीं सांगितलं आहे. त्यांना पडतात पांच रुपये. आणूं कुठून इतके! घरपट्टी भरायची आहे, वाण्याचे पैसे द्यायचे आहेत. आतांपर्यंत पैसे मागायचा प्रसंग माझ्यावर आला नव्हता. आलेला पगार माझ्याजवळ तूं देत होतास नि तुलाच दहा पांच लागले तर माझ्याजवळूनच घेत होतास. ह्या चार

महिन्यांत घरभाड्याच्या साठ रुपयांशिवाय एक पै माझ्या नजरेस पडली नाहीं.'

भगवंतनीं आपल्या विजारीच्या खिशांतून एकदम नोटांचं बंडल काढून माझ्यापुढें फेकलं. 'हें घे शंभर रुपयांचं भेंडोळं. अन् चालूं दे तुझा खर्च. आमचे मामासाहेब कोणत्या उद्योगांत आहेत?'

मी कांहींच बोललें नाहीं. भाऊच्या उद्योगासंबंधीं मला कांहींच बोलतां येत नव्हतं. त्याच्या अंगांत देशभक्ति पुष्कळ होती अन् तिचा त्यानं धंदा केला नव्हता; म्हणून आम्हांला झीज सोसावी लागली. अलीकडे अलीकडे तर तो पुण्यांतून नाहींसा होई नि बऱ्याच दिवसांनीं परत येई. आपल्या जाण्याचं ठिकाण तो नीट सांगत नसे. इतकं मात्र खरं कीं तो पैशाची तोशिस आम्हांला लागूं देत नव्हता. मीहि त्याला त्याच्या जाण्यायेण्याबद्दल विचारणं सोडून दिलं होतं.

बन् वन्सं आतां बायकांतल्या एक पुढारी बनल्या होत्या. बायकांच्या शिक्षणाच्या चळवळी त्यांनीं हातांत घेतल्या होत्या. म्युन्सिपालटीच्या शिक्षणबोर्डाच्या मेंबर, विधवाविवाहप्रतिबंध-निवारक मंडळीच्या चिटणिसांपैकीं एक, येरवडा तुरुंगांतल्या स्त्रीकैद्यांच्या उपदेशक मंडळांतल्या एक अशा त्या पुष्कळ पुष्कळ कांहींतरी झाल्या होत्या. सासूबाईंना मोतीबिन्दु झाल्यानं दिसेनासं झालं होतं, त्या त्यांच्याकडेच होत्या. घरीं स्वयंपाक घरकामाला एक बाई ठेवली होती. ती गोळख आहे असं लोक म्हणत. कुणी का असेना, काम चांगलं करीत होती एवढं खरं.

आईचं मन लोचट असतं एवढं खरं. जुंदरला ये असं एका शब्दानंहि भगवंत माझ्याजवळ बोलला नाहीं तरी सुद्धां बिऱ्हाडकराच्या मुलाकडून त्याला पत्र लिहून घेतलं, 'नात-वाला बघायची मला फार इच्छा झाली आहे, तसंच तुझं तिथलं वैभव बघावं असं वाटत आहे. जुंदरच्या जवळ लेण्याद्रि हें अष्टविनायकांपैकीं एक स्थान आहे त्याचं आणि शिवाजी जन्मला त्या शिवनेरी किल्ल्याचं दर्शन घ्यावं असं फार वाटतं आहे. तरी मी केव्हां येऊं तें कळीव.'

यानंतर दोन दिवसांनीं भगवंत उभ्या उभ्या आला. प्रथम मला तर तो ओळखलाच नाहीं इतक्या वेगळ्या पोषाकांत तो आलेला होता. मामलेदार असतांना तो पगडी घाली न् बाकीचा पोषाक साहेबी करीत होता. आतां डोक्यावर हॅट,



'भगवंताला मी ओळखलेंच नाहीं.'

खाकी शर्ट, लांडी विजार न् उंच बूट असा त्याचा पोषाक होता. शाळेंत न् मेळ्यांत असतांना सुधारकांना साहेबी पोषाक करण्याबद्दल काय पण चवताळून शिव्या द्यायचा ? नि आतां पहा ! मला तो म्हणाला, ' आई, जुंदरला यायची तुझी इच्छा आहे. तूं यावस असं पण वाटतं; परंतु सध्यां जिजी तिथें हवा पालटायला आल्या आहेत. तेव्हां त्या आहेत तिथपर्यंत तूं न यावस हें चांगलं. सध्यां त्या ' आईसाहेब ' झाल्या आहेत. तूं

आलीस तर आईसाहेब-पदाबद्दल तुमच्यांत चढाओढ सुरू होईल. त्यापेक्षां सध्यां तूं तिकडे यायचं तहकूब कर–'

जिजी म्हणजे भगवंतची सासू बरं का ? आतां तिनं पटकावला माझा आईसाहेबपणा, म्हणजे माझं औटघटकेचं राज्य संपून गेलं. भगवंत म्हणाला, 'शिवाय ह्या आपल्या पुण्याच्या घरीं तरी कुणी कायमचं नको का ? मामाच्या एकटयाच्या ताब्यांत घर असलं तर उद्यां तो त्याचीहि वासलात लावायला कमी करायचा नाहीं. शेंजारीं काकाहि टपून बसलेला आहेच हें घर गिळंकृत करायला. तूं ह्याचा संभाळ कर म्हणजे झालं.'

झालं. गेला धाडधाड करीत जिना उतरून. थोडं खायला देऊन पाणी प्यायला सांगणार होतें आल्यासरशी, तेवढंहि झालं नाहीं. मला फार वाईट वाटलं अन् जरा दुसरीकडे चित्त लागावं म्हणून बनू वन्संकडे गेलें. नेहमीप्रमाणें त्या गडबडींत होत्या. भोवतालीं दोनचार बायका गोळा झाल्या होत्या. नवीन प्रसूतिगृह काढायची योजना चालू होती; बायकांचं बाळंतपण घरोघर करायची चाल आहे ती घातुक आहे, अडाणी सुइणींच्या हातून बाळंतपणं होतात, बाळंतिणीच्या खोल्या अंधारमय असतात, त्यांत हवा नसते – दगड न् धोंडे.

मी त्यांची बाष्कळ बडबड ऐकून म्हणालें, 'अहो तुम्ही आम्ही नाहीं का जुन्या तऱ्हेनं केलेल्या बाळंतपणाचीं लेकरं ? आपण कुठें लेचींपेचीं आहोंत अन् मेलों आहों ? '

'आमची कमेटी बसली आहे वहिनी, इतरांनीं मधें बोलायचं नवे,' वन्सं म्हणाल्या.

'बरं आहे, चालूं द्या तुमची कामटी. मी सासूबाईंच्या जवळ बसते ती संपेपर्यंत.'

सासूबाई आतां अगदीं क्षीण झाल्या होत्या. 'कोण ती– भीमा का ? बरा आहे ना भगवंत ? बाळ आतां चालायला लागला का नाहीं ? ' असे प्रेष्ण त्यांनीं अडखळत विचारले.

'वासू कसा काय आहे ? मला गांवांतल्या गांवांत असून चार महिन्यांत भेटला नाहीं. तुझ्या शेजारींच रहातो, त्याला म्हणावं भेटून घे आईला एकदा. मी कांहीं फार दिसांची सोबती नाहीं.'

अन् तें खरंच होतं. खाणंपिणं पचेना, पाणी प्यालं तरी तें पित्तानं पिवळं होऊन ओकून पडायचं. अशा हालांत पंधरा दिवस काढून त्या परलोकवासी झाल्या.

✦ ✦ ✦

# ११ : वर गेलेली कमान पुनः कोसळली!

भाऊ पहिल्यानं खूप दिवसांच्या अंतरानं घरीं यायचं, असा प्रारंभ करून एकदम नाहींसा झाला. त्याचं एक पत्र माझ्या नांवावर आलं, तें मीं वन्संच्याकडून वाचून घेतलं. प्रथम कापडाच्या कारखान्यांत मला तोटा आला म्हणून भाच्याचं शेत घालवून बसलों. नंतर मासिक काढलं त्यांत तोटा आला; बहिणीच्या परमेश्वरी नोटा ताब्यांत होत्या न् तिच्याकडून अथारिटी घेतली होती स्वतःच्या सहीनं मोडायच्या, त्यांतल्या नोटा मोडल्या. पहिल्यांदा टिश्शू रेमिडीचा, होमिओपथीचा, ज्योतिषाचा कसलाच धंदा चालला नाहीं. बहिणीच्या जिवावर जगत होतों. वडिलांचं म्हातारपणीं पोषण करायचं, तेहि बहिणीनंच केलं. असा मी नालायक. सरतेशेवटीं तूं विश्वासानं ठेवलेल्या नोटांतून कर्ज निवारून राहिलेले हजार रुपये घेऊन ह्या अज्ञात ठिकाणीं येऊन राहिलों आहे. बॉम्बच्या चळवळीच्या वेळीं जिवाला जीव देणारा एक मित्र आधींपासून इथें येऊन राहिला आहे; त्याच्याकडे तळ ठोकला आहे. इथेंच कांहींतरी मोलमजुरीचं काम बघून पोट भरीन. माझा तपास करण्याच्या भरीस पडू नको. ताई, मीं तुला फार छळलं. तुझ्या मुलाला बुडवलं. त्याची क्षमा कर न् मला विसरून जा.

भाऊ कुठें गेला असावा ह्याचा आम्हांला कांहींच तर्क करतां आला नाहीं. पण पत्रावरच्या पोष्टाच्या तिकिटांवरून वनूवन्स म्हणाल्या, 'तो गोवा प्रांतांत पळून गेला असावा.' त्या गोष्टीला आतां पंचवीस वर्षं झालीं. त्याचा कांहीं पत्ता लागला नाहीं. भाऊ गेल्याबद्दल दुःख तर झालंच मला. पण प्रामाणिकपणानं कबूल करतें जोशीबुवा, एक परीनं मला

बरंहि वाटलं. तो घरांत राह्यला असता तर घरसुद्धां साव-काराच्या ताब्यांत गेलं असतं.

तिथून मी घरीं गेलें. घरीं जाऊन कुलूप काढून आंत शिरून हुश्श करतें तितक्यांत दोन इसम पाठोपाठ जिना चढून वर आले.

'नमस्ते ! आजीबाई, आपल्याला थोडी तसदी द्यायला आलों आहों,' त्यांतला एकजण म्हणाला, 'बारा वर्षांच्या पूर्वी ह्या घरांत बार झाला होता म्हणून चौकशी करायला आलों होतों.'

'आठवलं मला; पण तो बार दुसरीकडे कुठेंतरी झाला असं तुम्हांला समजलं. तुम्हीं आतां ह्या वेळेला कशाची तपासणी करायला आलां आहां ?'

दोन खुर्च्या माडींत होत्या त्यांच्यावर त्यांना बसायला सांगितलं अन् जवळच्या पेटीवर मी बसलें.

मघाच्याच माणसानं विचारलं, 'भगवंत बंडू शाळिग्राम हल्लीं जुन्नरला रिक्रूटिंग ऑफिसर आहेत ते आपले चिरंजीव होय कीं नाहीं ?'

'होय.'

'हें घर त्यांचं आहे ना ?'

'त्यांचं नाहीं. हे माझं स्वतःचं आहे.'

'तुमच्या नांवांवर कसं आलं ?'

'हें वडिलार्जित आहे अन् भगवंतच्या वाट्याला आलं होतं. पुढें मी त्याला तीन हजार रुपये देऊन विकत घेतलं. त्याचं खरेदीखत रजिष्टर केलेलं आहे.'

पहिला मनुष्य दुसऱ्याला म्हणाला, 'तो डाकूमेंट पाहून आपण खात्री करून घेऊं. घरापुरती पक्की व्यवस्था आरोपीनीं केलेली दिसते.'

मी दचकून विचारलं, 'कोण आरोपी ?'

'आरोपी तुमचे चिरंजीव भगवंतराव. त्यांच्यावर पुष्कळ

आरोप आहेत. पंढरपूर तालुक्यांतल्या एका जमीनवाल्याच्या हद्दीच्या निशाण्यांत फेरबदल, खेड तालुक्यांत एका रिक्रूटच्या बापाकडून शंभर रुपये घेऊन रिक्रूटला सोडून देणं, अवसरीच्या चहावाल्याकडून चहा नि चिवडा विकत घेऊन त्याचे तीन आणे बुडवणं असे आणखी पुष्कळ आरोप त्यांच्यावर आहेत. सध्यां त्यांना नोकरींतून सस्पिड केलं आहे.'

दुसरा मनुष्य म्हणाला, 'अरे रामू, तूं तपासणी करायला आला आहेस, कां आजीबाईकडे गप्पा मारायला आला आहेस? इतकं सगळं ह्यांना सांगणं पोलिसला शोभत नाहीं.' पहिला म्हणाला, 'तें बरोबर आहे, पण ह्या आजीबाई मला फार पूज्य वाटतात. त्यांच्याजवळ पोलिशी गाजवावी असं मला वाटत नाहीं.' असं म्हणून ते दोघे मला रामराम करून निघून जाण्या-पूर्वी पहिला मनुष्य म्हणाला, 'आजीबाई, हे सगळे आरोप आहेत. ह्यांतून त्यांची सुटका होण्याचा चान्स आहे. तुम्ही चांगला वकील द्या. मग बाकीचं तुमच्या नशीबावर अवलंबून आहे.' ते दोघे बूट वाजवीत जिना उतरून चालते झाले अन् मी जमिनीवर अंग टाकून ढसढसा रडूं लागले. ह्याच्या पुढली दोन महिन्यांतली हकीगत अगदीं थोडक्यांत सांगतें. भगवंतला नोकरींतून सस्पिड करून पुण्यांत रहायला आणलं. तो नेहमीं-प्रमाणें सासुरवाडी उतरला होता. त्याच्याकडे पुष्कळदां मी गेलें पण कधीं तो बाहेर वकीलाकडे गेलेला असायचा तर कधीं वकील अन् साक्षीदार ह्यांच्या घोळक्यांत बसलेला असायचा. माझ्याशीं त्याचं भाषण फारच थोडं झालं. 'वाटेल तो खर्च होऊं दे, मी आपलं घरं विकायला किंवा स्त्रीधनाचे दागिने मोडायला तयार आहे. चांगला वकील अन् चांगले साक्षीदार यांची निवड कर.' मी म्हणालें.

'अग आई, घर कशाला विकायला पाहिजे? आपला शेव-टला आसरा आपलं घर हाच आहे. तें विकून निराधार व्हायचं की काय? तुझे दागिने विकून मला मदत करायची

तुझी इच्छा फार चांगली आहे. हल्लीं हल्लीं तुझ्याशीं मी तुटकपणानं वागत होतों, तें मनांत न आणतां माझ्यासाठीं सगळा त्याग करायला तूं तयार झालीस, हें पाहून मला बरं वाटतं आहे. आभाळाला भोंक पडलं तर चिंधीचं ठिगळ तिथं कसं पुरणार? मी क्षीरसागरांजवळ भरपूर पैसे ठेवले आहेत. त्यांतून वकील अन् साक्षीदार यांची भरपूर तरतूद होईल. तूं काळजी करूं नको.' आपल्या कांपऱ्या हातांनीं त्यानं माझे डोळे पुसले. त्यानंतर सूनबाई, नातू अन् विहीण ह्यांना भेटून मी घरीं परत आलें.

चांगले वकील अन् बालिष्टर भगवंतच्या बाजूनं काम करीत होते म्हणून त्याच्यावरचे बरेचसे आरोप नाशाबीत झाले, तरी सुद्धां ह्या सगळ्यांच्या फिया, साक्षीदारांचे भत्ते अन् त्यांना द्यावीं लागणारीं बक्षिसं यामध्यें वीस हजार रुपये खर्च झाले. बाकीचे क्षीरसागरांनीं आपल्या मुलीच्या आणि नातवाच्यासाठीं दडपून ठेवले. भगवंतला दोन वर्षांची सक्तमजुरीची कैद अन् पांच हजार रुपये दंड झाला. ह्या काळांत माझ्यापुढें जगायचं कसं हा प्रश्ण उपस्थित झाला. माझ्यासारख्या बायका त्या काळांत स्वैंपाकिणीची नोकरी धरीत. काय करणार बिचाऱ्या? लिहिलं वाचलं नाहीं, कलाकौशल्य नाहीं, नर्स व्हायचं शिक्षण नाहीं. दुसऱ्याच्या घरीं जायचं अन् पोळ्या लाटायच्या हेंच त्यांच्या नशिबीं लिहिलेलं होतं. तुम्ही स्वैंपाकाच्या बायांची टिंगल करणारी गोष्ट लिहिली आहे ती मला अग्निहोत्र्यांच्या मुलीनीं वाचून दाखवली बरं कां, जोशीबुवा! पण स्वैंपाकाच्या बायकांना जर लिहितां येत असतं तर त्यांनीं मालक अन् मालकिणीच्या संबंधीं ह्यापेक्षांहि जास्त चरचरीत गोष्टी लिहिल्या असत्या. थोड्याशा गंमती सांगायच्या म्हणजे मालकाला म्हातारी स्वैंपाकीण नको असते तर तरुण स्वैंपाकीण पहातांच मालकिणीच्या कपाळाला तिडीक उठते. स्वैंपाकाच्या बाईला जर मुलं असली तर तिनं त्यांच्याकडे मुळींच लक्ष देतां

कामा नये असं मालकाला वाटतं. सणासुदीच्या दिवशीं सुद्धां बाईनं गोडाधोडाचा एखादा तुकडा आपल्या ओंच्यापदरांत लपवून नेला तर तिची अमर्याद फजिती नोकरांचाकरांकडून करवितात. बाईच्यावर चोरीचे आळ घालायचे ही तर सगळ्याच मालकांची रीत आहे. साहेबांच्या खिशांतल्या पाकिटांतला एखादा रुपाया बाईसाहेबांनीं काढून घेतला किंवा बाई-साहेबांच्या पर्समधली एखादी नोट ताईसाहेबांनीं लुंगवली तरी चोरीचा आळ स्वैपाकीणबाईवर. तिचा ठरलेला पगार तुंबवायचा नि मग आमचं चांदीचं ताट नाहीं तर लोटा नाहींसा झाला आहे असा गवगवा करून पगार बुडवायचा हृया ट्रीक घरोघर चालू आहेत. मग मेल्यांच्या इथें स्टेनलेसच्याशिवाय जास्ती किंमतीचं निरांजन कां नसेना? स्वैंपाकीण बाईला स्वतःचा विश्रांतीचा वेळ नसावा, तिला तिच्या मुलाबाळांची माया नसावी, तिनं तिच्या नातलगांकडे जाऊं नये नि तिच्या-कडे कोणी येऊं नये. मालकाच्या घरच्या भानगडीकडे तिनें काणा डोळा करावा अन् कितीहि बाकी चढली तरी पगार मागूं नये, अशी सगळ्या मालकमालकिणींची इच्छा असते.

मी एका मोठ्या अंमलदाराच्या आईसाहेब म्हणवून मिरवलें, पुढें त्या अंमलदाराची बायको घरीं आली अन् माझा नक्षा कमी केला; नंतर मला वेगळं राहावं लागलं तरी खायप्यायची ददात नव्हती. अंमलदाराची अंमलदारी लयाला जाऊन त्याची सगळी पुंजी खटल्यापायीं संपुष्टांत आली अन् वर त्याला खडी फोडायला तुरुंगांत जावं लागलं तें वेगळंच! मी मात्र उघडी पडलें. तसं वन्संनीं मला जेऊं घातलं असतं, भावोजींच्या घरीं दोन तुकडे मिळाले असते, कर्नाळीला गेलें असतें तर नर्मदा माईच्या न् अरुणेश्वर महादेवाच्या क्रिपेनं झोळीभर भिक्षासुद्धां रोज मिळाली असती; परंतु येरवड्याच्या तुरुंगांत मुलगा अन् गांवांतच नातू आपल्या आजोळी असतांना लांब कोठें जाऊं न् दुसऱ्याकडे तुकडे कां मोडूं? मोठ्या घरांत बिऱ्हाडानं दिलेली

थोडीशी सोडून बरीचशी जागा होती; भांडींकुंडीं पुष्कळ होतीं; पन्नाशीला टेकलें असलें तरी हातपाय भक्कम होते. मीं विचार केला आपण खाणावळ कां काढूं नये? तात्यासाहेब शाळिग्रामांच्या सुनेनं खाणावळ घातली तर घराण्याचा दुर्लौकिक होईल असं भावोजी म्हणाले.

‘तात्यासाहेबांचा लौकिक कोणत्या प्रकारचा राहचला आहे भावोजी?’ मी म्हणालें, ‘त्यांच्या एका सुनेला विहिरींत मृत्यु आला, त्यांचा धाकटा मुलगा नाटकांत स्त्रीपार्ट करीत होता अन् नातू लांच खाण्याच्या आरोपावरून तुरुंगांत गेला! आतां त्यांच्या सुनेनं खाणावळ घातली तर काय मोठं आभाळ कोसळायचं आहे?’

‘तुझ्याशीं बोलायला बृहस्पतीच खालीं उतरला पाहिजे. कर खुशाल तुला काय वाटेल तें,’ असं म्हणून भावोजी निघून गेले. अग्निहोत्री न् रेणुकाबाईनीं माझी हेटाळणी न करतां एका अनुभविक खाणावळवाल्याला बोलावून आणून खाणावळीचा धंदा सुरू करतांना काय काय गोष्टी कराव्या लागतात तें सांगायला विनंती केली. ‘पहिल्यांदा आपल्याला केवढी खाणावळ घालायची आहे तें मनाशीं ठरवावं. ह्या मातोश्रीनीं आठ मेंबरांपेक्षां जास्त लटांबर अंगावर घेऊं नये–’ तो म्हणाला.

‘का हो?’– रेणुकाबाई.

‘झेपायचं नाहीं, व्हायचं नाहीं. नवीन मेंबर घेतांना एक महिन्याचे पैसे अगाऊ घ्यावे. थोड्याच दिवसांत पैसे मागासतातच, म्हणून एक महिना थकला तर जेवायला वाढूं नये. एक वेळ जेवणारा मेंबर घेऊं नये–’

‘काय होतं?’– अग्निहोत्री.

‘दोन वेळचं एकदांच जेवून घेतो! मेंबरांच्या कुचेष्टा ठराविक असतात. आंबट वरणांतली डाळ शोधून काढणाराला बक्षीस! भाजीवाल्यांनीं सडकी म्हणून टाकून दिलेली भाजी सगळे खाणावळवाले संध्याकाळीं गोळा करून आणतात. भाजी

कमी खावी म्हणून तिच्यांत तिखट सपाटून कोंबतात अन् पोळ्या कमी खाव्या म्हणून कच्च्या ठेवतात. मेंबराला पोटदुखी व्हावी म्हणून स्वैपाक कच्चा वाढतात. ह्या त्यांच्या कुचेष्टा त्यांनीं करायच्या आंत, आपणच करून टाकाव्या म्हणजे त्यांची तोंडं बंद होतात.'

'हें फार चांगलं सांगितलंत पण आमची भीमाताई फार हुषार आहे. मेंबरांचं तिच्या भाषणांनीच पोट भरेल, न् मग फारशी भूक रहायचीच नाहीं त्यांना भातपोळीची!' रेणुकाबाई म्हणाल्या.

एका पहिल्या तारखेला भीमाकाकूंची खाणावळ चालू झाली. स्वच्छता आणि सुग्रासता हें भीमाकाकूच धेय का काय म्हणतात तें होतें. फकस्त आठ मेंबर घ्यायचे होते, एक महिन्याचे दोन वेळचे रुपये बारा. एका वेळचे मेंबर नकोत. तुपाची वाटी हवी असेल तर एक रुपया ज्यास्त. पहिल्या महिन्यात चारच मेंबर होते, पण दुसऱ्या महिन्याला आठांची भरती झाली. दहाच्या ठोक्याला जेवण, अगदीं तव्यावरून मेंबराच्या ताटांत उड्या मारणाऱ्या फुटबॉलसारख्या फुगलेल्या ताज्या पोळ्या, काळजीपूर्वक निवडून आळ्या, खडे, डोळ, यांच्यापासून वेगळं केलेलं धान्य न् प्रत्येक मेंबराशीं हितगूज—मग कां नाहीं मेंबरांची संख्या वाढणार? हल्ली वर्तमानपत्रांत येतो ना उशामावशींचा उपदेश, सदुकाकांचा सल्ला, नाहीं तर हिरावहिनीशीं हितगूज—अगदीं तस्सं माझे मेंबर मला विचारीत नि मी त्यांना अडचणींतून वाट काढून देत असें.

शशिकांत गुप्ते हा एक मेंबर होता. चांगला देखणा, वयानं वीसबावीस वरसाचा, गोरा होता. नोकरी होती त्याला पोष्टांत. एक दिवस आपलं सहज म्हटलं त्याला, 'काय हो गुप्ते, तुमचं घरदार कुठें आहे?'

'घर इथेंच आहे रविवारांत अन् दार आहे आपल्या माहेरीं'—गुप्ते म्हणाला.

'म्हंजे? दाराशिवायच घर आहे तुमचं उघडं?' मीं विचारलं.

'दार म्हणजे बायको असा सौंस्कृतांत शब्द आहे आजी!'

'तो आहे मला माहिती. धनसुतदारा व्यर्थ पसारा, असं म्हटलं आहे कवीनीं; पण तें दार, माहेराहून आणून आपल्या घराला कां नाहीं बसवीत?'– मी.

असं विचारल्याबरोबर गुप्ते सीरियस् झाला. चष्म्याच्या काचेंतून त्याचे डोळे दिसेनासे झाले. 'मी तुम्हांला प्रायव्हेट सांगेन' म्हणाला अन् त्याच दिवशीं दुपारीं मला भेटायला आला. 'आजी. मी आपल्या बायकोला घरीं कां आणीत नाहीं असं तुम्ही विचारलं त्यासंबंधीं सांगतों. तुम्ही आपल्या मायाळूपणानं आपल्या आजीसारख्याच आदरणीय वाटतां म्हणून सांगतों. अहो तीच माझ्याकडे यायला तयार नाहीं'! तो म्हणाला.

'आश्चर्य आहे! तुमच्यासारख्या गोऱ्यागोमटच्या हुषार नवऱ्याकडे रहायला तयार नाहीं तर ती एक शतमूर्ख असली पाहिजे.'

'शतमूर्खच काय, सहस्रमूर्ख म्हणतों मी. तिच्या माहेरचीं श्रीमंत आहेत, मी बी. ए. एलल. बी. होऊन कांहीं तरी चांगली नोकरी मिळवीन किंवा वकील होईन अशा कल्पनेनं त्यांनीं मला मुलगी दिली, पण मी प्रिव्हियस्मधी दोन गचक्या खाऊन पोस्टांत नोकरी धरली. आमच्या पोझिशनमधीं वाढलेली मुलगी तुमच्यासारख्या कारकुनाबरोबर कशी संसार करेल? असं म्हणून ते तिला पाठवीत नाहींत. मग काय करूं मी?' –शशिकान्त.

मी जरा विचार करून म्हणालें, 'गुप्तेदादा, तुम्ही सासूसासऱ्याकडे तुमचा एक अंतरंगांतला मित्र नाहीं तर नात्यांतलं माणूस पाठवा अन् त्यांना निरोप सांगवा, एक तर मला घरजांवई करून घ्या म्हणजे तुमच्या मुलीला छानदार पोझिशनमधें रहातां येईल; नाहीं तर मला दुसरं लग्न करायची सम्मत्ति द्या. मी तरी बायकोशिवाय किती दिवस राहूं?'

शशिकांताचा मोठा भाऊ माझ्या सांगण्याप्रमाणें निरोप घेऊन गेला नि सांगायची गंमत अशी कीं मात्रा बरोबर लागू पडली. शशिकांतची बायको त्याच्या घरीं रहायला आली, नि दोघांचा सौंसार अगदीं चांगला चालला आहे. माझ्या उपदेशा-मुळें माझा एक मेंबर मात्र मी घालवून बसलें. मेंबरांना तोटा नव्हता मजजवळ. एक गेला तर माझ्या खानावळींत जेवायला दुसरे तीनजण तयार असत.

बहुतेक मेंबर शर्टासकट पाटावर बसत होते. चुनीलालशेट तर कोट घालून बसत. कारण तो गुजराथ्याचा कोट होता. खुंटीवर ठेवून जेवायला बसायचं धाडस त्याच्यानं होत नव्हतं. एकदां भाऊशास्त्री काशीकर प्रवचनं करायला चार महिने पुण्यास राहिले होते, तेव्हां माझ्याकडेच जेवायला येत असत. मेंबर कसेहि बसोत पण मी आपली रेशमी कद नेसून स्वैपाक करीत असे, अन् भाऊशास्त्र्यांना ते पसंत पडे. ते मात्र जेवण-घरांत न बसतां चुलीजवळ पेशल पाटावर बसून जेवण घेत. पुण्यांत दिवसेंदिवस वाढत चाललेला भ्रष्टाकार त्यांना मुळींच पसंत नव्हता. निदान एक तरी खाणावळवाली सोंवळ्यानं स्वैपाक करीत आहे, नाहीं तर ह्या पुण्यांत आपल्याला उपाशींच रहावं लागलं असतं, असं ते म्हणाले. पुण्याचा मुक्काम हलवून परत काशीस जातांना आपला मुकटा न्यायचे ते विसरले. नंतर काशीहून त्यांचं आभाराचं कार्ड आलं. त्यांत त्यांनीं लिहिलं, 'माझा मुकटा तुमच्या चुलीजवळच्या खुंटीवर राहिला आहे. तो मी तुम्हांला धर्मप्रसारार्थ देणगी म्हणून देत आहें. जो भोजक सोंवळ्यानं बसण्याची इच्छा करीत असेल त्याला भोजनाचे वेळेपुरता नेसण्यास हा विनामूल्य देत जाण्याची व्यवस्था करावी.' याप्रमाणें सोंवळ्यानं जेवण्याची इच्छा असलेल्या मेंबराला तो तात्पुरता मिळेल असं मी जाहीर केलं. एकहि जण मेला सोंवळं नेसणारा निघाला नाहीं. पण आठ दिवसांनीं बन्याबापू सावनूरकर म्हणाला, 'आजी, आजपासून

मला सोंवळं नेसावंसं वाटूं लागलं आहे. कारण दोन दिवस धर्ममार्तंडाचं प्रवचन ऐकून मी धर्माभिमानी झालों आहे.' बन्याबापू सोंवळं कां नेसूं लागला हें कोणाला उमजेना. तो इराण्याच्या दुकानचं आइस्क्रिम नि हॅमलेट खाणारा मनुष्य इतका पालटला कसा याचं सगळ्यांना नवल वाटलं. गुलाम चुलीजवळ बसून गरम पोळी झाली कीं पहिल्यांदा जवळच्या-जवळ मागून घेई; मी वाढायला गेलें कीं चमचाभर तूप आपल्या भातामध्यें मिसळून टाकी. इतर जिन्नसांनाहि हात लावून आपल्याला वाढून घेई. चुलीजवळ बसायला मिळून जिनसांवर वाटेल तसा हात मारतां यावा म्हणून केलेलं हें सगळं त्याचं ढोंग मीच बाहेर फोडलं. मुकटचाला कोणी प्रामाणिकपणानं विचारीत नाहीं असं पाहून मीं सोंवळ्यानं जेवणाराला एक रुपया दर कमी ठेवला, तरी सुद्धां तसा कोणी भेटला नाहीं. जेवणांतल्या सोंवळ्यावर मृत्युलेखच आला पाहिजे केसरींत छापून.

भगवंताला भेटायला महिन्यांतून एकदां तुरुंगांत जात होतें. जातांना थोडं लोणचं किंवा मोरंबा नेत होतें, अन् जेलरच्या परवानगीनं त्याला देत होतें. बिचाऱ्याला त्या जेलच्या भिकार कपडयांत पाहून मला वाईट वाटत होतं. दोन वर्षं संपत आलीं तेव्हां तिथल्या ओळखीच्या कारकुनानं मला सांगितलं कीं, उद्यां सकाळीं दहा वाजतां भगवंतराव सुटायचे आहेत. टांगा घेऊन कोणाला तरी त्या वेळीं तुरुंगाच्या दाराशीं पाठवून द्या. भावोजीना तसं सांगून अन् टांग्याकरतां दोन रुपये देऊन मी रवाना केलं. दहाच्या ठोक्यापासून मी सारखी वाट बघत होतें. मला वाटत होतं त्याच्याबरोबर त्याचे मित्र, सासरे वगैरे लोक येतील अन् त्याला चांगली पानसुपारी होईल, लोक त्याला हार घालतील अन् जयजयकार करतील. पण पुण्यांतली लोकं इतकीं नतद्रष्ट आहेत कीं भावोजींशिवाय काळं कुत्रं

सुद्धां त्याला समोरं गेलं नव्हतं. तो सुटणार आहे हें माहीत असून प्रत्यक्ष त्याची बायको लक्ष्मी अन् त्याचा सासरा हे देखील भेटायला आले नाहींत. तो टांग्यांतून उतरल्याबरोबर भावोजींच्या खांद्यावर हात ठेवून मोठ्या प्रयासानं माडीवर आला अन् बैठकीच्या खोलीत खाटेवर पडून मुसमुसूं लागला.

पोपट तिथं जवळच टांगलेला होता, भगवंतला पहातांच काय आनंद झाला आहे त्याला म्हणून सांगू ? 'भाग्या ऊठ, भाग्या तोंड धू, ए भाग्या' असं ओरडून तो पिंजऱ्यांतल्या काठीवर नाचूं लागला. रावसाहेब असतांना भाग्या भाग्या करण्यामुळें ह्या पोपटावर भगवंत खूप भडकला होता. पण आतां रावसाहेबी गेली. आपण आपली अन्यायाची कमाई ज्याच्या स्वाधीन केली तो सासरा अन् प्रत्यक्ष बायकोसुद्धां विचारीत नाहीं, अशा वेळीं तो 'भाग्या' शब्द त्याला समाधान देणारा



'विठ्या, मी मूर्खपणानं तुझ्यावर रागावलों.'

वाटला. त्यानं पिंजरा उघडून पोपटाला बाहेर काढलं अन् पोटाशीं धरलं. 'विठ्या, मी मूर्खपणानं तुझ्यावर रागावलों होतों, मला भाग्याच म्हण. रावसाहेब मरून गेला माझ्यांतला.'

मीं त्याला चहा करून दिला, तो त्यानं घेतला. मग त्याला अंघोळीला ऊन पाणी दिलं, जेवायला घातलं. जेवत नव्हता पण आग्रह करून समजुतीच्या गोष्टी सांगून चार घास घ्यायला लावले. तो परत खाटेवर बसतो तोंच वन्सं न् मधु दोघं भेटायला आलीं. 'बापू !' असं ओरडून मधूनं वडिलांच्या गळ्याला मिठी मारली. भगवंतनं त्याला जवळ घेतलं. 'ह्या अभागी भगवताची आठवण ठेवलीत तुम्ही ! मधु, आईला कां आणलं नाहींस बरोबर? आजारी बिजारी तर नाहीं?' त्यानं विचारलं.

'आई येणार नाहीं तुम्हांला भेटायला. मला सुद्धां ती पाठ-वीत नव्हती. पण मी तिचं न ऐकतां आलों, बापू ! तुम्ही तुरुंगांत होतां म्हणून हो काय झालं बापू ? टिळक तर तीनदां तुरुंगांत गेले होते न् हल्लीं गांधी तुरुंगांत आहेत–' मधु म्हणाला.

वन्सं म्हणाल्या, 'विस्तवाजवळ लोणी ठेवतां कां न् तें विरघळलं म्हणजे त्याला झोडपतां कां ? भगवंत, मी तुला काडीचा दोष देत नाहीं.'

भगवंत म्हणाला, 'आत्या, आई ! तुमच्यासारख्या बाल-विधवांचा आदर्श समोर असतांना विस्तवाचा न् लोण्याचा दृष्टान्त काय कामाचा ? आम्हां पुरुषांना यःकश्चित् द्रव्याचा लोभ आवरतां येत नाहीं, पण तुम्ही बायकांनीं त्यापेक्षां मोह पाडणाऱ्या मनोविकाराला कसं जिंकलं हें कोडं मला उल-गडतां येत नाही.'

'आम्ही शंकरापेक्षांहि पराक्रमी आहों, नाहीं?' वन्सं थट्टेनं म्हणाल्या.

✦ ✦ ✦

## १२ : : येरे माझ्या मागल्या !

खाणावळ चालवतांना नाना प्रकारच्या बायकांशीं, पुरुषांशीं, मुलांशीं, मुलींशीं प्रसंग यायचाच. कुणी जेवायला येऊन पैसे वेळच्या वेळीं न देणारे, कुणी बुडवणारे, कुणी बुडवलेले पैसे आठवणीनं आणून माफीसकट देणारे, कुणी नोकरी आहे का तुमच्या हाताखालीं म्हणून विचारणारे—हजार प्रकारचे. जेवायला येणारी मंडळी हजार प्रकारची. कुणी मास्तर तरकुणी ष्टूडण्ट, कुणी हापिसर त कुणी कारकून, कुणी मुलीला स्थळ तरकुणी देहू-आळंदी-जेजुरी वगैरे स्थळं बघायला आलेले, कुणी आजन्म अविवाहित राहून कसला तरी नाद लावून घेतलेले तरकुणी एका मागून एक तीन नाहीं त चार लग्नं करणारे —

एक दिशीं अशी गंमत झाली. एक ठेंगणा ठुसका चांगला दिसणारा कानडी ग्रहस्थ बारा वर्षांच्या मुलीला घेऊन आला. मी त्याला म्हटलं, 'अहो; ही माझी फक्त खाणावळ आहे. रहाणावळ नाहीं. तशी तो म्हणाला, 'मला—थोडा वेळ रहायचं आहे न् ही पोरवयाची रेवती. हिला कुठं ठेवूं हाटेलांत ? फार हट्ट करीत होती मला कीचकवध नाटक पहायचं म्हणून, आज रात्रीं नाटक दाखवीन न् उजाडतां आम्ही परत जाऊं रेल्वेनं साताऱ्याला. तुमच्यासारख्या प्रतिष्ठित बाईच्या स्वाधीन हिला करायला कांहींच भीति नाहीं. ए भीमाआजींच्या जवळ बैस. मी नाटकाची तिकिटं काढून येतों.' तो तिकिटं काढायला गेल्यावर त्या मुलीनं बरोबरच्या सामानांतलीं केळीं काढून खायची सुरवात केली. 'अग रेवती, पोट दुखेल, किती केळी खायचीं मेली ?' असं मीं म्हटलं तरी तिनं ऐकलं नाहीं, केळीं खायचा सपाटा चालवला. इतक्यांत

तो कानडी ग्रहस्थ परत आला. मीं रेवतीला त्याच्यापुढें उभी केली तरी केळं खाणं चाललंच होतं तिचं. ' पहा हो ही तुमची नात सारखी केळी खातीय्. पोटांत दुखायला लागलं तर म्हणाल भीभाआजींच्या हातच्या पोळ्या खाऊन पोट दुखायला लागलं माझ्या नातीचं.'



' ही माझी नात नव्हे आजी,– ही बायको आहे पांचवी ! '

' तसं कधीं म्हणणार नाहीं, कारण ही माझी नात नाहीं आजीबाई, ही माझी पांचवी बायको आहे–' तो गंभीर चेहऱ्यानं म्हणाला,

हें ऐकतांच त्या मुलीनं इश्शं करून त्याच्या अंगावर केळ्याची साल फेकली. त्यानं म्हटलं, 'अशानं मी तुला नाटक पहायला नेणार नाहीं–' मी आपली त्या जोडप्याच्या प्रेमांत माझी म्हातारीची धोंड कशाला म्हणून स्वैंपाकघरांत गेलें झालं. अशा गमतीच्या गोष्टी खाणावळींत घडत तर कधीं डोळ्यांतनं

पाणी आणणाऱ्या सुद्धां पहायला मिळत. एकदां एक विधवा पोक्त बाई टांग्यांतून उतरली सामानसुमान घेऊन. सामान म्हणजे काय ? एक वळकटी नि लहान ट्रंक येवढंच. मेंबर बसले होते जेवायला. त्यांना विचारलंन् 'भीमाआजींची खाणावळ हीच कां ?' तशी 'होय, हीच.' मीं तिलाय् सांगितलं कीं, 'बाई, माझ्याकडे रहायची सोय नाहीं.' तेव्हां ती म्हणाली, 'आजी, मी खाणावळीत उतरायचं म्हणून तुमच्याकडे आलें नाहीं. तुमची पाहुणी म्हणून आलें आहे. दोन दिवसांत देहू, आळंदी, करून पंढरपूरला जाणार आहें. गांवांत कोणाची ओळख नाहीं पण तुमचं नांव बडोद्यास ऐकलं नि इथें आलें उतरायला.'

'कोणाकडून ऐकलंत माझं नांव ?'

'तुमचा मावसभाऊ आहे ना लालजी ? कर्नाळीस अरुणेश्वराचा पुजारी आहे, तो कधी कधीं बडोद्यास येतो. त्याची माझी भेट होते दिंडोरकरच्या राममंदिरांत. त्यानं सांगितलं तुमचं नांव नि पत्ता. मी आपली दोन तीन दिवस तुमच्या इथें पाहुणी म्हणून राहीन नि परत जाईन. पाहुणी असलें तरी माझा खर्च नाहीं तुमच्यावर पडूं देणार. पैसे देणारे घोस्ट असं म्हणतात ना इंग्रजींत तशी मी राहीन.'

बडोद्याकडून आलेली बाई असल्यामुळें मला तिच्याबद्दल आपुलकी वाटली. पैसे देणारी घोस्ट म्हणून तिला मी राहून न घेतां माहेरची पाहुणी म्हणून वागवलं. दोन रात्रीं बारा वाजेपर्यंत आमच्या गप्पा चालल्या. माझ्या आयुष्यांतली भरती ओहोटीची कहाणी मी तिला सांगितली अन् ती म्हणाली :– भीमाताई माझ्याहि जिंदगीचं रूप तसंच आहे. तुम्ही खाणावळीच्या मालकीण म्हणून माझ्यापेक्षां एक पायरी वर आहांत, मी मेली स्वैंपाकीण काकू आहे. बाकी मला मालक फार चांगले भेटले आहेत. फत्तेगंजांत अगदीं नवीन बंगल्यांत ते रहातात. सगळे कुटुंबांतले कार्यक्रम अगदीं सुतासारखे सरळ पद्धतीनें चालतात. मालक बापूसाहेब बरोबर पांचाला उठून आपल्या कामकाजाचे

कागद तपासायला लागतात. मालकीणबाई माईसाहेब यांच्या उठण्याचा नेम नसतो. सगळ्यांत लहान मूल जें असतं त्यानं रात्रभर आईला झोंप येऊं दिली असली तर त्या लवकर उठतात अन् रात्रभर जागरण झालं असेल तर त्यांना उठायला उशीर होतो. बापूसाहेबांची आई लवकरच उठून गार पाण्यानं आंघोळ करून देवापुढें पोथी वाचत बसते. मोठा मुलगा दादा कॉलेजांत असतो तो अन् ताई दहावीत आहे. तीं दोघं साडे-पांचला उठून अभ्यासाला लागतात. त्यांच्याहून लहान मूलं आणखी कांहीं वेळानं उठतात. सगळ्यांच्या निजून उठायच्या वेळा वेगळाल्या असल्या तरी स्टॅण्डर्ड सात वाजतां सगळ्यांनीं जेवणघरांत जमून टेबलाभोंवतीं बसायचं अन् आपापलं पेय प्यायचं असा क्रम बिनचूक होत असतो. मालक अन् मालकीण-बाईना चहा पाहिजे असतो, माईना कोको लागतो अन् मुलांना दूध आवडतं. नि त्या बरोबर रोज कांहीं तरी ताजं खाद्य मिळत असतं.

एक दिवस साताच्या ठोक्याला सगळीजणं येऊन टेबला-पाशीं बसलीं. बापूसाहेबांची बहीण यमूताई गांवांतून फिरायला गेली होती ती पण चहाला बसली होती. सात वाजून पांच मिनिटा झाल्या तरी टेबलावर खाद्य, पेय येईना. रोजच्या वहिवाटीप्रमाणें बापूसाहेबांनीं दादा न् ताईची थट्टा केली, बाळूला रडकुंडीला आणलं न् बेबीला हासवलं, पण टेबल रिकामं. त्यांचा बहुमोल वेळ फुकट चालला होता. 'अहो आज काय विचार आहे, आम्हांला चहा द्यायचा आहे कीं नाहीं ?' ते ओरडले.

'आज रमाकाकू आल्या नाहींत नि त्यांचा निरोपय् नाहीं. त्या वेळेवर सगळं करतील अशा समजुतीनं मी निजून राहृचलें होतें नि जागी झाल्यावर पहात्यें तर त्यांचा ठिकाणां नाहीं. आतां स्टो पेटवून मी तयारी करत्येंय, आज थोडा उशीर होईल' माईंनीं उत्तर दिलं.

‘ तकलीफ माफ कीजिए’, ताईनं आपल्या आईच्या बोलण्याला पुस्ती जोडली.

‘ हिंदी पाठ चांगला तयार केलेला दिसतो आहे ’ यमूताई कौतुकानं म्हणाल्या. माईसाहेबांनीं चहा, कोको, दूध सर्व कांहीं मांडलं. खाण्याला मात्र ताजा पदार्थ तयार न करतां डब्यांतलीं बिस्कुटं सगळ्यांच्या मध्यें ठेवून दिलीं. बिस्कुट खात बापूसाहेब बहिणीला म्हणाले, ‘ यमे, एक दिवस रमाकाकू ( म्हणजे मी बरं कां ? ) आल्या नाहींत तर आम्हांला ताजं गरम खाद्य न मिळतां बिस्कुटांवर भागवावं लागत आहे. ’ त्यांचं बोलणं ऐकून माईसाहेबांना साहजिकच राग आला आणि त्या म्हणाल्या, ‘नि एक दिवस ताजं गरम खायला मिळालं नाहीं म्हणून तुमच्या बंधुराजांची तब्येत गरम झाली आहे. ’

आईनं बापूसाहेबांना बरोबर टोमणा दिला असं वाटून ताईनं टाळ्या वाजवून आणि वडिलांच्या पुढें तर्जनी मागेंपुढें हालवीत आनंद प्रदर्शित केला. ती नेहमी आईचा पाठपुरावा करीत असे.

यमूताई म्हणाल्या, ‘ बाकी बापू तुला न् वहिनी तुला स्वयंपाकाची बाई खरोखरीच चांगली मिळाली आहे हो ! तुमचा अभ्यानंद केला पाहिजे त्याबद्दल. ’ ( मीं सांगितलं रमाकाकूला कीं अभ्यानंद शब्द चूक आहे, अभ्यनंदन असा खरा शब्द आहे. किती झालं तरी बडोद्याची बाई ती ! )

‘ त्यांना स्वयंपाकाची बाई म्हणायचं नाहीं हो आत्या, त्या आमच्या काकू आहेत ’– दादानं सांगितलं.

‘ खरोखरीच त्या घरच्या माणसांसारखं वागतात. त्यांचा कधीं खाडा नाहीं, तक्रार नाहीं नि चोरी नाहीं. एखाद्या वेळीं सगळा स्वयंपाक झाल्यावर एखादा पाहुणा आला तर त्या पुन्हां सगळा करतात, कधीं कुरकुर करीत नाहींत–’ माईसाहेब.

ताई म्हणाली, ‘ आणखी कीं नाहीं आत्या, एकाद दिवशीं आम्हीं मागितलेला पदार्थ माई करून देत नसली तर काकूच

आम्हांला करून घालतात. फारच मायाळू आहेत त्या ' अशीं त्यांचीं बोलणीं चालू असतां मी धापा टाकीत तिथें आलें (रमाकाकू सांगत होत्या). चेहऱ्यावर दिलगिरीचा भाव दर्शवित मी म्हणालें, ' मला आज थोडासा उशीर झाला; पण चंदूची परीक्षा असल्यानं त्याच्यासाठीं भातपोळी तयार करून मग इकडें आल्यें. '

' गुजराती सातवीची सरकारी परीक्षा कां चालू आहे सध्यां ? ' यमूताईनीं हेटाळणीच्या स्वरांत मला विचारलं. स्वयंपाकीण-बाईचा मुलगा फार तर फायनलला बसत असेल असं त्यांना वाटत होतं; पण तो मॅट्रिकच्या परीक्षेला बसत आहे असं कळतांच त्यान्ला नवल वाटलं अन् त्यांनीं विचारलं, ' मग रोज तो कुठें जेवतो ? '

रमाकाकू म्हणाल्या, ' रोज तो देवांच्या अन्नछत्रांत जेवायला जातो, पण परीक्षा दहाला सुरूं होते, तिच्यासाठीं साडेआठला तरी जेवायला मिळालं पाहिजे, तसं अन्नछत्रांत कुठून मिळणार? म्हणून चार दिवस मीं घरींच त्याला जेवायला घालायचं ठरवलं आहे. '

' राग येऊं देऊं नका काकू ' मानभावी स्वरांत यमूताई म्हणाल्या, ' तुम्ही इथें बापूसाहेबांकडे दोन्ही सांज जेवतां, तुमचा मुलगा अन्नछत्रांत जेवतो; मग डाळ, तांदूळ, पीठ वगैरे मालसामान तुमच्या घरीं आजच कसं हो मिळालं ? '

यमूताईच्या बोलण्यांत असा कुजका अर्थ निघत होता कीं, काकू घरांतून चोरूनमारून जिन्नस नेत असाव्या. मुलांच्या देखील तो ध्यानांत आला. हा अवचित हल्ला ऐकून रमाकाकू गोऱ्यामोऱ्या झाल्या. माईसाहेब त्यांच्या मदतीला धावून आल्या आणि म्हणाल्या , ' वन्सं, किती झालं तरी त्यांचं घर आहे ना ? वेळीं अवेळीं कुणी येणारं जाणारं असतं. एकाद दिवशीं मुलगा अन्नछत्रांत जायचा कण्टाळा करतो, मग बुटकुलंभर भात करावा लागतो. '

'तें खर ग वहिनी, पण घरीं धान्य आणायला साधन काय ह्यांच्याजवळ ? का तूंच देतेस मधून मधून कोरडं धान्य त्यांना ? ' यमूताईनीं स्पष्टपणं विचारलं.

काकू एकदम संतापल्या नि संतापाच्या भरांत मोठ्या आवाजांत म्हणाल्या, ' मी धान्य चोरून नेतें असं कां म्हणायचं आहे आपल्याला ? तसं असेल तर सांगतें मला मूठभर तांदूळ इथून न्यायची मुळीच चोरी नाहीं. मी मागितले तर माईसाहेब मला डबाभर डाळतांदूळ देतील. पण मला २० रुपये पगार आहे, मुलाला कालरशिप मिळती आहे नि मी लोंकरीचं विणकाम करून दहा पांच रुपये वरती मिळवतें.'

यमूताई वरमल्या नि विषय बदलण्याच्या हेतूनं त्यांनीं विचारलं, ' मी आपलं माहिती मिळवण्याकरतां विचारलं होतं. कोणत्या शाळेंतून परीक्षेला बसला आहे तुमचा मुलगा ? '

'महाराणी चिमणाबाई हायस्कूलमधून' असं सांगून यमूताईचा नक्षा उतरविण्याकरितां काकू पुढें म्हणाल्या, 'तुमचा श्रीनिवास त्याच्याच वर्गांत होता पण त्याला फॉर्म मिळाला नाहीं. त्याचं काय मोठंसं ? होईल पुढल्या वर्षीं पास !' यमूताईना थप्पड मारल्यासारखं झालं. कोणीकडून या बाईची खोडी काढली असं त्यांना होऊन गेलं. माईसाहेब म्हणाल्या, ' वन्सं, काकू चांगल्या घरांतल्या आहेत. त्यांचा नवरा डभोईला परमनंट वे इनस्पेक्टर होता. तो टायोफाइडनं मेला तेव्हां त्याचे पैसे बॅकेंत होते. त्यांच्या दिरानं सांगितलं, ' बॅकेऐवजी ह्या पैशांची सरकारी सर्टिफिकिटं घेतली तर व्याज चांगलं मिळेल.' काकूंनीं बॅंकेंतले पैसे काढून सर्टिफिकिटांत गुंतविण्याची कामगिरी दिरावर सोंपविली. दिरानं अर्धी म्हणजे बॅंकेतले पैसे काढायची कामगिरी तेवढी केली अन् काकूंच्या हातीं पोळपाट लाटणं आलं. बाकी त्यांचा मुलगा हुषार आहे. चार वर्षांनीं पदवीधर झाला कीं आईची नोकरीतून सुटका करील यांत शंका नाहीं !'

माईसाहेबांचं भविष्य खरं ठरलं. मॅट्रिकनंतर चार वर्षांनीं चंदूला कलाभुवनांतून ओव्हरसिअरचा डिप्लोमा मिळाला नि लगेच चांगली नोकरी पण लागली. त्याला नोकरी लागल्यावर एक महिन्यानं काकूंनीं सांगितलं, ' माईसाहेब, चंदूला आतां शंभर रुपये पगार मिळतो आहे. तो मला म्हणतो, ' आई, तूं आतां स्वैपाकाला दुसऱ्याकडे जाऊं नकोस. तसं तू केलंस तर लोक मला काय म्हणतील ? '

दादा जवळच उभा होता. तो म्हणाला, ' स्वैपाकीणकाकूंचा मुलगा ओव्हरसिअर कसा झाला असं लोक म्हणतील.'

माईसाहेब म्हणाला, ' तुम्ही आमच्याकडे यायच्या बंद होणार हें भाकीत अगोदरच मी केलं होतं. काकू तुमच्या जाण्यानं आमची कितीहि अडचण झाली तरी तुमच्यामागलं गद्धावैत्र् (काबाडकष्ट) संपलं म्हणून आम्हांला आनंदच वाटतो आहे. तुम्ही आतां तुमच्यासारखीच कष्टाळू मायाळू बाई आम्हांला पाहून द्या अन् खुशाल लेकाच्या घरीं बसून तूपरोटी खा.'

बेबी रडकुंडीस येऊन म्हणाली, ' आम्हांला नको जा दुसरी बाई. आम्हांला काकूच हव्या. याल ना तुम्ही काकू रोज ? '

काकूंनीं कबूल केलं कीं आपण नोकरीकरतां नाहीं पण गप्पागोष्टी करायला मधून मधून माईसाहेबांच्या घरीं खेप टाकूं. दुसरं असंहि ठरलं कीं बाळू आणि बेबी यांनीं शाळेच्या मधल्या सुट्टींत काकूंच्या घरीं मधल्या वेळचं खाणं घ्यायला जावं आणि त्यांनीं मुलांना रोज नवे पदार्थ करून घालावे. दादा शिकण्याकरतां विलायतेंत अन् ताई लग्न होऊन सासरीं गेली होती. घरांत आतां पांचच माणसं उरलीं होतीं; म्हणजे काकूसारखी चांगली बाई मिळाली नाहीं तर स्वतःच काम करायचं माईसाहेबांनीं ठरवलं. काकूंच्या कामाची संवय झालेल्या कुटुंबाला दुसऱ्या कोणाचा स्वैपाक आवडणार होता ?

रमाकाकूंचा चंदू आईच्या आज्ञेंत वागणारा मुलगा. आपल्या

शिक्षणासाठीं तिनें किती श्रम घेतले याची त्याला चांगली जाणीव होती. काकूंनीं त्याला लग्न करण्याचा आग्रह केला आणि तो त्याप्रमाणें लग्नाला तयार झाला. अनेक वरसं काबाड-कष्ट करून थकलेल्या आईची एऱ्हवीं रोजच्या श्रमांतून सुटका कशी होणार? तिला सुख व्हावं म्हणून त्यानं लग्न करायचं ठरवलं इतकंच नाहीं तर बायको करायची ती आईच्याच पसंतीची करायची असं तो वधूपित्यांना सांगू लागला.

पुष्कळ मुली सांगून आल्या त्याला. त्यांतलीं एक देखणी, इंटर झालेली, चांगली बाबाशाही घराण्यांतली आईबाप न् भावंडं असलेली मुलगी काकूंनीं पसंत केली. बारा वरसांनीं काकूंच्या घरांत सौभाग्यालंकार परत आले. बारा वरसं रिकाम्या पडलेल्या कुंकवाच्या कोयरींत कुंकू परत भरलं गेलं, धुणी वाळत घालायच्या दांडीवर हिरवी लुगडंचोळी झळकायला लागली. सुनेचं माहेरचं नांव रोहिणी हें चंदूच्या नांवाशीं जुळणारं असल्यानं काकूनीं तेंच कायम करवलं. अतिशय आज्ञाधारक अन् शांत अशी मुलगी होती. (हें सगळं रमा-काकूंच्या सांगण्यावरून मी तुम्हांला सांगतें आहें. *) माहेरीं श्रीमंती अन् घरांत माणसं पुष्कळ असल्यानं तिला घरांतल्या कामाची किंवा लवकर उठण्याची दिखील टेव नव्हती, तरी आपली सासू पहाटे उठून कामाला लागलेली एक दोन वेळ पहातांच तीहि लवकर खोलीच्या बाहेर आली. 'आपण पडावं घटकाभर, मी करतें झाडझूड' असं ती सासूला म्हणाली. तिच्या आदबशीर वर्तनाचं काकूंना कोडं वाटलं अन् 'रोहिणी, तूंच घटकाभर अंथरुणांत पडून ये, माझं काय म्हातारीचं? माझी झोप केव्हांच संपली आहे,' असं म्हणून त्यांनीं तिला खोलींत लोटून दिलं.

---

* 'ह्या बातम्या आपण ऑल इंडिया रेडिओवरून ऐकत आहां' म्हणतात ना तशी गत.

रोहिणीचे वडील बडोद्यास कामासाठीं मधून मधून येतांना कांहींतरी सौंसारोपयोगी जिन्नस आणीत असत. कधीं तुपाचा डबा, तं कधीं चहाचे पुडे आणि कधीं भांडींसुद्धां. एकदां त्यांनीं जावयाच्या उपयोगाकरितां बुटांची जोडी आणली. ते परत आपल्या गांवीं जाऊं लागले तेव्हां काकूंनीं विचारलं, 'भाऊ-साहेब, बुटाला किंमत काय द्यावी लागली ?'

'बारा रुपये पडले,' ते म्हणाले. थोड्याच, वेळानं काकूंनीं आपल्या पेटींतून बारा रुपये काढून सुनेजवळ देत तिला सांगितलं, 'रोहिणी, भाऊसाहेबांना हे पैसे दे बुटाचे'

'पैसे कशाला द्यायला पाहिजेत त्यान्ला ? यांचे बूट जुने झालेले दिसले म्हणून भाऊंनी नवे घेऊन प्रेझेंट म्हणून दिले आहेत'– रोहिणी म्हणाली.

'प्रेझेंट द्यायची तर एखादी शोभेची हौसेची वस्तु द्यायची. जरूरीची वस्तु भेट म्हणून दिली तर लोक असा अर्थ करतात कीं, ती घ्यायची यांना ऐपत नाही, म्हणून म्हणतें दे हे पैसे भाऊसाहेबांना'– काकू पुनः म्हणाल्या. भाऊसाहेबांना हें भाषण ऐकू जात होतं, ते जवळ येऊन म्हणाले, 'काकू, मी आपल्या जावयाला काय द्यावं हा माझा प्रश्न आहे. तुम्ही कशाला त्यांत दरम्यानगिरी करतां ?'

भाऊसाहेबांच्या ह्या शब्दांनीं काकूंना अतिशय राग आला, (काकू स्वतःच मला ही हकीकत सांगत होत्या). सुनेनं आपल्या बापाला समजावून सांगायला पाहिजे होतं कीं विहिणीला असं बोलणं मर्यादेपलीकडचं आहे, पण तिनं आपलं कर्तव्य केलं नाहीं असं त्यांचं मत झालं. रात्रीच्या जेवणानंतर मुलगा आंचवायला गेला असतां त्याला गाठून काकूंनीं त्याच्यापुढें तक्रार मांडली. तो थंडपणें म्हणाला, 'बरोबर आहे. ह्यांत काय चुकलं आहे त्यांचं ?'

**काकू च्याट बनल्या. लग्न झाल्यानंतर मुलगे सासू-सासऱ्यांच्या आहारीं जातात न् आईबापांचे उपकार स्मरत**

नाहींत अशी म्हाताऱ्या माणसांची कुरकुर कानीं पडतांना त्या थट्टेनं हासत. माझा चन्दू कधीं नाहीं असं करणार. खडतर कष्ट करून मीं त्याला गरिबींतून वर आणलं आहे. कोणत्याहि मामुली आईकरतां (पेक्षां) माझी योग्यता विशेष आहे असा अहंकार त्यांना झाला होता. तो आज पहिल्यांदाच डिवचून जाऊन रात्रभर त्यांना झोप आली नाही.

यानंतर एका मोठ्या धर्मपांचजन्याची स्वारी बडोद्यांत आली होती. तिचीं एकवीस लेचकरं झालीं. वयोवृद्ध पेन्शनर, त्यांच्या आया नि इतर भाविक लोकांच्यावर त्यांनीं आपल्या ज्ञानगंगेचा लोंढा उदारपणें सोडला होता. व्यासापासून जिन-राजदासापर्यंत सगळ्या हिंदुस्थानांतल्या तत्त्वज्ञानी माणसांचं ज्ञान त्यांनीं पचवून टाकलं होतं. शास्त्रं असोत, सायन्स असो, पुराण असो त्यांना माहीत नाहीं अशी एकहि विद्या जगांत नव्हती. ते म्हणत, 'जर मी एकेका शास्त्रज्ञाच्या चुका त्याच्या पदरांत बांधायला लागलों तर प्रत्येकजण आपल्या उच्च पदा-वरून ढासळत येऊन त्याच्या अकलेचा चक्काचूर होईल. तितका निर्दयपणा माझ्या अंगांत नाहीं. म्हणून त्यांच्या ढोबळ चुका तेवढ्या सांगतों.'

व्याख्यानाचं सत्र संपल्यावर भिक्षेची झोळी अन् देणग्यांची पावतीचोपडी घेऊन धर्मपांचजन्य घरोघर हिंडले. काकूंच्या मनावर त्यांच्या लेचकरांची चांगलीच छाप बसलेली होती. त्यांनीं पांचजन्यांना त्यांच्या सेक्रेटरीसह जेवायला बोलावून त्यांच्या वैदिक धर्म महासंस्थेला १० रुपये वर्गणी दिली. सून-बाईनीं चंदूला ही माहिती दिल्यावर पैशाच्या उधळपट्टीबाबत चंदूनं आईची चांगलीच कानउघाडणी केली. तो म्हणाला, 'आई, हल्लीं विलायतेंत गोलमेज परिषदा भरत आहेत. त्यांत हिंदी लोकांचं काय म्हणणं आहे ठाऊक आहे का तुला ?'

'आहे तर. तुम्ही आपले तिजोरीच्या किल्ल्या आमच्या स्वाधीन करा अन् परत आपल्या देशांत जाऊन आनंदानं रहा, असं हिंदी लोकांचं म्हणणं आहे.'

नवराबायकोंनीं डोळे मिचकावीत एकमेकांकडे पाहिलं आणि हें चालूं द्या अशा अर्थाची खूण तिनं त्याला केली. हे त्यांचे संकेत काकूच्या चाणाक्ष द्रिष्टींतून सुटले नाहींत. चंदू म्हणाला, 'तर मग हें सत्तान्तर आधीं आपल्या घरी व्हायला काय हरकत आहे ?'

'पेटीच्या किल्ल्या मीं रोहिणीच्या स्वाधीन कराव्या एवढंच तुला सांगायचं असलं तर इतकं आडवळण कशाला ? ह्या घे तुझ्या किल्ल्या नि बघ आपला कारभार स्वत' कडोसरीच्या किल्ल्या काढून सुनेपुढे फेंकीत काकू म्हणाल्या. त्यांना एक मोठा हुंदका आला अन् तो काढून टाकायला त्या न्हाणीघरांत गेल्या. त्यांचा सगळा अभिमान अश्रूंच्या रूपानं डोळ्यांतून ओसंडत होता. आपला मुलगा सर्वसाधारण मुलांहून वेगळा नाही आणि आपल्या कष्टांची आठवण त्याला राहिली नाहीं हे त्यांना पुरतेपणी समजून चुकलं. थोड्या वेळानं मन आवरून त्या बाहेर आल्या.

त्या संध्याकाळीं चंदू दौऱ्यावर गेला. भाऊसाहेब मुलीकडे जेवणास आले होते. (बडोद्याच्या रमाकाकूंच्या सांगण्यावरून ही माहिती मी तुम्हांला देत आहें.) जेवतांना भाऊसाहेबांनीं मुद्दामच सत्तान्तराचा विषय काढिला. ते म्हणाले, 'काकू, तुम्ही पैशाच्या पेटीवरली आपली सत्ता सुनेच्या स्वाधीन केली ही मोठी अभ्यनंदन करण्याजोगी गोष्ट झाली. अहो, रोहिणीला तरी स्वत:चे पैसे आणि दागिने यांची व्यवस्था आतां ठेवतां आली नाहीं तर काय म्हातारपणीं ती सौसारांत लक्ष घालणार?'

काकू म्हणाल्या, 'इंग्रज सरकारचं उधारण देऊन चिरंजिवांनींच मला हिच्या स्वाधीन कारभार करायला सांगितलं तर नको तसं करायला? मुलं मोठीं झालीं आहेत, आपला कारभार आपण करण्याजोगी हें म्हाताऱ्या आईबापांना उमजत नाहीं. अजुनी तीं कुकुबाळं आहेत असंच त्यांना वाटत असतं. मी आतां सौसारांतलं लक्ष काढून देवधर्मांतच सगळा काळ घालवीन.'

'इंग्रज लोकांनीं दोन गोष्टी कराव्या असं हिंदी लोकांचं म्हणणं आहे. एक म्हणजे त्यांनीं तिजोरीच्या किल्ल्या आमच्या स्वाधीन कराव्या अन् दुसरं म्हणजे परत आपल्या देशांत जाऊन आनंदानं रहावं. यांपैकीं पहिली गोष्ट काकू तुम्हीं केली आहे–' भाऊसाहेब म्हणाले.

'दुसरीहि केली असती; इंग्रज लोकांना वेगळा देश आहे परत जाऊन रहायला तसा मला कुठं आहे? लेकाचं घर तेंच माझं घर.' काकूची सून त्यांना दुजोरा देईल अशा आशेनं तिच्याकडे बघत काकू म्हणाल्या, पण ती मख्ख राह्यली. 'सासूबाई. आमचं घर तेंच तुमचं' असं तिनं म्हणायला पाहिजे होतं पण तसं कांहीं ती म्हणाली नाही. शेवटी त्यांनींच तिला विचारलं. 'रोहिणी, तुला आपल्या वडिलांचं बोलणं पसंत आहे का?'

'माझ्या पसंतीला कोण विचारतो? आपल्या चिरंजिवांना विचारा नि योग्य दिसेल तें करा' रोहिणीनं शान्तपणें सांगितलं. चंदू दौऱ्यावर जायच्या आधीं त्यानच परस्पर सासरा न् बायको यांच्याकडून आपला कांटा काढून टाकायची मसलत रचली असेल असं काकूंना वाटलं. खरंहि असेल तें!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सात वाजतां बापुसाहेबांच्या बंगल्यावर माईसाहेब जाग्या होतांच स्वैपाकघराशीं आल्या. पहातात तर तेथली कडी उघडली जाऊन आंतलं काम अगोदरच सुरू झालेलं होतं. त्यांनीं आंत पाऊल टाकलं अन् पहातात तर शेगडी पेटवलेली असून तिच्यावर दूध तापत ठेवलेलं दिसलं. हें कुणी ठेवलेलं असेल असा विचार त्यांच्या मनांत येतो तोंच बम्बांत विस्तव घालून परत येणाऱ्या रमाकाकू त्यांना दिसल्या. त्यांनीं विचारलं, 'काकू हें हो काय? इतक्या सकाळच्या इकडे कशा आल्यात'?

'हेंच माझ्या कपाळीं लिहिलेलं आहे. चार दिवस वाटलं हाडाचीं काडं करून शिक्षण दिलेला मुलगा आपले पांग फेडील, पण तें कांहीं नाहीं देवाला पहावलं.'

चंदूला तर कांहीं झालं नाही ना असं भय वाटून माईसाहेब म्हणाल्या, 'कां बरं, चंदू तर सुखरूप आहे ना? नवीन घेतलेली मोटार सायकल दाखवायला परवाच आमच्याकडे आला होता.'

'तो सुखरूप आहे हो, त्याची भरभराट होती आहे. परवां मोटार सायकल घेतलीन्, उद्यां मोटार गाडीहि घेईल; पण ह्या म्हातारीचं लोढणं त्याला नि त्याच्या बायकोला नकोसं झालं आहे. माईसाहेब. तुमचं स्वैपाघर जसं बारा वरसं माझं घर होतं तसंच याफुडं राहूं द्या.' काकू डोळयाला पदर लावीत म्हणाल्या. त्यांच्या पाठीवर मायेनं हात फिरवीत माईसाहेबांनीं सांगितलं, 'कांहीं हरकत नाहीं, काकू अगदीं शेवटपर्यंत ह्या घरांत तुम्हांला कोणी अंतर देणार नाहीं अशी खात्री असूं द्या.'

इतक्यांत बाळू आणि बेबी स्वैपाघरांत आली आणि काकूंना बिलगत, 'काकू आल्या, काकू आल्या !' असा आनंदघोष त्यांनीं केला. मुलाच्या घरीं काढलेल्या काळाचा, सुखाचा अन् दुःखाचा काकूंना पूर्ण विसर पडला. तें थोडा वेळ पडून विरून गेलेलं एक स्वप्न होतं असा विचार करून त्यांनीं बेबीला उचलून कडेवर घेतलं.

इथें संपली पाहुण्याबाईंची गोष्ट. जवळ जवळ माझ्या औक्षा-सारखंच तिचं औक्ष चढउतारांत लोटलं होतं. त्यांतल्या त्यांत मी सुखी म्हणायची, कारण दुसऱ्याच्या घरीं काबाडकष्ट करणं माझ्या नशीबीं आलं नाहीं.

✦ ✦ ✦

## १३ : : व्यक्ती तितक्या प्रकृती

भगवंताची नोकरी गेली ! त्याच्यावर गुन्हा शाबीत झाला, त्याला दंड झाला, तुरुंगाची शिक्षा झाली. शिक्षा भोगून परत आल्यावर सरकारनीं त्याला परत नोकरीवर घेतलं नाहीं ! चमत्कार आहे बाई ! आईबापांनीं समजा मुलाला एकाद्या अपराधाबद्दल चोप दिला तर तेवढ्या कारणानं घरांतून घालवून देत नाहींत; चोप देऊन झाल्यावर बाप म्हणतो, 'बाळ्या, तुला दिलेल्या छड्यांनीं तुला जितकं दुःख झालं असेल त्याच्या दसपट मला झालं आहे.' आई म्हणते, 'कां असा उनाडक्या करतोस न् हातचा मार खातोस ? बरं ऊठ आतां दोन घास खा.' तसंच एकाद्या नोकरानीं चूक केली तर त्याला शिक्षा देऊन झाल्यावर सरकारनीं परत नोकरीवर घेतलं पाहिजे. पाठीवर मारायचं न् पोटावर पण मारायचं हा कुठला न्याय ?

हा विषय मीं मेंबरांच्या पुढें एकदा मुद्दाम काढला होता. नाडकर्णी म्हणाले, 'सरकारचं करणं बरोबर आहे. एखादा मनुष्य नैतिक द्रिष्टया गुन्हेगार ठरला तर त्याला अधिकारावर ठेवणं म्हणजे स्वतःची इभ्रत कमी करून घेणं आहे.' नाडकर्ण्यांना नेहमीं सरकारची बाजू चांगली वाटत असे.

'कोर्टांत एकाद्या माणसाच्या विरुद्ध निकाल लागल्यावरच सरकारला कळतं कीं काय त्या माणसाची क्यारेक्टर कशी आहे तें ? एखादा लाचखाऊ हापिसर सगळ्या दुनियेला माहीत असतो पण केवळ कोर्टात त्याच्या विरुद्ध निकाल लागला नाहीं ह्या सबबीवर तो खुशाल आपला अंमल आडवातिडवा चालवूं शकतो.'—शशिकांत गुप्ते म्हणाला.

'सचोटी ने दानत कायम ठेवून सरकारची नुसकान न् पब्लिकचा तोटा न करतां चांगला माणूस पैसे खाऊं शकतो. त्याला आम्ही वेपारी लोक लांचरुसवत म्हणत नाहीं, तें इनामबक्षीशी ह्या नांवाखालीं मोडतं,' चुनीलालशेट म्हणाले.

'लाख बोल्लांत शेट, त्याबद्दल ह्या घ्या गरमागरम फुटबॉल्'! मीं त्यांच्या ताटांत चांगला टरटरीत फुगलेला फुलका फेकीत म्हणाले.

'ह्या असल्या इनामबक्षीशीचं उधारण दया पाहूं शेट–' नाडकर्णी.

'अरे आतां कंत्राटदारचं बील आहे. खोटं बील नाहीं, काम न् माल चोख्खा आहे तरी बील मंजूर व्हायला सहासहा मास लागतात. तें एक मासांत मिळावं म्हणून हिसाबी कारकुनाला रुपयाभर दिला तर सरकारचीबी नुकसानी नाहीं ने रैयतचीबी नाहीं–' चुनीलालनीं सांगितलं.

चालला होता असा वाद आंचवून कपडे घालीपर्यंत. रोज नवीन विषयाची चर्चा चालायची माझ्या खाणावळींत. कधीं प्राणांतिक उपास, तं कधीं सत्याग्रह न् असहकार, कधीं नाटक चांगलं का बोलका सिनेमा चांगला, बायकांनीं नाटकसिनेमांत कामं करावीं कीं नाहीं, शुद्ध ल्याहावं का अशुद्ध ल्याहावं, हिंदु–मुसलमानवाद . . . बाई बाई किती विषय चालत म्हणायचे? माझे मेंबर ठरावीक होते म्हणून सगळ्यांच्या ओळखी होत्या न् वादविवाद खेळीमेळीनं चालायचे. सभेची कायमची अध्यक्ष मी होत्यें.

खाणावळींत मी फकस्त महिन्यावर मेंबर घेत होतें, एक दिवसाचे नाहींतर आठवड्या पंधरवड्याचे भोजनभाऊ घेत नव्हतें; तरीसुद्धां मेंबराचा पाहुणा म्हणून एखादा माणूस घुसायचाच जेवायला. मी नेहमीं बजावायची कीं बाबांनो, तुम्ही माझ्या डोक्याशीं घोस्ट आणूं नका, खुशाल त्याला घेऊन हाटेलांत जा. कोण कसा असतो याचा नेम आहे का सांगा. कांहीं हाताळू असतात, एखाद्या मेंबराच्या खिशाला हात लावला तरी हरकत नाहीं, पण माझं गरिबाचं फुलपात्र नाहींतर वाटी लांबवली तर काय करायचं? माझा एक मेंबर शाळेंत मास्तर होता, त्यानं एक दिवस पाहुणा आणला. होता मेला वाह्यात्! त्या दिवशीं भोजनसभेंत पुनर्विवाहावर वादविवाद



‘ऑर्डर - ऑर्डर’ — भीमाबाई

चालला होता. बालविधवांनीं पुर्नविवाह करावा इथपर्यंत लोकांचं मत तयार झालं होतं,पण मोठ्या वयाच्या विधवांनीं तो करावा कीं नाहीं याच्यावर मतभेद चालला. मी तात्यासाहेब केळकरांसारखी कायमची अध्यक्ष होतें म्हणून मीं निकाल दिला, ‘किती का वयाची विधवा असेना, जिला आपण पुनर्विवाह करावा असं वाटत असेल तिनं खुशाल तो करावा.’

तशी तो वाह्यात् पाहुणा म्हणाला, ‘तर मग भीमाआजी तुम्ही कां नाहीं पुर्नविवाहाला उभ्या ऱ्हात ?’

मी अशी कांहीं रागावलें नि त्याच्यापुढें उभी राहून म्हणालें, ‘ही मी उभी राह्यलें आहें पुर्नविवाहाला, करतां माझ्याशीं लग्न ? तुम्ही पण विधुर आहां न् वयानं मला शोभाल असेहि आहां.’ माझ्या उभी राहण्याच्या न् बोलण्याच्या झोलानं तो वाह्यात् पाहुणा थंडगार पडला. ‘स्त्रीजातीनं मर्यादा सोडली म्हणजे हिंदुस्थानचं वाटोळं झालंच म्हणून समजा’ तो म्हणाला.

'पुरुष निर्लज्जपणानं बायकांशीं वेडवांकडं बोलले कीं बायकांनीं मर्यादा सोडून त्यांची खेटरांनींच पूजा बांधली पाहिजे,' मी म्हणालें.

तो वाह्यात् पाहुणा डोक्यास रुमाल गुंडाळून आपल्याला बरोबर आणणाऱ्या मास्तरांच्या सकट परत जातांजातां म्हणाला, 'शुद्ध आनी बिझांट आहे ही बाई.' मीं नाडकर्ण्याला विचारलं, 'आनी बिझांट म्हणजे काय हो नाडकर्णी?'

'ॲनी बेझंट ही कोणत्याशा सोसायटीची अध्यक्ष होती, ती जगांतल्या फार चांगल्या वक्त्यांपैकीं एक होऊन गेली. म्हणून एखादी बाई दुसऱ्याचं तोंड बंद होईल असं फाडफाड बोलत असली तर तिला ॲनी बेझंट म्हणतात.'

'छान जिरवलीत तुम्ही ह्या बोलभांडाची, आजीबाई. अहो, हा जमदग्नीचा अवतार कोणाचा कसा अपमान करील ह्याचा नेम नाहीं. लष्करच्या भाकरी भाजायच्या अन् भावाच्या घरीं फुकट जेवायचं. एक दिवस भावजयीनं वाढतांना भाजी जेव-णाराच्या डाव्या हाताला वाढली. त्याबरोबर 'इतकीं वर्षं झालीं वाढायला लागून वहिनी, पण तुला भाजी कुठें वाढायची तें समजायची अक्कल नाहीं. शुद्ध ताराबाई कोल्हापूरकरीण आहेस,' असं म्हणून त्यांनीं तिच्या थोबाडींत दिली. लगेंच भावजयीनं रागावून भाजीचं पातेलं त्यांच्या डोक्यावर उपडं केलं अन् भावानं शांतपणें सांगितलं, 'विसू, आतांच्या आतां पानावरून ऊठ अन् यापुढें केव्हांहि आमच्या घरीं जेवायला येऊं नको.' तेव्हांपासून ही स्वारी कधीं खानावळींत जाते तर कधीं हातांनीं स्वैपाक करते,' त्रिंबकराव नांवाचा विद्यार्थी म्हणाला.

मधुकर आजोळींच आईबरोबर रहात होता तर भगवंतराव माझ्याकडे राहिला होता. त्याची गृहलक्ष्मी त्याच्याबरोबर रहायला तयार नव्हती. कारण त्याचे उरलेसुरले पैसे अन् दागिने वडिलांच्या स्वाधीन करून तिनं माहेरच पसंत केलं. भगवंतला बायकोच्या वर्तनाची इतकी लागणी लागली कीं त्यानं जवळजवळ अंथरूणच धरलं. पडल्या पडल्या तो

खाणावळींतल्या मेंबरांचे हिशेब मांडून ठेवी, त्यांचे पैसे गोळा करी अन् एखादे वेळीं बाजारहि करी. कारणावांचून कोणाशीं शब्दहि तो बोलत नव्हता. एका काळीं कसला रुबाबदार नि कडक रावसाहेब होता तो, पण आतां भीमाआजींचा आजारी मुलगा एवढ्याच नात्यानं लोक त्याला ओळखीत होतें. मधू मात्र त्याला नि मला फार मानीत होता. आम्ही गरीब अन् आई श्रीमंत म्हणून त्यानं आमची कधीं अवहेळणा केली नाहीं. तो जरी शाळेंत जात होता तरी शाळेपेक्षां त्याला गायन जास्त आवडत होतं. गंधर्व महाविद्यालयाच्या शाळेंत पटवर्धनबुवांच्या हाताखालीं तो शिकत होता अन् वारंवार त्याला बक्षीसं मिळत होती. मुके चित्रपट बोलूं लागल्यावर एका कंपनीनं नंदकिशोर नांवाचा बोलपट काढला होता त्यांत मधुकरानं कृष्णाचं अन् ठोमऱ्यांच्या ठकीनं राधेचं काम केलं होतं. त्याच्या बोलावण्यावरून मी तो बोलपट बघायला गेलें होतें. पडद्यावरचीं चित्रं बोलतांना बघून पहिल्यांदा माझ्या पोटांत धडकीच भरली नि वाटलं, ही कांहीं तरी भुताटकी असली पाहिजे. मग लक्षांत आलं इथे बसलेलीं बाकीचीं पांचशें माणसं घाबरत नाहींत नि मींच एकटीनं कां घाबरावं? शेजारीं बसलेल्या कमलाबाईनीं मला नीट समजावून सांगितलं. त्या म्हणाल्या,' बाई, तुम्ही बीनबोलक्या फिल्म पाहिल्याच आहेत आतांपर्यंत. ही फिल्म तशीच बीनबोलकी आहे पण पडद्याच्यामागें एक ग्रामोफोन ठेवलेला आहे, अन् त्यांत काम करणाऱ्यांचे आवाज अगोदरपासून घेतलेले असतात. त्यांचें रेकार्ड वाजवतात.'

मीं म्हटलं, ' इश्श, असं का आहे ? मला वाटलं, पडद्याच्यामागें खरीं माणसं उभी राहून बोलतात नाहीं तर गातात. पण मग लक्षांत आलं कीं नंदाचं काम करणारे फाटक बोलपट तयार होतांच विलायतेला गेले. तुम्ही म्हणतां तें बरोबर असलं पाहिजे. ग्रामोफोनच ठेवला असेल पडद्याच्यामागें.'

मधूनं सिनेमांत काम चांगलं केलं म्हणून त्याचा नि ठकीचा गांवांत जिकडे तिकडे जयजयकार झाला. ठकी हें नांव कानाला

ठोसे लगावणारं असल्याकारणानं कंपनीनं बदलून मधुबांसरी असं नवीन ठेवलं. इतका जयजयकार होत असून मधू आपल्या गरीब आजीला नि बापाला मुळींच विसरला नाहीं. संध्याकाळची वेळ होती, अजून दिवा लावला नसल्यानं स्वैपाघरांत साधारण अंधार पडला होता. मी चुलीत पेटवणं घालीत होतें नि भगवंत भिंतीशीं टेकून पाटावर बसून जुन्या आठवणी काढीत होता. अशा वेळी दोघं मुलं तिथें आली. त्यांतलं एक मूल दुसऱ्याला म्हणालं; 'मधू! ही तुझी आजेसासू होणार.' आवाजावरून मीं ओळखलं की हा माझा नातू मधुकर आहे. मग तें दुसरं मूल म्हणालं, 'बाजार भरायच्या आधींच उचल्यांनीं कंबरा बांधाव्या तसं तुझं बोलणं आहे मधू!' दोघंहि एकमेकांना मधू म्हणत होती. दोघांचेहि केस मानेपर्यंत वाढवून कापलेले, मिशा कोणालाच नाहीत, दोघांचेहि सैल कपडे पांढरेसफेत नि दोघांचींहि कपाळं पांढरीं फटफटीत. दोघांनीं खालीं वाकून मला



"तुमच्यांतला 'तो' कोणता नि 'ती' कोणती तें सांगा."

नमस्कार केला तेव्हां मी म्हणालें, ‘मधूबाळांनों, माझा दोघां-नाहि आशिर्वाद, पण तुमच्यांतला ‘तो’ कोणता नि ‘ती’ कोणती तें सांगा म्हणजे वेगवेगळाले आशीर्वाद द्यायला बरं.’

मधुकर म्हणाला, “मी ‘तो’ आहें.”

मधुबांसरी म्हणाली, “मी ‘ती’ आहें आजी.”

‘बसा, बाळांनो, ह्या चटईवर. नंदकिशोरमध्यें तुमचं राधाकृष्णाचं काम पाहून मला फार आनंद वाटला. आतां पुन्हा एकादी फिलम् आहे का तुमची ?’

‘आतां माझी मॅट्रिकची न् मधूची इंग्लिश सहावीची परीक्षा आहे; परीक्षा होईपर्यंत अभ्यासाशिवाय कांहीं करायचं नाहीं’ मधुकर.

‘हा निश्चय अगदीं योग्य आहे मध्या,’ भगवंत म्हणाला.

‘आं बापू, अंधेरांत तुम्ही मला दिसलाच नाहींत. ऊठ ग ए मधे, फादरना नमस्कार करूं,’ मधू म्हणाला. मीं काडी ओढून चिमणी पेटविली. दोन्ही मधू भगवंतच्या पाया पडले.

मधू कधीं मॅट्रिक झालाच नाहीं पण गाण्यामध्यें त्यानं चांगलं नांव कमावलं नि त्याचे जलसे सुद्धां होऊं लागले. त्याच्या जोडीनं मधुबांसरी गाणीं म्हणू लागली. पुष्कळशा मराठी नि हिंदी बोलपटांतून त्यांची कामं होऊं लागली. पहिल्या पहिल्यांदा त्यांचीं कामं केवळ हौसेनं होत, पण नंतर त्यांना पैसेहि मिळू लागले. एके दिवशीं मला मधू म्हणाला, ‘आजी, तूं फार थकलीस ग. तुला विश्रांतीची फार गरज आहे.’

मी म्हणालें, ‘तें खरं, मधुबाळा, पण म्हातारपणीं काबाडकष्ट करायचं नशिबीं आलं आहे त्याला काय करणार? माझं नि भगवंतचं ह्या खाणावळीच्या धंद्याशिवाय चालणार कसं? भगवंतच्या जिवावर दहा वरसं ऐषआरामांत काढलीं. पण ती त्याच्या वैभवाची इमारत कोसळली. आतां तूंच जर आमची ह्या यातनांतून सुटका केलीस तरच खाणावळींतून आम्ही बाहेर पडूं. नाहीं तर मरेपर्यंत माझ्यामागचं मेंबरांच्या पोळ्या लाटणं चुकत नाहीं.’

मधुकर म्हणाला, 'आजी, सध्यां मला स्वत:च्या खर्चापुरते पैसे मिळत आहेत. पण लवकरच उष:काल आणि मयूर कंपन्यांशीं आमचं कंत्राट व्हायचं आहे. तें होतांच तुमची ह्या वनवासांतून सुटका केल्याशिवाय मी रहाणार नाहीं.' कांहीं दिवसांनीं उष:कालचा रक्षाबंधन हा बोलपट लागला. मला नि बाकीच्या शाळीग्राम मंडळींना मोटार पाठवून रात्रीच्या पहिल्या खेळाचं आमंत्रण आलं. भावोजी, कमलाबाई, माई, वन्स, भगवंत नि मी अशी एका फ्यॉमिली सर्कलमध्ये बसलों होतों. अंधार पडल्यानंतर शेजारच्या सर्कलांत कांहीं माणसं येऊन बसलीं. आम्हांला तीं दिसली नाहींत. त्यांचे मधून मधून निघणारे आवाज पण आमच्या ओळखीचे नव्हते; तरी 'तो पाहिला कां आमचा मधू ?' ... हें 'पद खास बुवांनीं त्याच्याकडून तयार करून घेतलं ...' 'मधू आतां पहिल्या प्रतीचा ष्टार म्हणून झळकल्याशिवाय रहायचा नाहीं;' अशीं तीन वाक्यं ओळखीच्या आवाजांतून निघाल्यासारखीं वाटलीं. 'लक्ष्मीचा आवाज आहेसा वाटतो' असं वन्सं माझ्या कानांत पुटपुटल्या. अर्धी फिल्म संपल्यावर मध्यंतर येऊन उजेड पडला. शेजारच्या सर्कलमध्यें खादी, वेषधारी पण डोळ्यांना सोन्याच्या चौकटीचा चष्मा नि हातांत सोन्याचं मनगटी घड्याळ अडकवणारा लठ्ठ चिरूट पिणारा, पन्नास वरसं वयाचा गृहस्थ बसलेला होता. त्याच्या उजव्या हाताशीं रुपयाएवढं मोठं कुंकू लावून पेशवाई थाटाचं नेसणारी सवरणारी बसलेली बाई त्याला न शोभणारी पण देवाब्राह्मणांसमक्ष लग्न झालेली त्याची बायको असावी; अन् त्या गृहस्थाच्या डाव्या हाताशीं कोण बसलं होतं सांगा पाहू? अहो, माझी सून–भगवंताची बायको–लक्ष्मी होती ती! डोळ्यावर काळा चष्मा, बुचड्यांत गजरा, नव्या धर्तीचं रेशमी पातळ, हातांत पंखा असा अगदीं थाट होता तिचा. थेटरांत उजेड पडल्याबरोबर तिनं आमच्या सर्कलकडे एकदां पाह्यलं न् तोंड फिरवून त्या खादीवाल्याशीं ती कांहींतरी बोलली. मग ती अन् तो चहा प्यायला बाहेर निघून गेले. त्याची लग्नाची

बायको तिथेंच बसून राहिली. भगवंत त्या दोघांच्याकडे ती दोघं गर्दीतून दिसेनाशीं होईपर्यंत बघत राहिला होता. त्याचं अंग सारखं थरथर कांपत होतं; मलाहि लक्ष्मीचा बेशरमपणा पाहून फार संताप आला होता; पण जगातल्या अनुभवावरून मला माहीत झालं होतं की अशा गोष्टींचा संताप करून घेण्यांत कांही अर्थ नाहीं. ज्याचं पाप त्याला.

मध्यंतर संपून पुन्हां अंधार पडला, रुपेरी पडद्यावर जाहिराती झळकूं लागल्या, तेव्हा तीं दोघं मेलीं परत येऊन आपापल्या जागांवर बसलीं. मधुकर नि मधुबांसरी दोघांचंहि काम चांगलं होत होतं. एकदा ती आपला ओचा सांवरून गवतांतून अन् झाडांझुडपांतून धांवत होती अन् तो तिच्यामागें शिवाशिवीचा खेळ खेळत होता तर एकदा तो झाडामागें लपला असतांना तिनं त्याला हुडकून काढलं अन् दोघंजणं फिदीफिदी हासूं लागलीं. मग ती गाणं म्हणत हासत खेळत मोगऱ्याच्या झाडाला लटकलेली गुलाबाची न् तगरीला आलेलीं कागदीं फुलं तोडूं लागली न् तेवढ्यांत त्यानं आंब्याच्या डहाळीला लागलेलं शिताफळ तोडलं. त्यानं शिताफळाचा तुकडा मोडून आपल्या घोगऱ्या आवाजांत त्याच गाण्याचं एक कडवं म्हटलं अन् तो तिच्या तोंडांत घातला...

'इश्श, कसलं चावट द्रिश्य घातलं आहे इथें ?' लक्ष्मी त्या खादीवाल्याशीं पुटपुटली.

'आपले चिरंजीव ! खाण तशी माती' तो पुन्हा म्हणाला.

हा सीन लक्ष्मीच्या डोळ्यांना इश्श वाटावा म्हणजे म्हणतात ना तशांतली गत– आपल्या डोळ्यांतलं मुसळ दिसत नाहीं पण दुसऱ्याच्या शेंडीतलं कुसळ दिसतं.

खरं म्हटलं तर लक्ष्मीला त्या खादीवाल्याशेजारीं बसलेली पाहून आमचं सगळ्यांचच लक्ष पडद्यावरल्या सिनेमांतून उडालं होतं. हा ओंगळवाणा जिवंत सिनेमा शेजारी चालत असतांना चित्रांच्या सिनेमांत आमची मनं रंजणं शक्य नव्हतं. खेळ संपून पुनः उजेड पडायच्या आंत लक्ष्मी आणि तिच्या बरोबरीची

दोघं माणसं बाहेर निघून गेलीं होतीं. थेटरचे म्यानेजर वाघ (ह्यांनींच चित्रपट अन् बोलपट हे शब्द मराठींत रचले असं गोखलेमास्तर म्हणत होते.) आमच्याकडे आले अन् मला म्हणाले, 'कसं काय आईसाहेब? आवडलं कां पिचकर? मधुकररावांना ह्यांतल्या कामाबद्दल पंचवीस हजार रुपये मोजले आहेत मयुर पिचकरनीं. तुम्हांला घरीं परत न्यायला मोटार तयार आहे, चला.' आम्ही सगळीजणं जायच्या तयारीनं उभी राहिलों पण भगवंत खुर्चीवरून हालला नाहीं.

'अरे, झोंप लागली कीं काय याला? भावोजी उद्गारले.

'बापू, ऊठ, घरीं जाऊं या'. वन्स म्हणाल्या, पण भगवंतची हालचाल दिसेना. मी त्याच्या तोंडाकडे पाहिलं तर तोंड वांकडं झाल्यासारखं दिसत होतं अन् बोलण्याचा प्रयत्न करीत असून त्याला बोलतां येत नव्हतं. माझा धीर खचला. 'भावोजी पहा हो, हा कसं करतो आहे तें.' मी म्हणालें. वाघांनीं परत जाणाऱ्या प्रेक्षकांतल्या एका डॉक्टरला बोलावून आणलं. त्यानं तात्पुरती तपासणी करून सांगितलं, 'हा फेंसाल फॅरॅलिसिसचा–' अटाक आहे. यांना उचलूनच घरीं नेलं पाहिजे. घरीं नेऊन दूध अन् ब्रॅंडी द्या अन् निजवून ठेवा. तुमचे फयामिली डॉक्टर कोण आहेत?

'मुंगळे,' भावोजींनी सांगितलं.

'मग आम्हांला त्यांत पडायचं कारण नाहीं. पुण्याच्या डॉक्टरांचे ते भीष्माचार्यच आहेत,' असं सांगून ते डॉक्टर परतले. थेटरमधल्या दोन बळकट माणसांनीं भगवंतला उचलून मोटारीत ठेवलं नि घरापर्यंत बरोबर येऊन त्याला माडीवर पोचवलं.

सिनेमा थेटरमध्यें चाललेला लक्ष्मीचा चाळा पाहून त्याच्या मनाचा क्षोभ झाला. त्यामुळें हा फेंसाल कायससं म्हणजे तोंडाचा अर्धांगवायु झाला आहे असं डॉक्टर मुंगळ्यांनीं सांगितलं. 'काळ हेंच एक त्याच्यावर औषध आहे. दुःखाचा जसजसा विसर पडत जाईल तसतसा हा रोग बरा होत जाईल. दुसरीकडे लक्ष जाऊन दुःखाचा विसर पाडणं आणखी खायला प्यायला चांगलं पौष्टिक देणं ह्याशिवाय दुसरा इलाज आमच्या शास्त्रांत

नाहीं,' डॉक्टर म्हणाले. हीच व्यवस्था आम्ही ठेवली. पुष्कळ दिवस त्या अवस्थेंत भगवंतला काढावे लागले. आतां तो पुष्कळच बरा आहे.

मघाची गोष्ट घडल्यानंतर आठ दिवसांनीं मधू खाणावळींत येऊन उभा राहिला अन् मेंबरांना म्हणाला, 'मित्रहो, ह्या महिन्याच्या शेवटल्या दिवसापर्यंतच ही भीमाआजींची खाणावळ चालू रहाणार आहे. पहिल्या तारखेला ही बंद होईल. आतांपर्यंत दिलेल्या उदार अन् उधार या दोन्ही प्रकारच्या आश्रयाबद्दल मी तुमचे सर्वांचे हार्दिक आभार मानतों.' जेवणारांचे हात खरकटे असल्यानें डाव्या तळहातांनीं पाटांवर चापट्या मारून टाळ्यांचं काम केलं.

मला त्यानं सांगितलं, 'आजी, ह्या पहिल्या तारखेपासून खाणावळ बंद. रक्षाबंधन, रायरायान् अन् फुलांत फूल जाईचं ह्या तीन बोलपटांत मला न् मधुबांसरीला दीड लाख रुपये मिळाले आहेत. त्यापैकीं एक लाखाचा ट्रस्ट करून बॅंकेंत ठेवला आहे. तुला, बापूंला न् आत्याबाईला दरमहा तीनशें रुपये घरबसल्या मिळत जातील. तुम्ही तिघांनीं सुखानं एकत्र रहावं अशी आमची इच्छा आहे.'

तेव्हांपासून मी, भगवंत नि वन्सं ह्या आमच्या घरांत सुखांत म्हातारपणचे दिवस घालवीत आहों. वेळ जायला कांहीं तरी उद्योग पाहिजे म्हणून वन्सं अनाथ महिलाश्रमांत शिकवायला जात असतात, मी फाटक महाराजांच्या मठांत भजनकीर्तन उत्सवांना जातें अन् भगवंत बिचारा आजाऱ्यासारखा पडून असतो. मधू अन् मधुबांसरी अजून हिंदी, मराठी अन् तेलगू बोलपटांत बरोबरीनं कामं करीत असतात. ती दोघं दादरला मोठा थोरला ब्लॉक घेऊन त्यांत रहात असतात. अगदीं खोऱ्यानं पैसे ओढतात म्हणा ना! मधून मधून इथें येऊन आम्हांला भेटतात सुद्धां ! आतां ह्यापुढें माझ्या आयुष्याचे चढउतार होतील असं मला वाटत नाहीं. याउपर आईअंबाईची इच्छा !'